शनिवार । २४ मे १९८० । ७५ पैसे

माणूस

# अरबांशी मैत्री म्हणजे इस्रायलशी शत्रुत्व नाही !

श्री. ग. मा.

ज्या अर्थी इस्रायलचे माजी संरक्षणमंत्री मोशे दायान यांच्या जनता राजवटीत झालेल्या गुप्त भारतभेटीचा विषय इंदिरा गांधींनी आपल्या निवडणूक प्रचारमोहिमेत उकरून काढला व त्यावेळचे परराष्ट्रमंत्री अटलबिहारी वाजपेयी यांच्यावर टीकेची धार धरली त्या अर्थी ९ राज्यातील आगामी विधानसभा निवडणुकीत, विशेषत: उत्तरेकडील राज्यात तरी त्यांना भा ज. प. हाच प्रमुख विरोधी पक्ष आहे, असे वाटत असावे. इंदिरा काँग्रेसचे एक नेते स्टीफन गेल्या महिन्यात पुण्यास येऊन गेले. त्यांनी कम्युनिस्ट, इंदिरा काँग्रेस व जनसंघ (भाजप) हेच देशातील तीन मुख्य राजकीय प्रवाह आहेत असे त्या वेळी सांगून इंदिरा गांधींच्या मूल्यमापनाला एक प्रकारे अगोदरच पुष्टी देऊन ठेवलेली आहे. महाराष्ट्रापुरते पाहायचे तर ही विभागणी थोडी बदलायला हवी. येथे कम्युनिस्ट नाममात्र आहेत. त्यांच्याऐवजी शरद पवार गट मात्र अरस काँग्रेसचा टिळा लावून वावरत आहे. जनता पक्षही दंडवत्यांमुळे थोडा कोकणात, थोडा मुंबईत तग धरून आहे. ठिकठिकणांहून प्रसिद्ध होणारी निवडणूक–वार्तापत्रे पाहिली तर इंदिरा काँग्रेसचा विजय निश्चित समजून चालायला हरकत नाही. विधान सभेतील २८८ जागांपैकी अंदाजे १७५ ते २०० जागा या पक्षास मिळून तो सत्तेवर येईल, असा सर्वसाधारण कल आहे व त्याखालोखाल पवार काँग्रेस असेल. महाराष्ट्रापुरता भाजपचा क्रमांक तिसरा राहील. अर्थात ही सगळी भाकिते आहेत. मतदार पुन्हा एकदा सगळ्यांना चकवणार नाहीत असे नाही; पण जनता राजवट १९७७ मध्ये दिल्लीत स्थापन झाल्यावर पाठोपाठ आलेल्या विधानसभा निवडणुकातही लोकांनी जनता पक्षाच्या बाजूने कौल दिला होता व उत्तरेत त्या वेळी कमी मताधिक्याने पण सर्वत्र जनता राजवटी स्थापन झाल्या होत्या. म्हणजे लोकांना केंद्र व राज्य सरकारे यात विसंवाद सहसा नको असतो. तसेच याही वेळी घडण्याचा संभव आहे. जरी गेल्या चार महिन्यातील इंदिरा-संजय राजवटीची वाटचाल फ़ारशी आशादायक व लोकांना दिलासा देणारी नसली तरी विरोधक तरी कुठे मोठा आशादायक पर्याय उभा करू शकले आहेत ? कम्युनिस्ट बंगाल–केरळातून बाहेर पडू शकत नाहीत व बंगालमध्ये ठाम बहुमत मागे असतानाही डाव्या राजवटीची प्रगती काही डोळयांत भरावी अशी नाही. अरस काँग्रेस, चंद्रशेखरांची छत्री याविषयी तर न बोललेच बरे. महाराष्ट्र वगळता देशात इतरत्र चरखा धूळ खात पडला आहे आणि पावसाळा जवळ आलेला असल्याने लोक बाजारातून खऱ्या छत्र्याच खरेदी करतील, चित्रातील छत्री काय कामाची असा जो तो साहजिकच विचार करील. थोडीफार जान भाजपजवळ आहे आणि हेच इंदिरा गांधींना जाणवल्यामुळे त्यांनी नेमका दायान भेटवृत्ताचा घाव घालून भाजपला घायाळ केले. मुस्लिम थोडेफार भाजपला अनुकूल झाले असलेच तर ते पुन्हा आपल्याकडे वळावे हा त्यांचा यामागील डाव उघड होता. या अनपेक्षित हल्ल्यामुळे मंडळी मात्र गडबडून गेली. मोरारजी प्रथम गप्प बसले, अटलजींनी इन्कार केला. नंतर दोघांनीही भेट घडल्याचे कबूल केले. अगोदरच हा खुलासा करून मोकळे व्हायला काय हरकत होती ? असे व्यवहार, भेटीगाठी, गुप्त बोलणी देशोदेशीच्या परराष्ट्र व्यवहारात नेहमीच चालू असतात. मधू लिमयांना म्हणे या भेटीच्या वृत्तामुळे धक्का बसला; पण ज्योती बसूंना यात काही धक्कादायक वाटले नाही. राजनैतिक संकेत म्हणून अशा गोष्टींची वाच्यता होत नसते; पण आजवर कुठले संकेत इंदिरा गांधींनी पाळले आहेत तर हा संकेत धुडकावल्याबद्दल त्यांना दोषी धरायचे ? खरे म्हणजे अटलजी–मोरारजींनी एक पाऊल पुढे जाऊन असे सांगायला हवे होते,. की इस्रायलबाबत नेहरूंचे परराष्ट्र धोरण जसेच्या तसे पुढे चालवायला जनता पक्ष काही बांधील नव्हता. नेहरूंची आर्थिक धोरणे बदलून नवे ग्रामाभिमुख नियोजन सुरू करण्याचा जनता पक्षाने प्रयत्न केला. नेहरूंच्या परराष्ट्र धोरणाचा जनता राजवटीकडून पुनर्विचार व्हायला हरकत नव्हती अलितप्ता ठीक आहे पण नेहरू खरोखरच अलिप्ततेचे पालन करीत होते का ? सुवेझवरील पाश्चिमात्य राष्ट्रांच्या आक्रमणाचा तडकाफडकी निषेध करणारे नेहरू हंगेरीवरील रशियाच्या आक्रमणाबद्दल मूग गिळून बसले, तेव्हा जयप्रकाशजींनाही नेहरूंच्या अलिप्ततेबद्दल शंका घ्यावीशी वाटली. अरब देशांशी आपण मैत्री ठेवावी हे ठीक आहे. पण त्यासाठी इस्त्रायला मान्यताही द्यायची नाही, ही अलिप्तता कुठली ? आपली स्वत:ची भूमी बळकावणाऱ्या चीनशीसुद्धा आपण राजनैतिक संबंध जोडले; मग अरबांची भूमी बळकावली म्हणून इस्त्रायला शिक्षा देण्यात


कसली आली आहे सुसंगती ? तेव्हा या प्रश्नाचा पुन्हा विचार करण्यासारखी परिस्थिती जरूर आहे. नेहरूंचे अरब–मैत्रीचे धोरण हे त्यांच्या एकूण मुस्लिमधार्जिण्या प्रवृत्तीचा आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील आविष्कार होता. हा वारसा जसाच्या तसा पुढे चालवण्याची काही आवश्यकता नाही. अरबांशी आपला खूप व्यापार आहे, तो बुडवावा असे कोणीच म्हणणार नाही; पण अरबांनाही आपली काही गरज आहे की नाही ? इस्त्रायलच्या एखाद्या मंत्र्याची गुप्त वा उघडपणे भेट घेतली म्हणून अरब रागावणार असतील किंवा भारतातील त्यांचे मुस्लिम भाईबंद त्यामुळे आपली मते फिरवणार असतील तर आपल्या पक्षनामापुढे 'भारतीय' शब्द अभिमानाने लावणाऱ्यांनी तरी थोडे रागवायला, अशा मतांच्या फिरवाफिरवीकडे दुर्लक्ष करायला हरकत नाही. २८ महिन्यांची जनता राजवट खाली खेचण्यात दिल्लीतील अरब वर्तुळांचा हात होता, हे तरी विसरले जायला नको होते. अरबांशी मैत्री म्हणजे इस्त्रायलशी शत्रुत्व नाही, हे स्पष्ट करून इंदिरा गांधींनी भाजपवर सोडलेले रॉकेट खाली पाडायला हवे होते. त्याऐवजी पुढे आले अपराधी भावनेने केले गेलेले खुलासे ! कशासाठी हा पडखाऊपणा ? आक्रमक हालचाली हा इंदिरा–संजय राजकारणाचा विशेष आहे, हे अजूनही विरोधी पक्षांनी पुरेसे ध्यानात घेतलेले नाही. कम्युनिस्टही याला अपवाद नाहीत. संपबंदी वटहुकुम निघाला. कुठे डाव्या विरोधकांनी तरी रान उठवून दिले आहे ? ज्योती बसू याच सुमारास महाराष्ट्रात येऊन गेले. का नाही एखादा सर्वपक्षीय विराट मेळावा या वटहुकुमाच्या निषेधार्थ मुंबईत त्यांना संघटित करता आला? आसाम आंदोलनातली आपली पडती बाजू सावरून धरणे एवढाच त्यांच्या दौऱ्याचा उद्देश असावा, असे एकूण चित्र दिसले. सत्ता तर हवी आहे पण राजकीय इच्छाशक्ती तर नाही, असे विरोधी पक्ष वागत आहेत. यामुळे ते केवळ विरोधीच राहतील, पर्यायी होणार नाहीत. एवीतेवी सत्तेपासून आता सर्वांनाच काही काळ वंचित राहावे लागणार आहे. मग उगाच काँग्रेसच्याच ध्येयधोरणांची नक्कल गिरवत राहण्याऐवजी स्वतंत्र वाटा चोखाळण्याचे धैर्य दाखवले जाणे आवश्यक आहे. 'आम्ही हा वारसा चालवू', आम्ही ते काम पूर्ण करू.' अशी भावनात्मक आवाहने पुरे झाली. भाजपला आर्थिक आणि सामाजिक सत्तेचे विकेंद्रीकरण हवे आहे. केंद्रीकरणाविरुद्ध मग नुसती ओरड करण्यात काय अर्थ आहे ? लहान उद्योजक, मध्यम व गरीब शेतकरी, शेतमजूर यांच्या संघटना उभ्या करून त्यांच्यामार्फत सत्ता आणि संपत्ती ग्रामीण भागाकडे खेचून नेली पाहिजे. अफगाणिस्तानबाबत भारताचे परराष्ट्रीय धोरण नको तितके रशियानुकूल आहे, असे भाजपला वाटते. तशी टीका अटलजींनी केली. मग का अफगाण बंडखोरांना मदत करण्यासाठी एखादी समिती ताबडतोब भाजपला संघटित करता येऊ नये ? स्पेनमध्ये, चीनमध्ये पूर्वी अशा तऱ्हेच्या आंतरराष्ट्रीय सहकार्याचे, तेथील मुक्तीसैन्याला मदत करण्याचे प्रयोग झालेले आहेत. त्यांचा प्रत्यक्ष परिणाम जरी कमी होत असला तरी वातावरणावर ठसा उमटतो, आपण उपक्रमशील आहोत हे लोकांना जाणवत राहते. आसाम आंदोलनाने केवढी संधी विरोधी पक्षांना आणून दिलेली आहे ! आज केवळ परदेशी नागरिकांविरुद्ध असलेल्या आंदोलनाचे रूपांतर हा प्रश्न निर्माण करणाऱ्या भ्रष्ट व्यवस्थेविरुद्धच्या आंदोलनातही होऊ शकते. हाताळणी कल्पक पाहिजे. नाहीतरी गुजराथ-बिहारमधील आंदोलने सुरुवातीला स्थानिक प्रश्नांभोवतीच निर्माण झालेली होती. जयप्रकाशजींनी आंदोलनाची व्याप्ती व खोली वाढवली व त्याचे टोक शेवटी दिल्लीला नेऊन भिडवले. यालाच नेतृत्व म्हणतात. साध्या लोखंडाचे त्यामुळे सुवर्ण होते. अशी काही करामत दाखवण्याची शक्यता आज फक्त इंदिरा सोडून भाजप किंवा कम्युनिस्ट यांच्याजवळच आहे. पक्ष म्हणून अरस काँग्रेस महाराष्ट्र वगळता कुठेही नसल्याने आणि छत्रीधारी जनता ऊर्फ समाजवादी एकाकी असल्याने त्यांच्याकडून फारशी अपेक्षा बाळगण्यात अर्थ नाही. आणि चरणसिंग तर संधी मिळूनही आणि त्यांच्याजवळ विकेंद्रीकरणाचा ठोस विचार असूनही उत्तरप्रदेशच्या बाहेर पोचूच शकले नाहीत. म्हणून शेवटी स्टीफन यांनी सांगितलेल्या तीन मुख्य प्रवाहांशीच आपण येऊन ठेपतो. आज इंदिरा काँग्रेस हा प्रवाह प्रबळ आहे. उरलेल्या दोन प्रवाहांना भवितव्य आहे. वाण आहे ती कल्पक, आक्रमक व इंदिरा गांधींच्याही पुढे झेप घेणाऱ्या नेतृत्वाची. इंदिरा किंवा संजय गांधींनी लिहिलेले पेपर तपासत बसणे हा काही पर्यायी म्हणून उदयास येऊ पाहणाऱ्या पक्षांचा एकमेव उद्योग ठरू शकत नाही. नवे अर्थकारण, नवे अंतर्गत व परराष्ट्रीय धोरण, पर्यायी विचार, समांतर संघटना ... सत्ता मिळवायला आणि मिळालेली टिकवून धरायला हे सर्व लागतेच. कोण हा सर्व व्याप आज नाही उद्या उभा करू शकेल ? मतदारांनी त्यांना संधी देणे श्रेयस्कर आहे. □


**साप्ताहिक माणूस**

**वर्ष : एकोणिसावे**
**अंक : बावन्नावा**
**२४ मे १९८०**
**किंमत : ७५ पैसे**

संपादक
**श्री. ग. माजगावकर**
साहाय्यक
**दिलीप माजगावकर**
**सौ. निर्मला पुरंदरे**
वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
**साप्ताहिक माणूस**
**१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९**



# पुणे निवडणूक वार्ता । बुरूज ढासळलेले नाहीत....

१९८०च्या जानेवारीमध्ये लोकसभेच्या निवडणुका पार पडल्या आणि वारा पडल्यावर हिंदकळत राहणाऱ्या गलबताप्रमाणे विरोधी पक्षांची अवस्था झाली. गती तर नव्हतीच, पण दिशाही निश्चित नव्हती. त्यातच लोकदल व जनता पक्ष या लोकसभेतील दोन महत्त्वाच्या विरोधी पक्षांच्या चिरफळ्या उडाल्या. लोकदलाचे प्रभु रामचंद्र आणि हनुमान परस्परांविरुद्ध दंड थोपटून उभे राहिले. लोकसभेतील पहिल्या क्रमांकाचा विरोधी पक्ष ( ३९ खासदार ) दुभंगला. जनता पक्षाची स्थितीही याहून निराळी राहिली नाही. पक्षातील भूतपूर्व जनसंघीयांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या दैनंदिन कार्यक्रमात भाग घेऊ नये असा ठराव पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीसमोर आला. ज्यांनी यापूर्वी जनता पक्ष फुटू नये म्हणून प्रसंगी स्वकीयांची टीका पत्करूनही जनसंघीयांची बाजू उचलून धरली अशा नानासाहेब गोरे या ज्येष्ठ नेत्यानेच मतदानाचा आग्रह धरला. पक्षाध्यक्षांनी, अध्यक्षपदाच्या राजीनाम्याची धमकी दिली. तरी आग्रह कायमच राहिला! मतदान झालं. १७ विरुद्ध १४ मतांनी ठराव मंजूर झाला. स्वतंत्र मेळाव्याची तयारी जनसंघीयांनी सुरू केली होतीच. या ठरावामुळे तिला मूर्तस्वरूप आले. रथी–महारथींशी सामना असतानाच जमिनीत रथाचं चाक रुतल्यामुळे असहाय झालेल्या कर्णाप्रमाणे विरोधी पक्षांची अवस्था झाली. तशातच इंदिराजींनी नऊ राज्यांच्या विधानसभा विसर्जित करून निवडणुकांची घोषणा केली आणि मोडकळीस आलेल्या विरोधी पक्षांच्या घराला वादळाचा आणखी एक तडाखा दिला !

देशात जे घडत होते, त्यापेक्षा पुण्यात काही वेगळे घडत नव्हते. जनता पक्षाच्या चिरफळ्या उडाल्यावर लगेच पुण्यातला जनता पक्ष व भारतीय जनता पक्षाचे मेळावे झाले. सरस्वतीमंदिरात झालेल्या या मेळाव्यांमधून दोन्ही पक्षांची वैशिष्टये उघड झाली. एका बाजूला कडक शिस्त, स्वच्छता, टापटीप पण वैचारिकतेचा अभाव, तर दुसऱ्या बाजूला फक्त विचारांच्या फुलबाज्या! विधानसभेच्या निवडणुका जाहीर झाल्यावर दोन्ही बाजूंनी पुन्हा आपापली मोडकी शस्त्रास्त्रे आणि घायाळ सैनिकांची जमवाजमव सुरू केली आणि पुन्हा एकवार निवडणुकीच्या तोफेच्या तोंडाशी दोन्ही पक्ष उभे ठाकले आहेत.

दरम्यान काँग्रेसच्या गोटातही हालचालींना सुरुवात झाली आहेच. छकलं होण्याच्या प्रक्रियेतून काँग्रेसही बचावली नाही. कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री देवराज अरस एका काँग्रेसचे नेतृत्व करत आहेत, तर दुसऱ्या बाजूला देशाच्या सत्ताधारी पक्षाचे नेतृत्व करणाऱ्या इंदिराजी लोकसभेच्या निवडणुकीतील यशदायी 'पंजा' सरसावून सर्व विरोधी पक्षांची गळचेपी करायला रिंगणात उतरल्या आहेत. पक्षांचे स्वतंत्र अस्तित्व दाखवण्यासाठी अध्यक्षांची नावे पक्षाच्या पुढे जोडायला काँग्रेसने १९६९ नंतर सुरुवात केली. तीच प्रथा आजही पुढे चालू आहे.

बोपोडी, शिवाजीनगर, पर्वती, कसबा, भवानी आणि पुणे कॅन्टोन्मेंट हे पुणे शहरातील सहा विधानसभा मतदारसंघ. सहाही मतदारसंघात आपले उमेदवार उभे करण्याचं धारिष्टय दोनच राजकीय पक्षांनी दाखवलं आहे. त्यापैकी एक अर्थातच इंदिराजींचा काँग्रेस पक्ष, तर दुसरा हिंदु महासभा ! या दोन पक्षांमधील फरक फार स्पष्ट करण्याची गरजच नाही. सर्वच्या सर्व जागा जिंकण्याच्या ईर्षेने रिंगणात उतरलेला पक्ष आणि एकही जागा जिंकता येणार नाही याची जाणीव असूनही 'कालो व्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी' या दुर्दम्य आशावादापोटीच जिवंत राहिलेला दुसरा पक्ष असं या लढतीचं स्वरूप आहे.

काँग्रेस (अरस) पक्षानेही सर्व ठिकाणी आपले उमेदवार उभे केले आहेत; पण त्यात त्यांचा मुख्य उद्देश आपले बळ अजमावणे हा आहे. भारतीय जनता पक्षाने पाच ठिकाणी, तर जनता पक्षाने तीन ठिकाणी आपले उमेदवार उभे केले आहेत. बोपोडी मतदार संघात या पक्षाने रिपब्लिकन पक्षाचे (कांबळे गट) माजी आमदार एल. टी. सावंत यांना पाठिंबा दिला आहे, तर माजी गृहमंत्री भाई वैद्य यांच्या भवानी मतदारसंघात अपक्ष उमेदवार नामदेवराव सूर्यवंशी यांना 'भारतीय जनता' चा पाठिंबा मिळाला आहे. याव्यतिरिक्त रिपब्लिकन पक्ष, जनता एस (चरणसिंग गट) व जनता एस (राजनारायण गट) या पक्षांनी प्रत्येकी दोन–दोन उमेदवार उभे केले आहेत. रिपब्लिकन पक्ष ( खोब्रागडे गट व गवई गट ) आणि लेबर पार्टीचे प्रत्येकी एक उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहे. या राजकीय पक्षांच्या बळावर उभ्या असलेल्या उमेदवारांबरोबरच बारा अपक्ष उमेदवारांसह एकूण ४६ उमेदवार या सहा मतदारसंघांमधून मतदारांचा कौल मागण्यासाठी उभे आहेत. सर्वात जास्त (११) उमेदवार उभे राहण्याचा मान शिवाजीनगर मतदारसंघाने पटकावला आहे, तर सर्वांत

कमी उमेदवार (४) कॅन्टोन्मेंटमध्ये आहेत. इतर मतदारसंघांमध्ये बोपोडी (९), भवानी (९), कसबा (७), पर्वती (६) अशी स्थिती आहे. बहुसंख्य बंडखोर उमेदवारांनी उमेदवारीअर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी आपले अर्ज मागे घेतल्यामुळे नोंद घेण्यासारखी बंडखोरी एकाही मतदारसंघात राहिलेली नाही. सहा मतदारसंघांमध्ये मिळून एकूण सात लाख, ५७ हजार १२३ मतदार असून सर्वांत जास्त मतदार शिवाजीनगर व कसबा मतदारसंघात आहेत.(प्रत्येकी एक लाख ४५ हजार) तर सर्वांत कमी मतदार बोपोडी मतदारसंघात आहेत (९८,४६८).

हे सहा मतदारसंघ मिळून पुणे शहराचा लोकसभा मतदारसंघ तयार होतो आणि १९५२ व १९६२ साली सर्वच्या सर्व जागा सत्तारूढ काँग्रेस पक्षाने जिंकल्या, तर सत्तारूढ पक्षाकडून त्या हिसकावून घेण्याचा विक्रम विरोधी पक्षांनी १९५७ व १९७८ च्या विधानसभा निवडणुकीत केला आहे. येत्या विधानसभा निवडणुकीतही विरोधी पक्ष किती मजल गाठतात हे पाहण्यासारखे आहे.

## बालेकिल्ला सुरक्षित

या मतदारसंघांपैकी कसबा मतदारसंघ विरोधकांचा नेहमीच बालेकिल्ला मानला जातो. १९६७ सालच्या निवडणुकीत त्या वेळच्या 'शुक्रवार' मतदारसंघातून जनसंघाचे रामभाऊ म्हाळगी काँग्रेसच्या डॉ बा. पां. आपटे यांचा १७ हजारांहून अधिक मतांनी पराभव करून निवडून आले होते आणि बांगला देशाच्या युद्धानंतर इंदिराजींनी सबंध देशात जबरदस्त वावटळ निर्माण केली असतानाही श्री. म्हाळगींना या मतदार संघाने निसटता का होईना, पण विजय मिळवून दिला होता. त्या वेळी महाराष्ट्रातील २७० जागांपैकी विरोधी पक्षांना फक्त ४८ जागा मिळाल्या होत्या. १९७७ साली पुण्यातल्या मतदारसंघाची फेररचना करण्यात आली. त्यामुळे कसबा व शिवाजीनगर असे दोन स्वतंत्र मतदारसंघ तयार झाले. १९७८ च्या विधानसभा निवडणुकीत कसबा मतदारसंघाने जनता पक्षाच्या डॉ. अरविंद लेले यांना सर्वांत जास्त मतांनी (सुमारे २४ हजार) निवडून दिले. १९८० च्या लोकसभा निवडणुकीत जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते नानासाहेब गोरे यांना काही अनपेक्षित पण त्याही वेळी कसब्यातून तेरा हजारांची आघाडी मिळाली होती, हेही या संदर्भात लक्षात घेण्यासारखे आहे. अर्थात श्री. रामभाऊ म्हाळगींच्या काळापासूनच जनसंघाने–आता भारतीय जनता पक्ष–या मतदारसंघात घट्ट पाय रोवले आहेत आणि त्याच्याच फायदा १९७७, १९७८ व १९८० च्या निवडणुकांमध्ये जनता पक्षाला मिळाला.

या वेळी कसबा मतदारसंघात एकूण सात उमेदवार उभे आहेत. भारतीय जनता पक्षातर्फे माजी आमदार डॉ. अरविंद लेले उभे आहेत तर इंदिरा काँग्रेस या त्यांच्या मुख्य प्रतिस्पर्धी पक्षातर्फे श्री. प्रकाश ढेरे हे महानगरपालिकेचे सदस्य उभे आहेत. याव्यतिरिक्त काँग्रेस ( अरस ) चे शांतिलाल सुरतवाला व हिंदुमहासभेच्या सौ. शांताबाई गोखले हे दोन पक्षीय उमेदवार व तीन अपक्ष उमेदवारही रिंगणात उतरले आहेत. जनता पक्षातर्फे पुण्याचे महापौर पांडुरंग तरवडे यांनी उमेदवारीअर्ज भरला होता, पण अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी त्यांनी तो मागे घेतला. अर्थात ते उभे राहिले असते तरी डॉ. लेले यांच्या मतांवर त्याचा फारसा परिणाम झाला नसता.

तेव्हा डॉ. लेले व श्री. प्रकाश ढेरे यांच्या लढतीचा विचार केला तर आज तरी असे चित्र दिसते की डॉक्टरांचे पारडे पहिल्यापासूनच थोडे जास्त जड आहे. पूर्वीच्या जनसंघाचे याठिकाणी मजबूत संघटन आहे हे याचे एक कारण आहे, पण त्याचबरोबर डॉ. अरविंद लेले यांचा जनतेशी सतत संपर्क व कार्य हेही त्यांना विजयाच्या दिशेने घेऊन जातील. याउलट इंदिरा काँग्रेसने पक्षसंघटनेकडे कधीच लक्ष दिलेलं नाही, हे राष्ट्रीय पातळीवरील चित्र इथेही कायम आहे. तसेच श्री. ढेरे यांचाही प्रभाव या मतदारसंघात त्यांच्या स्वतःच्या महापालिकेच्या वॉर्डपलीकडे फारसा नाही. लोकसभा निवडणुकीच्या वेळी मतदारयाद्यांमध्ये गोंधळ झाल्यानंतर डॉ. लेले यांच्या कार्यकर्त्यांनी सुमारे पाच हजार नवीन मतदारांची नोंदणी करून घेतली. या नोंदणीचाही मोठा भाग त्यांच्याच पेटीमध्ये पडणार आहे. तसंच कसबा मतदार संघातील १६ नगरसेवकांपैकी चार नगरसेवक डॉ. लेले यांच्या पक्षाचे आहेत, ही त्यांची आणखी जमेची बाजू.

काँग्रेस (अरस) ने या मतदारसंघात शांतीलाल सुरतवाला या महापालिकेतील तरुण नगरसेवकाला तिकीट दिलं आहे. काँग्रेस आणि काँग्रेस आय या दोन्ही पक्षांचे मतदार फारसे निराळे नसतात त्यामुळे श्री. सुरतवाला किती मतं मिळवू शकतात यावरही डॉ. लेले यांचे यश अवलंबून आहे. कारण त्यांच्या उमेदवारीचा फटका साहजिकच इंदिरा काँग्रेसला बसणार आहे. हे सर्व लक्षात घेता १९६७ पासून अनेक ऊन-पावसांच्या काळात जनसंघीयांना एकनिष्ठपणे साथ देत आलेला कसबा मतदारसंघ आपली भूमिका याही वेळी चोखपणे बजावेल आणि डॉ. लेले यांना विजयी करून विधानसभेतील त्यांची जागा त्यांना पुन्हा मिळवून देईल यात आज तरी काही शंका वाटत नाही.

## शिवाजीनगर : अण्णा जोशी

कसब्याखालोखाल शिवाजीनगर हा भारतीय जनता पक्षाचा दुसरा किल्ला आहे. योगायोग म्हणजे या इथे पुणे शहर जनता पक्षाचे माजी अध्यक्ष व भारतीय जनता पक्षाचे विद्यमान अध्यक्ष अण्णा जोशी आणि उरल्या-सुरल्या जनता पक्षाचे सध्याचे अध्यक्ष पोपटराव खिलारे या निवडणुकीत परस्परांसमोर उभे आहेत. अर्थात अण्णा जोशींची खरी लढत जनता पक्षापेक्षाही इंदिराजींच्या काँग्रेसशीच आहे. त्या पक्षाने या वेळी श्रीधर माडगूळकर या तरुण उमेदवाराला तिकिट दिले आहे. १९७८ च्या विधानसभा निवडणुकीत जनता पक्षाच्या तिकिटावर निवडून आलेल्या सौ. शांती नाईक या वेळी धारिष्ट्य करून जनता पक्ष (राजनारायण गट)च्या तिकिटावर उभ्या आहेत. गेल्या निवडणुकीत जनता पक्षाची लाट आणि पाठिंबा असूनही या बाई जेमतेम बारा हजार मतांनी निवडून आल्या होत्या. कारण त्यांची स्वतःची या दीड लाखाच्या मतदारसंघात अजिबात प्रतिमा नाही. तेव्हा या वेळी त्यांच्या हातून निवडणूकआयोगाला अनामत रक्कम दान देण्यापलीकडे फारसे काही घडेल असे वाटत नाही. जनता

पक्षाचे अध्यक्ष पोपटराव खिलारे यांचीही ओळख एक चांगले कार्यकर्ते व नगरसेवक इतकीच करून देता येईल. झोपडपट्टयांच्या प्रश्नावाबत त्यांनी विशेष लक्ष घातले होते. महानगरपालिकेच्या गलिच्छ वस्ती निर्मूलन समितीचे ते अध्यक्षही होते; पण शिवाजी-नगर मतदारसंघात झोपडपट्टीतील एकूण मतदारांची संख्याच १०–१५ हजारांच्या आसपास आहे आणि त्यातील बरीचशी मते परंपरागत पद्धतीने काँग्रेसच्या झोळीत पडत असतात. त्यामुळे या कार्याचा निवडणुकीच्या दृष्टीने पोपटरावांना फारसा उपयोग होणार नाही. इंदिरा काँग्रेसचे उमेदवार श्रीधर माडगुळकर यांची तर कार्याच्या बाबतीत अगदीच केविलवाणी परिस्थिती आहे. त्यांनी स्वत: प्रसिद्धीला दिलेल्या पत्रकातही झोपडपट्टयांची सुधारणा व मुंबई–पुणे रस्त्याचे रुंदीकरण या प्रश्नांमध्ये लक्ष घातले ' यापलीकडे त्यांच्या कार्याची ओळख करून दिलेली नाही. कारण अजून त्यांनी फारसं कार्य केलेलेच नाही. तेव्हा गीतरामायणकार कै. ग. दि. माडगुळकरांचे चिरंजीव हीच त्यांची त्यातल्या त्यात जमेची बाजू; पण तिथेही पुन्हा अडचण अशी आहे की, गदिमांना ओळखणारा मतदार मध्यम-वर्गीय व सुशिक्षित आहे आणि या मत-दाराचे मत सदैव काँग्रेसच्या विरोधातच गेलं आहे.

या मतदारसंघातून जनता पक्षातर्फे श्री. निळूभाऊ लिमये यांनीही अर्ज भरला होता. त्यामुळे जनता पक्षाच्या गोटात दोन–तीन दिवस अस्वस्थतेचे आणि अस्थिरतेचे गेले. पक्षश्रेष्ठींकडून उलट–सुलट आदेश आल्याच्या वावड्याही उठल्या; पण शेवटी पोपटराव खिलारे यांची उमेदवारी अधिकृतपणे जाहीर करण्यात आली व निळूभाऊंनीही अर्ज मागे घेतला. जर पोपटरावांची उमेदवारी रद्द करून ती निळूभाऊंना देण्यात आली असती किंवा निळूभाऊ बंडखोर म्हणून जरी उभे राहिले असते तरी अण्णा जोशींना निवडणूक फार कठीण गेली असती; पण जनता पक्षानेच पोपटरावांना उमेदवारी देऊन त्यांचं काम सोपं करून टाकलं आहे

जनता पक्षातून पूर्वाश्रमीचे जनसंघीय बाहेर पडले असले तरी त्या पक्षातला घटकवाद अजून संपलेला नाही, याचं निळू-भाऊ–पोपटराव उमेददारी हे उत्तम उदाहरण आहे. या संदर्भात राजकीय वर्तुळात असं बोललं जातं की गुणवत्तेच्या दृष्टीने निळूभाऊ पोपटरावांपेक्षा खूपच वरचढ आहेत हे जनता पक्षातील बहुतेकांना मान्य होतं; पण पुणे शहरातून पूर्वीच्या समाजवादी गटाच्या दोघांना ( विठ्ठल तुपे – कॅन्टोन्मेंट व भाई वैद्य – भवानी ) उमेदवारी दिली असताना आणखी एक जागा त्यांच्याच गटाला देणं योग्य नाही असं मत पूर्वाश्रमीच्या संघटना काँग्रेसच्या नेत्यांनी व्यक्त केलं. केंद्रीय पातळीवर प्रकरण गेलं. माजी खासदार संभाजीराव काकडे, महाराष्ट्र जनता पक्षाचे अध्यक्ष बब्रनराव ढाकणे यांनी पोपटरावांच्या बाजूने जोर लावला आणि तिकिट त्यांच्या खिशात टाकलं.

या सर्व पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या अण्णा जोशी यांचं व्यक्तिमत्त्व अधिक उठून दिसतं. महानगरपालिकेतील अकरा वर्षं नगरसेवक म्हणून केलेलं काम, उपमहापौरपदाची जबाबदारी, युवकांच्या संघटना, पानशेत पूरग्रस्तांचं पुनर्वसन इत्यादी निरनिराळ्या सामाजिक क्षेत्रात केलेल्या कामाचा अनुभव व पुण्याई त्यांच्या पाठीशी आहे. शिवाय एकूण मतदारांपैकी जवळजवळ चाळीस टक्के मतदार भारतीय जनता पक्षाच्या मागे एकनिष्ठपणे उभा आहे. तसंच व्यक्ती पाहून मत देणाऱ्या तटस्थ मतदारांची जी मतं निळूभाऊ लिमयांना गेली असती तीही आता अण्णांच्याच बाजूला झुकतील ! त्यामुळे इंदिरा काँग्रेस व काँग्रेस (अरस) च्या उमेदवारांचा अननुभव, जनता पक्षाच्या उमेदवाराची मर्यादित शक्ती आणि तरीही या तीन उमेदवारांमध्ये मतांसाठी होणारी रस्सीखेच याचा अप्रत्यक्ष फायदाही अण्णा जोशींना मिळेल व अत्यंत वैविध्यपूर्ण मतदार असलेल्या शिवाजीनगरचे विधानसभेमध्ये ते प्रतिनिधित्व करतील असंच चित्र आज दिसत आहे.

## न हटणारे भाई

ज्याप्रमाणे कसबा हा भारतीय जनता पक्षाचा मतदारसंघ त्याप्रमाणे भवानीपेठ हा काँग्रेसचा हक्काचा मतदारसंघ आहे. सुमारे सव्वा लाख मतदार असलेल्या भवा-नीचे स्वरूप अतिशय वैविध्यपूर्ण आहे. इथे झोपडपट्टयांमधूनच सुमारे पंचवीस हजार मत-दार आहेत; पण त्याच्याचबरोबर अलिशान बंगले आणि हाउसिंग सोसायट्यांचीही संख्या इथे कमी नाही. मध्यमवर्गीय सुशिक्षित हा पृथ्वीच्या पाठीवर कुठेही त्रिशंकूसारखा लोंबकळणारा वर्गही इथे आहेच. मुस्लिम मतदारांची 'भवानी'मधील संख्या वीस हजारांवर जाते आणि भटक्या जमातींमधील मतदारही दहाएक हजारांच्या आसपास आहेत. यांच्याबरोबर सिंधी, ख्रिश्चन आणि दाक्षिणात्य मंडळींचा भरणाही या मतदार-संघात कमी नाही !

असा हा बहुरंगी, बहुढंगी मतदारसंघ काँग्रेसचा बालेकिल्ला समजला जातो. कारण १९७७ च्या ऐतिहासिक लढाईतसुद्धा इथे काँग्रेसच्या उमेदवाराने बाराशे मतांची आघाडी घेतली होती. १९७८ च्या विधान-सभा निवडणुकीत काँग्रेस (आय) व काँग्रेस (अरस) या दोन पक्षांची मतं एकत्र केली तर ती भाई वैद्य यांना पडलेल्या मतांपेक्षा दोन हजारांनी जास्तच भरतात. गेल्या वर्षी झालेल्या महापालिकेच्या निवडणुकीतही इंदिरा काँग्रेसने या मतदारसंघातील सोळा-पैकी आठ जागा जिंकन 'भवानी'वरील आपली पकड स्पष्ट केली.

पण या सगळ्यावर मात करून विजयश्री खेचून आणण्याची ताकद भाई वैद्य यांच्या-मध्ये आहे. त्यांचे गुण नि त्यांनी केलेलं कार्य याही वेळी तारून नेईल असा राजकीय निरी-क्षकांचा अंदाज आहे. महापालिकेचे नगर-सेवक म्हणून भाईंनी आपल्या राजकीय–सामाजिक कार्याला सुरुवात केली. झोपड-पट्टीवासियांना ओळखपत्रं, भाडेकरूंना नळ, हॉटेलांचे वर्गीकरण, झोपडपट्टयांमधून बाल-वाड्या ही त्यांची काही सुरुवातीची कामे. पुण्याचे महापौर झाल्यावरही सत्तेचा उपयोग सुखासाठी न करता भाईंनी तो संघर्षासाठी केला. त्यांची ही संघर्ष करण्याची वृत्ती, त्यांचं मंत्रिपद आलं आणि गेलं तरी कायम राहिली आहे आणि त्यामुळे येत्या निवड-णुकीतही भाई मागे हटणार नाहीत असा अंदाज आहे.

भाईंच्या बिरुद्ध मुख्य उमेदवार आहेत ते काँग्रेस–आयचे अमिनुद्दीन पेनवाले. आज-पर्यंतचा भवानी मतदारसंघाचा इतिहास पाहता पेनवाले ही लढत सहज जिंकतील असे सामान्य माणसाला वाटण्याची शक्यता आहे; पण प्रत्यक्षातील परिस्थिती अगदी निराळी आहे. अंतर्गत धुसफूस आणि नाराजी, काँग्रेस–आयचे या निवडणुकीतील वैशिष्टय इथेही कायम आहे. पेनवालेव्यतिरिक्त 'भवानी'मधील काँग्रेस–आयच्या आणखी चार नगरसेवकांनी पक्षश्रेष्ठींकडे खेपा मारून उमेदवारीसाठी निकाराचे प्रयत्न केले होते. शिवाय सर्वांना सांभाळून घेऊन पुढे जाणं पेनवाले यांच्या स्वभावातच नाही त्यामुळे मुस्लिम समाजापलीकडे त्यांचं फारसं कामही नाही. १९८० च्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी प्रसिद्ध चित्रपटअभिनेत्री नर्गिस पुण्या-मध्ये इंदिरा काँग्रेसच्या प्रचाराला आली होती. शनिवारवाड्यावर तिची सभा सुरू झाली आणि व्यासपीठाखाली पक्षातील पेनवाले यांचे

पाठीराखे व विरोधक यांच्यात सरळ गुद्दा-गुद्दीलाच सुरुवात झाली ! शेवटी नगिसने व्यासपीठावरून हस्तक्षेप केला व प्रकरण तेवढ्यावरच थांबलं. पुण्यामध्ये १४ मेला झालेल्या इंदिराजींच्या सभेबद्दलही इंदिरा काँग्रेसच्या गोटात चर्चा चालू आहे. संध्या-काळी सहाच्या सुमारालाही दहा–पंधरा हजारापलीकडे श्रोते मिळू नयेत ही अवस्था चरणसिंगांच्या सभेपेक्षा फारशी निराळी नाहीं. पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये असलेला कमालीचा निरुत्साह आणि नाराजी याला कारणीभूत आहे. अर्थात इंदिराजींचं असे वैशिष्टच सांगितलं जातं की त्यांच्यात आणि मतदारांमध्ये 'डायरेक्ट हॉट लाइन' आहे; पण एका काँग्रेस–आयच्या कार्यकर्त्याची त्यावरची कॉमेंट ऐकण्यासारखी आहे. तो म्हणाला, 'ही हॉट लाइन वगैरे ठीक आहे; पण ती किमान जोडून द्यायला ऑपरेटर तरी हवा का नको? बाईंच्या सभेला आम्ही जर ट्रक आणि ट्रॅक्टरमधून माणसंच घेऊन आलो नाही तर ही 'हॉट लाइन' जुळणार तरी कशी ? ' मुद्दा विचा-रात घेण्यासारखा आहे आणि त्यापाठोपाठच या संदर्भात इंदिराजींचे निघालेले चौकशीचे आदेशही !

भवानी मतदारसंघातील आपली जागा टिकवण्याच्या दृष्टीने १९७८ प्रमाणेच याही वेळी भाई वैद्य यांना काँग्रेस पक्षातील खिंडा-राचा उपयोग होणार आहे. काँग्रेस (अरस) तर्फे या मतदारसंघात सौ. शीला किराड उभ्या आहेत. काँग्रेस ( अरस ) चेच महा-पालिकेतील नगरसेवक बबनराव किराड यांच्या त्या पत्नी. शीलाबाई निवडून जरी येऊ शकत नसल्या तरी इंदिरा काँग्रेसची मतं खाण्याचं सामर्थ्य त्यांच्यामध्ये निश्चित आहे. विशेषत: श्री. पेनवाले यांच्यावरील वैयक्तिक नाराजीमुळे परंपरागत पद्धतीने काँग्रेसला मत देणाऱ्या मतदाराला सौ.शीला-ताई हा चांगलाच पर्याय मिळाला आहे. शिवाय 'भवानी' मधील व्यापारीवर्गही त्यांच्या मागे मोठ्या प्रमाणात उभा राहील. 'रहीमके लिये याद रखना' हा श्री. पेनवाले यांचा जातीय पातळीवरून चाललेला प्रचा-रही त्यांना महागात पडेल असं चित्र आज दिसत आहे. कारण प्रचारामुळे एके काळी पेनवालेंच्या जवळ,असणारे सुशिक्षित मुस्लिम कार्यकर्ते त्यांच्यापासून दूर गेले आहेत आणि याचमुळे १९७९ च्या महानगरपालिकेच्या निवडणुकीत इंदिरा काँग्रेसच्या या शहर-अध्यक्षाला आपल्या वार्डातून देखील निवडून येता आलं नाही !

### वेधक झुंज .... पर्वती

सहा उमेदवार उभे असलेल्या पर्वती मत-दारसंघातही (राखीव) खरी लढत कसबा–शिवाजीनगरप्रमाणे भारतीय जनता पक्ष आणि इंदिरा काँग्रेसमध्येच आहे. पुण्यातील मतदारसंघामध्ये झोपडपट्टयांनी व्यापलेला मतदारसंघ म्हणून हा भाग ओळखला जातो. इथे झोपडपट्टयांमधून सुमारे ५० ते ६० हजार मतदार आहेत; पण पूर्वीपेक्षा या मत-दारसंघाचं स्वरूप आता पुष्कळच बदललं आहे विजयानगरकॉलनी, महर्षीनगर, सह-कारनगर, मुकुंदनगर, सॅलिस्बरी पार्क, आदिनाथ सोसायटी, बिबवेवाडी, पद्मावती या सर्व परिसरात अनेक टुमदार बंगले आणि हाउसिंग सोसायट्या उभ्या राहिल्या आहेत. प्रश्न आहे तो फक्त इथे राहणाऱ्यांना मत-दानासाठी बाहेर काढण्याचा आणि ती क्षमता भारतीय जनताच्या कार्यकर्त्यांमध्ये निश्चित आहे.

पर्वती मतदारसंघाचे या वेळचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे कोणाही सुशिक्षित माणसाला रुचतील असे उमेदवार इथे 'भारतीय जनता' व 'इंदिरा काँग्रेस'ने ही उभे केले आहेत. विश्वास गांगुर्डे हा भारतीय जनताचा तरुण उमेदवार महापालिकेचा सभासद आहे. आपल्या मतदारसंघातील झोपडपट्टयांचा वरचष्मा लक्षात घेऊन विश्वासनेही धडाक्याने कामं सुरू केली आहेत. झोपडपट्टयांमध्ये नळ, ड्रेनेज, संडास, वीज इत्यादी सोयींबरोबरच त्याने आपल्या कार्यकर्त्यांच्या मदतीने दहा बालवाड्या आणि आरोग्यशिबिरेही चालवली आहेत.

इंदिरा काँग्रेसचे श्री. वसंत चव्हाण इंग्रजीचे पदवीधर असून सध्या कायद्याचा अभ्यास करत आहेत. १९७४ पासून ते महापालिकेचे सभासद आहेत. तसंच इंटक, खडकीची ॲम्युनिशन फॅक्टरी, इन्स्पेक्टोरेट ऑफ आर्मामेंट या कामगार-संघटनांचे श्री. चव्हाण अध्यक्षही आहेत. उत्तम कार्यकर्ता, चांगला वक्ता व अभ्यासू नगरसेवक म्हणून त्यांचा लौकिक आहे.

त्यामुळे 'पर्वती' मधील ही झुंज अतिशय वेधक होणार आहे. आजपर्यंतची परंपरा पाहता इंदिरा काँग्रेसच ही जागा जिंकेल असा श्री. चव्हाण यांच्या कार्यकर्त्यांचा विश्वास आहे, तर इतर मतदारसंघांप्रमाणेच इथेही काँग्रेस (आय) व काँग्रेस (अरस) मध्ये मते विभागली जातील आणि त्याचा फायदा भारतीय जनतालाच मिळेल असा त्या पक्षाच्या कार्यकर्त्यांचा अंदाज आहे. जनता पक्षाने या मतदारसंघात आपला उमेदवार उभा केलेला नाही हे या दृष्टीने लक्षात घेण्यासारखे आहे. तसंच पर्वती मतदारसंघातील दलित समाजाची मतंही सरळ सरळ इंदिरा काँग्रेसकडे न जाता काँग्रेस(अरस)चे शंकरराव मात्रे, रिपब्लिकन पक्षाचे ( गवई गट ) बाबुराव भोसले आणि अपक्ष उमेदवार–दलित साहित्यिक नामदेव ढसाळ यांच्यामध्येही ती वाटली जातील असा अंदाज आहे.

या सर्व परिस्थितीमुळेच वरवर जरी पर्वती मतदारसंघ इंदिरा काँग्रेसला अनुकूल वाटत असला तरी प्रतिस्पर्धी भारतीय जनता पक्षाच्या उमेदवाराची ताकदही कमी मानून चालणार नाही असं वातावरण या मतदार-संघात आज दिसत आहे.

पुणे कॅन्टोन्मेंट आणि बोपोडी हे पुणे शहरातील आणखी दोन विधानसभा मतदार-संघ. यापैकी कॅंटोन्मेंट मतदारसंघाची निवड-णूक फार वेगळ्या मुद्द्यावर जनता पक्ष, इंदिरा काँग्रेस व काँग्रेस (अरस) चे उमेद-वार लढवत आहेत.

१९७८ साली थेऊर येथील यशवंत सह-कारी साखर कारखान्याच्या संचालक मंड-ळाची निवडणूक झाली. त्यामध्ये कॅन्टोन्मेंट मतदार संघातील जनता पक्षाचे माजी आम-दार व या निवडणुकीतले उमेदवार श्री. विठ्ठल तुपे यांचे पॅनेल होते. इंदिरा काँग्रेसचे या मतदारसंघातील उमेदवार श्री. शिवाजी-राव घुले यांचेही पॅनेल होते आणि इंदिरा काँग्रेसकडून कँटोन्मेंटमध्ये तिकिट मिळत नाही हे लक्षात आल्यावर काही दिवसांपूर्वीच काँग्रेस (अरस)च्या डेऱ्यामध्ये दाखल होऊन तिकिट मिळवलेल्या श्री. जयसिंगराव ससाणे यांनी दोन उमेदवार स्वतंत्रपणे उभे केले होते; पण त्या निवडणुकीत श्री. घुले यांचे पॅनेल विजयी होऊन श्री. तुपे आणि श्री. ससाणे यांचे उमेदवार पार भुईसपाट झाले ! त्यामुळे या विधानसभा निवडणुकीकडे सामान्य मतदार कोणत्याही दृष्टीने पाहात असला तरी थेऊरच्या यशवंत स. साखर-कारखान्यावरील आपली पकड अधिक घट्ट करण्यासाठी शिवाजीराव नि ती ढिली करण्या-साठी विठ्ठलराव आणि जयसिंगराव या निवड-णुकीत उतरले आहेत. त्यामुळे या मतदार-

पृष्ठ २४ वर



राणी माँ – आज हताश !

पूर्वांचलाचे आव्हान । लेखांक चौथा

# राणी गायडिंलो यांची हाराका चळवळ

विनय सहस्रबुद्धे

देशाच्या एका कोपऱ्यात, दुर्गम भू-प्रदेशात वर्षानुवर्षे उपेक्षित राहिलेल्या पूर्वांचलातील मेघालय व नागभूमी या दोन राज्यांतील वाढते ख्रिस्तीकरण आणि त्याशिवाय या प्रदेशात उभी ठाकलेली अन्य आव्हाने यांची तोंडओळख याआधीच्या लेखांकांतून झाली आहे. या समारोपाच्या लेखांकात नागभूमीतील हाराका चळवळ व तिच्या प्रणेत्या राणी गायडिंलो यांचे कार्य, याचा धावता आढावा घेतला आहे. शिवाय अखेरीस या भागातील अन्य राज्यातील परिस्थिती, सबंध पूर्वांचलाची सुखदुःखे, समस्यांची गुंतागुंत व या सर्व परिस्थितीवरील उपाय इ. मुद्देही आहेतच.

मेघालयातील सेंग खासींप्रमाणेच ख्रिस्तीकरणाच्या विरोधात खंबीरपणे उभे राहून नागांच्या स्वतंत्र सांस्कृतिक वैशिष्ट्यांचे अविरत जतन करण्यासाठी हाराका चळवळ किंवा हाराका पंथ स्थापन करण्यात आला. अस्मिता आणि स्वाभिमान हाच या चळवळीचा प्राण आहे. त्यामुळे केवळ धार्मिकच नव्हे तर राजकीय दडपशाहीविरुद्ध सुद्धा 'हाराका' पंथीय लढले आहेत. हा सारा इतिहास, या चळवळीच्या नेत्या राणी गायडिंलो यांच्या जीवनचरित्राशी अतिशय निगडित असल्यामुळे प्रथम त्याचाच तपशील पाहायला हवा.

राणी गायडिंलो आज सर्वत्र 'राणी माँ' म्हणून ओळखल्या जात असल्या तरी त्यांचा कोणत्याही राजघराण्याशी यत्किंचितही संबंध नव्हता, आजही नाही. आज मणिपुरात असलेल्या लोंगकाओ या गावी एका गरीब कुटुंबात २६ जानेवारी १९१५ रोजी त्या जन्मल्या. त्यांचे जन्मगाव हाओजोंगबूट नावाच्या पर्वतशिखरावर वसलेले असल्यामुळे व सभोवार घनदाट अरण्य असल्यामुळे साहसाची आवड उपजतच त्यांच्यात निर्माण झाली. झाशीच्या राणीची आठवण करून देणाऱ्या या उपजत साहसी वृत्तीमुळे, त्यांचा चुलतभाऊ जादोनांग याने सुरू केलेल्या जुलमी ब्रिटिश राजवटीविरुद्धच्या चळवळीत त्या वयाच्या अवघ्या १३ व्या वर्षीच सामील झाल्या. मणिपूर आणि नागभूमीच्या दऱ्याखोऱ्यांतून ब्रिटिश राजवटीविरुद्ध गनिमी काव्याने लढण्याचे त्यांचे प्रयोग यशस्वी होतात न होतात, तोच जादोनांग ब्रिटिशांच्या हाती लागला व चळवळ काहीशी थंडावली. पुढे ब्रिटिश सरकारने जादोनांगला फाशी दिल्यानंतर मात्र अधिक त्वेषाने ब्रिटिशांविरुद्धचा लढा सुरू झाला व नुकतेच तारुण्यात पदार्पण केलेल्या राणी गायडिंलोकडे या लढ्याचे नेतृत्व करण्याची जबाबदारी आली.

दक्षिणेस बराकनदीच्या खोऱ्यापासून उत्तरेस मोकोकचुंगपर्यंतच्या दुर्गम पहाडी प्रदेशात ब्रिटिशांविरुद्धच्या लढ्याची ज्योत सदैव जागती ठेवण्याचे काम राणी गायडिंलो यांनी मोठ्या धडाडीने स्वीकारले. 'आपण जन्मतःच स्वतंत्र आहोत, त्यामुळे कोणतेही कर किंवा अन्य जुलमी कायदे आपल्यावर लादण्याचा ब्रिटिशांना काही अधिकार नाही', असे सांगून 'कर भरू नका व कायदे पाळू नका' असा संदेश राणी गायडिंलो यांनी समस्त नागा बांधवांना दिला व ब्रिटिशांच्या दमननीतीविरुद्ध नागांमध्ये जागृती निर्माण केली. त्याचबरोबर या सबंध चळवळीला सामाजिक व धार्मिक अधिष्ठान मिळावे यासाठीही राणी गायडिंलो यांनी प्रयत्न केले. झेमी, लिआंगमेई व रोंगमेई या तीन नागा जमातींमधील ऐक्य वाढीस

लागावे यासाठी 'झेलिआंगरोंग' ही एकच जमात असल्याचे त्यांनी जाहीर केले. विखुरलेल्या व आपापसातील मतभेदांमुळे, अंतर्गत लढायांमुळे सत्त्वहीन झालेल्या या तिन्ही जमातींच्या नागांच्या मनात यामुळे एक आत्मविश्वास जागृत झाला आणि खऱ्या अर्थाने नागांचे एकात्मीकरण सुरू झाले. त्याचबरोबर परंपरागत नागासंस्कृती टिकवून धरण्यासाठी व ख्रिस्तीकरणाच्या विरोधात जनमत तयार करण्यासाठी त्यांनी 'हाराका' पंथाची स्थापना केली. अशा प्रकारे जादोनांग याने सुरू केलेल्या ब्रिटिशविरोधी लढ्याला सामाजिक व धार्मिक अधिष्ठान देऊन या चळवळीचा पाया अधिक खंबीर राहण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले.

जादोनांगच्या लढ्याचं नेतृत्व हाती येताच राणी गार्यडिलो यांनी संघर्षाची धार तीव्र करण्याचा निर्धार केला. त्यासाठी पश्चिम मणिपूर, दक्षिण नागभूमी व आसामातील उत्तर काचार जिल्ह्यात त्यांनी भूमिगत हालचाली सुरू केल्या. ब्रिटिश सत्ताधिशांच्या अन्याय व अत्याचारांनी पीडलेल्या शेकडो नागरिकांनी राणी गार्यडिलो व त्यांच्या सहकाऱ्यांना उदार आश्रय दिला आणि हरतऱ्हेची मदतही केली. परिणामतः भूमिगत आंदोलकांच्या छुप्या कारवायांचा सुळसुळाट इतका वाढला की, ही चळवळ दडपून टाकण्यासाठी सरकारला सर जे. पी. मिल्स या खास अधिकाऱ्याची नागा हिल्स जिल्ह्याचा उप-आयुक्त म्हणून नेमणूक करावी लागली. शिवाय त्याच्या दिमतीला आसाम रायफल्सच्या दोन तुकड्याही देण्यात आल्या होत्या. सर जे. पी. मिल्स याने लगेचच मोठ्या प्रमाणावर धरपकड सुरू केली. राणी गार्यडिलोला पकडण्यासाठी रोख रकमांची बक्षिसेही जाहीर केली.

राणी गार्यडिलोच्या समर्थकांचे नीतिधैर्य ढळावे यासाठी तत्कालीन मणिपूर सरकारनेही दडपशाही सुरू केली. राणीच्या समर्थकांची गावेच्या गावे जाळून टाकण्यात आली. या सर्व धुमश्चक्रीत पोलिसांच्या हातावर तुरी देत कधी या गावी तर कधी त्या गावी असा राणी गार्यडिलोचा प्रवास सुरू होता. तिच्या हालचालींबद्दल सर्वत्र उत्सुकता होती आणि नागांच्या जवळजवळ सर्व जमातींमध्ये राणीची कीर्ती पसरली होती. याच काळात पुलोमी या गावात राणी व तिच्या पाठिराख्यांचा मुक्काम असताना १७ ऑक्टोबर १९३२ रोजी पोलिसांनी अचानक सबंध गावावर धाड घातली व बेसावध पाठिराख्यांसह राणी गार्यडिलोला अटक करण्यात आली. इंफाळच्या न्यायालयात राणी गार्यडिलोवर खटला भरण्यात आला व अवघ्या १७ वर्षांच्या या धीरोदात्त बंडखोर तरुणीस न्या. हिगिन्स यांनी राजद्रोहाच्या आरोपावरून जन्मठेपेची सजा फर्मावली. गौहाती, शिलाँग, ऐझॉल आणि तुरा इ. ठिकाणच्या कारागृहांतून राणी गार्यडिलो यांनी आपल्या कारावासाची १४ वर्षे काढली.

## नेहरूही प्रभावित

दरम्यान महात्मा गांधी व पं नेहरू यांच्या कानांवर गार्यडिलोच्या या अनोख्या संघर्षाची हकीगत गेलीच होती. १९३७ मध्ये आपल्या आसामच्या दौऱ्यात पं. नेहरूंनी ठिकठिकाणी या संघर्षाच्या गौरवार्थ भाषणे केली व 'विजेसारखी चमकणारी ही तरुणी नागांची शूरवीर राणी शोभते!' असे उद्गार काढले. नेहरूंनी दिलेली ही पदवी पुढे सतत उल्लेखण्यात आली व म्हणूनच श्रीमती गार्यडिलो आज राणी गार्यडिलो म्हणूनच सर्वपरिचित आहेत.

१९३७ मध्येच काँग्रेसच्या अनेक नेत्यांनी राणी गार्यडिलोच्या सुटकेसाठी थेट लंडनपासून प्रयत्न सुरू केले; पण अद्याप राणीच्या हस्तकांची चळवळ थंडावलेली नसल्याने गार्यडिलो यांची सुटका धोकादायक ठरेल असे सांगून ब्रिटिशांनी ही मागणी फेटाळून लावली. स्वातंत्र्याच्या ईर्षेने पेटून स्वतःला संघर्षात झोकून देणाऱ्या या नागा—युवतीला अखेर ऐन तरुणाईची, उमेदीची, चौदा वर्षे कारागृहाच्या गजाआड, हालअपेष्टा भोगत अक्षरशः खितपत काढावी लागली! १९४७ साली भारत स्वतंत्र झाल्यावरच राणी गार्यडिलो यांची सुटका होऊ शकली. स्वतंत्र भारताच्या सरकारने नागभूमीतील यीमरूप या ठिकाणी राणीच्या निवासाची सोय करून उदरनिर्वाहासाठी दरमहा नियमित रक्कम देण्याचीही व्यवस्था केली.

भारत स्वतंत्र झाल्यामुळे राणींच्या कार्यामागचे राजकीय उद्दिष्ट साध्य झाले होते. पण याच सुमारास वाढत्या ख्रिस्तीकरणामुळे धार्मिक व सामाजिक क्षेत्रातील आव्हाने अधिक भीषण बनली होती. राणी गार्यडिलोने स्थापन केलेल्या हाराका पंथीयांचा ख्रिस्तीकरणास व बंडखोर नागांच्या विघटनवादी चळवळीस पाठिंबा नसल्यामुळे बंडखोर नागांनी हाराकांवर हल्ले करण्यास सुरुवात केली. १९५६ ते १९६० या काळात असे छुपे हल्ले मोठ्या प्रमाणावर वाढले, कित्येक हाराकापंथीयांचे दिवसाढवळ्या खून पडू लागले! परिणामतः १९६० च्या अखेरीस राणी गार्यडिलो यांना पुन्हा एकदा भूमिगत व्हावे लागले. भूमिगत असतानाच सुमारे एक हजार हाराकापंथीयांचे शिस्तबद्ध सैन्य त्यांनी उभारले. त्यासाठी शस्त्रे जमा केली आणि चाळिशी ओलांडलेली ही अशिक्षित बाई पुन्हा एकदा पदर खोचून हाराकांच्या सुरक्षिततेसाठी ताठ मानेने, नव्या आत्मविश्वासाने उभी राहिली! शेवटी केन्द्र सरकारने हस्तक्षेप करून १९६६ मध्ये राणी गार्यडिलो यांना प्रकट होण्याचे आवाहन केले व कोहिमात त्यांची सर्व व्यवस्था करून या स्वातंत्र्यसैनिक स्त्रीला स्वस्थपणे आपले कार्य करता येईल अशी स्थिती निर्माण केली. १९७२ मध्ये पंतप्रधानांनी राणी गार्यडिलोंना ताम्रपत्र देऊन स्वातंत्र्यसंग्रामातील त्यांच्या कामगिरीचा गौरव केला.

'हाराका' चळवळीच्या रूपाने राणी गार्यडिलो यांचे कार्य आजही अविरतपणे सुरू आहे. झेलिआंगरोंग या नावाच्या तीन जमातींना एकत्र आणून त्यांनी स्थापन केलेल्या नव्या जमातीत ऐक्य वाढीस लागावे व ख्रिस्तीकरणाच्या धोक्यापासून या जमातीचा बचाव व्हावा यासाठी त्या प्रयत्नशील आहेत. त्यासाठीच नागांच्या जुन्या चालीरीतींनी ऊर्जितावस्था आणून त्या पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी त्यांची धडपड सुरू आहे.

हाराका या शब्दाचा अर्थ 'शुद्ध' असा असून जगात केवळ एकच परमेश्वर आहे या तत्त्वावर या पंथाची श्रद्धा आहे. भारतातील प्राचीन धर्माशी नाते सांगणाऱ्या या पंथाचा पुनर्जन्मावरही विश्वास आहे. स्थापनेच्या वेळेपासूनच या पंथाने ख्रिस्तीकरणविरोधी भूमिका घेतली असून अशिक्षित, मागासलेल्या व भोळ्याभाबड्या नागांना विविध प्रलोभने दाखवून ख्रिस्ती करण्याच्या मिशनऱ्यांच्या कारवायांचा या पंथाने नेहमीच निषेध केला आहे. आज नागभूमीत सर-

कारी प्रशासनासह सर्व सत्ताकेंद्रे ख्रिश्चनांच्या ताब्यात आहेत व त्यामुळे सर्व स्तरांवर हाराकापंथीयांना कडव्या विरोधाशी सामना करावा लागत आहे. ख्रिश्चनांच्या हाती सत्ता असल्याने आपले सांस्कृतिक कार्य टिकविण्याचे हाराकांचे कार्य अधिकच बिकट बनले आहे. एकीकडे सत्ताधाऱ्यांकडून अडवणुकीचे धोरण आहे तर दुसरीकडे भूमिगत नागा बंडखोरांकडून सताविण्याचे प्रकार सुरू आहेत. अशा स्थितीत हाराका चळवळ पूर्वीच्याच उत्साहाने सुरू रहाणे कठीण आहे. हे ओळखूनच ख्रिस्ती बहुसंख्यांकांच्या नागभूमीतून बाहेर पडण्यासाठी झेलिआंगरोंग हा 'हाराकांचा' नवा केंद्रशासित प्रदेश निर्माण केला जावा ही राणी गायडिलो यांची मागणी आहे व ती खचितच न्याय्य आहे. ख्रिस्तीकरण, आधुनिकता व पाश्चात्यीकरण या चक्रात अडकलेल्या अन्य नागांसारखीच झेलिआंगरोंग जमातीच्या नागांची स्थिती होऊ नये यासाठीच त्यांची ही मागणी आहे व केंद्राने तिचा सहानुभूतिपूर्वक विचार करायला हवा.

## नव्या व्यथा

कोहिमातील शहराबाहेरच्या एका वसाहतीत बंगलेवजा एका घरात आपल्या कार्याचा व्याप सांभळणाऱ्या राणी गायडिलो आज विश्व हिंदू परिषदेच्या सन्मान्य सल्लागार आहेत. शिवाय वनवासी कल्याण आश्रमाशीही त्यांचे घनिष्ट संबंध आहेत. १९७९ मध्ये झालेल्या प्रयागच्या विश्व हिंदू संमेलनास त्या हजर होत्या व प्रकृतीने साथ दिली तर भारताच्या सर्व राज्यांचा प्रवास करण्याची उमेद त्या बाळगून आहेत!

राणी गायडिलोंची कामगिरी क्वचित ऐतिहासिक महत्त्वाची असली तरी बदलत्या दिवसांनुसार त्यांच्या कार्याला नवनव्या मर्यादा पडत आहेत. नागभूमीत आज सर्वत्र अंगामी व अन्य जमातींचे वर्चस्व आहे व झेलिआंगरोंग ही जमात तुलनेने अधिक उपेक्षित आहे. ख्रिश्चन विरुद्ध हाराका या संघर्षाबरोबरच उभय जमातींतील वैमनस्यामुळे हाराकांच्या कामाला सरकारीरीत्या उघड उघड विरोध केला जात आहे. त्यातच पैसा व चैनीच्या वस्तूंची चटक यामुळे नागांचे लोंढेच्या लोंढे ख्रिस्ती धर्मात प्रवेश करीत आहेत व ते कसे थोपवायचे ही हाराकांसमोरील जटिल समस्या आहे. त्यातच उतरत्या वयाबरोबर राणी गायडिलो यांचा प्रभावही घसरत चालला आहे. आज त्यांचे सर्व कुटुंबीय व त्यांचा व्यक्तिगत सचिवसुद्धा ख्रिश्चन बनला आहे. मोठ्या उमेदीने आपण चालविलेल्या या चळवळीला इतके वाईट दिवस यावेत हीच राणी गायडिलो यांच्या अंतरीची आजची व्यथा आहे!

गेल्या फेब्रुवारीतील एका प्रसन्न सकाळी राणी गायडिलो यांच्या निवासस्थानी मी त्यांना भेटलो, तेव्हा नेमकी हीच व्यथा त्यांनी बोलून दाखविली. ख्रिश्चनांच्या कारवायांबद्दल त्या म्हणाल्या, 'वस्तुतः येशू ख्रिस्ताचा हा धर्म औदार्याची उदात्त शिकवण देणारा आहे; पण काही संकुचित मताचे मिशनरी सतत आम्हाला त्रास देतात. अर्थात आम्ही ते फारसं मनावर घेत नाही! एखाद्या खुर्चीचे चार पाय जर सारख्या उंचीचे नसतील तर खुर्ची डगडगेल, तेव्हा या पायांप्रमाणेच सर्व धर्मांना समान लेखून समाजव्यवस्था नीटपणे शाबूत ठेवली पाहिजे!' असेही त्यांनी सांगितले.

वाढत्या ख्रिस्तीकरणामुळे पाश्चात्य चालीरीतींचा प्रभाव वाढत आहे. परंपरागत मद्य रोज थोडया प्रमाणात घ्यायचे हा आमचा रिवाज होता; पण आज इथले लोक दिवसभर दारूच्या नशेतच असतात! सबंध समाजावर त्याचे अतिशय विचित्र परिणाम होत आहेत.' असं सांगून राणी गायडिलो यांनी त्याबद्दल चिंता व्यक्त केली. ख्रिश्चनांनी जरूर धर्मप्रसार करावा; पण त्यांनी आपला धर्म इतरांवर लादू नये, शिवाय धर्मांतर करताना मूळ संस्कृती किंवा भारतीयत्व टिकून राहील, विघातक पाश्चात्य संस्कार येणार नाहीत अशी काळजीही त्यांनी घ्यायला हवी, असेही राणी गायडिलो यांनी सांगितले.

बंडखोरनेता फिझो व त्याच्या चळवळीबद्दल आपलं मत काय? या प्रश्नाला उत्तर देताना त्या म्हणाल्या की, फिझोने नागांसाठी केलेला त्याग असीम आहे! तो एक निःस्वार्थी व निश्चयी वृत्तीचा नेता आहे व खऱ्या अर्थाने तो एक महान व्यक्ती आहे; पण दुर्दैवाने त्याच्या चळवळीला विधायक दिशा मिळाली नाही व भारतविरोधी शक्तींच्या हाती तो एक बाहुले बनला!

नागभूमीचे भारताशी अतूट नाते असल्याचे सांगून त्या पुढे म्हणाल्या की, उर्वरित भारतीयांच्या हरेक सुखदुःखात नागभूमीची जनता सहभागी आहे. माझ्या या अवस्थेत भारतासाठी लढण्याची वेळ माझ्यावर आली तरी मी आनंदाने लढेन! अखेर भारत हीच माझी प्रिय मातृभूमी आहे! भारताची आजची स्थिती पाहता स्वातंत्र्यासाठी आपण जो संघर्ष केलात त्याचे चीज झाल्याची, समाधानाची भावना आपल्या मनात आहे काय? या प्रश्नावर त्या म्हणाल्या की, मी खचितच समाधानी आहे! मात्र केंद्र सरकारने या प्रदेशाकडे अधिक लक्ष देण्याची गरज आहे. नवा केंद्रशासित प्रदेश निर्माण करणे कठीण असेल, तर निदान झेलिआंगरोंग जमातीसाठी स्वतंत्र जिल्ह्याची आमची मागणी तरी केंद्राने जरूर मान्य करावी म्हणजे मी पूर्ण समाधानी होईन असेही त्यांनी सांगितले.

राणी गायडिलो आज सत्तरीला टेकलेल्या आहेत व शरीराने अतिशयच थकल्या आहेत. त्यांना एक नागामी भाषेशिवाय अन्य भाषा येत नाही. त्यामुळे नागामी भाषा जाणणाऱ्या कोहिमातील एका स्थानिक पत्रकाराच्या मदतीने मला ही मुलाखत घ्यावी लागली.

## मणिपूर मिझोरॅम

आसाम, मेघालय व नागभूमीव्यतिरिक्त ईशान्य भारतात मणिपूर व त्रिपुरा ही अन्य दोन राज्ये आणि अरुणाचल आणि मिझोराम हे दोन केंद्रशासित प्रदेश इत्यादींचा समावेश होतो. इथेही प्रांतानुसार एकाच समस्येची वेगवेगळी रूपे पहायला मिळतात. सांस्कृतिक चालीरीती, वेशभूषा, भाषा, आचार–विचार इ. बरोबरच या भागांचे प्रश्नही वेगवेगळे आहेत, परिस्थितीनुरूप ख्रिस्ती मिशनऱ्यांनी आपल्या धर्मप्रचाराच्या पद्धतीही बदलल्या आहेत.

अवघ्या १५ ते १८ लाख लोकसंख्येचे मणिपूर हे राज्य व त्याची इंफाळ ही राजधानी अलीकडे वृत्तपत्रांतून बरीच गाजत आहे. या मणिपूर राज्यात ८५ टक्के भूभाग डोंगराळ प्रदेश असून उर्वरित सपाट भागातच दाट लोकसंख्या आहे. या भागात पूर्वीपासून वैष्णव हिंदूंची

पृष्ठ २२ वर

**बरून सेनगुप्ता यांचे Last Days of the Morarji Raj हे पुस्तक वाचल्यावर आपली झोप उडाली असे नानासाहेब गोरे यांनी एका लेखात ( साधना ) नुकतेच लिहिले होते....**

# आहे तरी काय असे ‘ भयानक ’ या पुस्तकात ?

जनता सरकार कोसळले आणि जनता पक्ष फुटला याला पक्षांतर्गत नेत्यांची सत्तेसाठी आपसातील लाथाळी हे कारण तर आहेच; परंतु विरोधी पक्षाची पाताळयंत्री कटकारस्थानंही याला कारणीभूत आहेत. जनता पक्षात दुही माजवून विरोधी पक्षाने आपला स्वार्थ कसा साधून घेतला, ज्यांनी देशाचे भवितव्य घडवायचे त्यांनीं सत्तेच्या लोभापोटी कुटिल कारस्थान करून देशाचे भवितव्य कसे धोक्यात आणले याचा परामर्ष प्रस्तुत लेखात घ्यावयाचा आहे.

मोरारजी देसाईंचे जनता सरकार खरोखर कसे कोसळले ? सुप्रसिद्ध पत्रकार श्री. बरून सेनगुप्ता यांनी या राजकीय नाट्यातील सर्व प्रमुख पात्रांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन ‘ लास्ट डेज ऑफ द मोरारजी राज ’ हे पुस्तक लिहिले आहे. मनाला अंतर्मुख करायला लावणाऱ्या या हकिकती मोरारजींचे जनता सरकार कुणी कोसळवले या प्रश्नावर विदारक प्रकाशझोत टाकतात. या पुस्तकाची ही सारांशरूपाने ओळख. ( आगामी निवडणुकांच्या निमित्ताने करून दिलेली. )

¤

‘ देशाचा राज्यकारभार सुरळीतपणे न हाकू शकणाऱ्या षंढ लोकांचा भरणा शासनात आहे असं लोकांना वाटते. देशात भ्रष्टाचारही मोठ्या प्रमाणावर वाढला आहे ’ हे सूरजकुंड इथे चरणसिंगांनी केलेले विधान आणि राजनारायण यांनी सिमल्यामध्ये १४४ कलम धुडकावून एका जाहीर सभेत तिथल्या मुख्यमंत्र्यांवर झाडलेले ताशेरे या दोन गोष्टींनी जनता पक्षाच्या ऱ्हासास खरी सुरुवात झाली. कॅबिनेटमधले दोन महत्त्वाचे मंत्री बेजबाबदार विधान करतात ही गोष्ट प्रधानमत्री मोरारजी देसाई यांनी कशी खपवून घ्यावी ? त्यांना या दोन मंत्र्यांच्याविरुद्ध कडक कारवाई करणे अपरिहार्यच होते. या गोष्टीवर निर्णय घेण्यासाठी मोरारजींनी कॅबिनेट सदस्यांची एक तातडीची बैठक बोलावली. या बैठकीत शासनाविरुद्ध विधाने करणाऱ्या या दोघा मंत्र्यांबद्दल बराच ऊहापोह झाला आणि या दोन मंत्र्यांनी कॅबिनेटमधून राजीनामे द्यावेत असा परखड निर्णय पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी घेतला. या निर्णयापासून जनता पक्षात दुही माजली नि त्याचे पर्यवसान अखेर जनता सरकार कोसळण्यात झाले. या घटनेने जनता पक्षात कसकशी लाथाळी झाली ही गोष्ट तर सर्वश्रतच आहे. तेव्हा तिचा ऊहापोह या लेखात करावयाचा नसून जनता पक्षातील दुहीचा विरोधी पक्षाने कसा फायदा घेतला, जनता पक्ष फोडून काढण्यासाठी काय काय कटकारस्थाने केली नि खुद्द जनता पक्षातीलच काही ज्येष्ठ नेत्यांनी केवळ सत्तेसाठी पक्षाची विल्हेवाट कशी लावली याचे अवलोकन आपणास करावयाचे आहे.

१९७७ सालच्या लोकसभा निवडणुकीत आपला पराभव झाल्याचे जेव्हा इंदिरा गांधींना कळले तेव्हा आपल्या निवासस्थानातील कक्षात त्यांनी स्वतःला बंदिस्त करून घेतले. ती रात्र त्या कुणाशी काही सुद्धा बोलल्या नाहीत. दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांच्या मनात कुठला

प्रश्न प्रथम आला असेल तर तो हा की आता आपल्या मुलाला— संजयला-कितपत धोका आहे ? त्यांना स्वतःची तमा नव्हती ! सर्व परिणामांना तोंड देण्याची त्यांची खंबीर तयारी होती. त्यांना काळजी होतो ती आपल्या मुलाची. त्याची सुरक्षितता हे त्यांचे प्रमुख उद्दिष्ट बनले. खुद्द दिल्लीतच संजयचे अनेक कट्टर विरोधक आहेत हे त्यांना ठाऊक होते.

परंतु नंतरच्या तीन-चार दिवसांत जेव्हा काहींच घडले नाही, त्यांच्या घरासमोर निदर्शने किंवा अन्य काही अनुचित प्रकार घडले नाहोत तेव्हा आपली भीती व्यर्थ आहे हे त्यांच्या लक्षात आले. जनता पक्षाचे स्वयंसेवक आणि समर्थक त्यांना मिळालेल्या अनपेक्षित विजयाप्रीत्यर्थ आनंदोत्सव साजरा करण्यात गढ़न गेले होते. नंतर जनता पक्षाच्या काही नेत्यांनी इंदिराजींची भेटही घेतली, तर काहींनी त्यांच्याशी टेलिफोनवरून बोलणीही केली. याचाच अर्थ ते त्यांच्या मुलाच्या— संजयच्या— मागे नव्हते. तसेच खुद्द इंदिराजींनाही त्यांच्यापासून काही धोका नव्हता. जनता पक्षाच्या नेत्यांनी आपल्या अगर आपल्या मुलाविरुद्ध जर काही कारवाई केलीच तर ती कायद्याच्या चौकटीत बसेल अशा रीतीनेच ते करतील, हे चाणाक्ष इंदिराजींनी अचूक हेरले.

या गोष्टीमुळे इंदिराजीचा आत्मविश्वास हळूहळू वाढू लागला. त्यांच्या पराभवानंतर शेकडो लोक त्यांच्या निवासस्थानावर दररोज सकाळ–संध्याकाळ त्यांची भेट घेण्यासाठी येऊ लागले. त्यामुळे तर त्यांची भीती आणखीनच कमी झाली त्या पंतप्रधानपदी असताना त्यांची भेट घेणे सामान्यजनांना अवघड होते ते त्यांच्या भोवती असलेल्या संरक्षक कड्यामुळे; पण आता मात्र त्यांचे द्वार सर्वांसाठी मुक्तपणे खुले होते. त्यांची भेट घेण्यासाठी लोक मोठ्या प्रमाणावर त्यांच्याकडे येऊ लागले नि त्यांच्या सरकार विरुद्ध मतदान केल्याबद्दल दिलगिरी व्यक्त करू लागले. या गोष्टीने इंदिराजी हेलावल्या. त्यांचा पराभव होताच त्यांचे पाठीराखे त्यांना केव्हाच सोडून गेले होते; पण जनता अजूनही त्यांच्या पाठीशी होती. देशातील जनता अगर जनता पक्ष त्यांच्या विरुद्ध नसून खुद्द त्यांच्याच कॉंग्रेस पक्षातील त्यांचे सहकारी त्यांच्या विरुद्ध उठले आहेत ही धक्कादायक जाणीव त्यांना झाली. त्यांच्या पराभवानंतर पहिल्या पंधरवड्यातच बरूआ आणि त्यांच्या समर्थकांनी संजय गांधीने ए. आय. सी. सी. चा राजीनामा द्यावा, तसेच बन्सीलाल, ओम मेहता आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री नरेन दत्त तिवारी यांनीही कॉंग्रेस वर्किंग कमिटी सोडावी अशी मागणी केली. त्यावर कॉंग्रेस पक्षाच्या पराभवास आपण जबाबदार आहोत असे इंदिराजींनी जाहीरपणे कबूल केले; पण त्याचबरोबर ' कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्ष या नात्याने पक्षाच्या पराभवाची जबाबदारी बरुआ यांच्यावरही जात नाही काय ?' नि त्यासाठी त्यांनी पण का राजीनामा देऊ नये? अशी विचारणाही त्यांनी केली. यावरून कॉंग्रेस पक्षात इंदिरा विरोधक आणि इंदिरा समर्थक यांच्यात लठ्ठालठ्ठी सुरू झाली. या भांडणाचा परिणाम असा झाला की इंदिराविरोधक बन्सीलाल यांची कॉंग्रेस पक्षातून हकालपट्टी करण्यात यशस्वी झाले तर उलटपक्षी इंदिरा समर्थकांनी बरुआंना अध्यक्षपद सोडायला लावले. कॉंग्रेस पक्षाचे हंगामी अध्यक्ष म्हणून सरदार स्वर्णसिंग यांची नेमणूक झाली.

दरम्यान इंदिरा गांधी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आणीबाणीच्या काळात केलेल्या कृष्णकृत्यांबद्दल काय कारवाई करावी याचा जनता पक्ष विचार करू लागला. अखेर इंदिरा सरकारने आणीबाणीत केलेल्या दडपशाहीची चौकशी करण्याकरता एप्रिल ७७ मध्ये तीन कमिशन्स— आयोग — बसवण्याचा निर्णय जनता सरकारने जाहीर केला. त्यानंतर काही आठवड्यांनी इंदिराजींच्या कॅबिनेटमधल्या काही ज्येष्ठ मंत्र्यांची चौकशी करण्याकरताही काही कमिशन्स नेमण्यात आली मारुती प्रकरण नि नगरवाला प्रकरणाच्या चौकशीसाठीही आयोग नेमण्यात आले. या प्रकारात इंदिराजींचे काही सहकारी अतिशय घाबरले नि स्वतःच्या सुरक्षिततेसाठी त्यांनी जनता पक्षाच्या नेत्यांशी गुप्तपणे वाटाघाटी सुरू केल्या.

त्याच सुमारास जनता पक्षनेते अनेक राज्यसरकारात–जिथे कॉंग्रेस पक्ष अजूनही सत्तेवर होता-आपले बळ वाढवण्याच्या मागे होते. केंद्रात सत्तेवर आल्यानंतर लगेच जनता सरकारने राज्यातील कॉंग्रेस मंत्रिमंडळ बरखास्त करून निवडणुकीची घोषणा जाहीर केली. आणीबाणीत झालेल्या अत्याचारासंबंधीचे पुरावे गोळा करण्याची संपूर्ण जबाबदारी सुरुवातीच्या दोन महिन्यांत जनता सरकारने काही दुय्यम अधिकाऱ्यांवर सोपवली होती; परंतु गंमत अशी की ज्या प्रकरणांची चौकशी-तपास ते करत होते, अशा काही प्रकरणात हे दुय्यम चौकशीअधिकारी स्वतःच गुंतलेले होते; पण जनता पक्षनेत्यांनी या बाबीकडे विशेष लक्ष दिले नाही. जनता नेत्यांच्या या निष्काळजीपणामुळे इंदिराजींचा आत्मविश्वास अधिकच द्विगुणित झाला. चौकशीसाठी नेमण्यात आलेल्या कमिशन्सना चौकशी करण्यास प्रदीर्घ कालावधी लागेल आणि त्यानंतरही हे आयोग कुणास काही शिक्षा करू शकणार नाहीत. कारण त्यांना तसे अधिकारच नाहीत, हे इंदिराजी नि त्यांच्या समर्थकांना कळून चुकले. त्यामुळे नजीकच्या कालावधीत या आयोगांपासून आपल्याला काही धोका नाही या विचाराने इंदिराजी नि त्यांचे समर्थक निर्धास्त झाले. मग कॉंग्रेस पक्षात आपले प्राबल्य कसे वाढवता येईल यावर इंदिराजींनी आपले लक्ष केंद्रित केले. त्याकरता कॉंग्रेस पक्षाच्या अध्यक्षपदी आपला उमेदवार निवडून आणणे हे त्यांचे प्रमुख उद्दिष्ट होते. या बाबतीत नशिबाने त्यांना साथ दिली. कॉंग्रेस अध्यक्षपदाच्या आगामी निवडणुकीत इंदिराजींचे उमेदवार ब्रह्मानंद रेड्डी हे विरोधी पक्षाचे उमेदवार सिद्धार्थ शंकर रे यांचा दणदणीत पराभव करून विजयी झाले ! यावरून कॉंग्रेस पक्षाचे पाठबळ इंदिरा गांधींना असल्याचे सिद्ध झाले.

दरम्यान राज्यसभेच्या निवडणुका झाल्या नि सर्व हिंदी भाषिक राज्यात जनसंघ आणि भारतीय लोकदल या युतीने मुख्यमंत्रीपदाच्या जागा पटकावल्या.

या गोष्टीमुळे आपला पाया भक्कम झाला आहे नि पुढे मुसंडी मारण्याची हीच वेळ आहे याची जाणीव चरणसिंगांना झाली. पंतप्रधानपदाच्या खुर्चीपर्यंत पोचण्यासाठी आपण उत्तम गृहमंत्री आहोत हे प्रथम आपल्याला सिद्ध केले पाहिजे अशी खूणगाठ त्यांनी मनाशी बांधली. हे सिद्ध करण्यासाठी त्यांनी इंदिरा गांधींच्या काही माजी सहकाऱ्यांविरुद्ध कडक कारवाई करण्याची मोहीम उघडली. कॉंग्रेस पक्षासाठी अनीतीने पैसा गोळा करणे,जीप्ससारख्या वाहनांचा

वापर करणे या आरोपाखाली इंदिराजींचे काही माजी मंत्री नि सहकारी असे मिळून दहाजणांना अटक करण्यात आली. या धर-पकडीबद्दल काँग्रेसपक्षाने तीव्र ओरड केली; परंतु या प्रकाराने चरणसिंगांच्या आडाख्याप्रमाणेच, देशभरातल्या इंदिरा विरोधी नि आणीबाणी विरोधी विभागात प्रचड खळबळ माजली.

सप्टेंबर महिन्यामध्ये गृहमंत्री चरणसिंग यांनी इंदिरा गांधींच्या अटकेच्या दृष्टीने प्रयत्न सुरू केले. इंदिरा गांधींविरुद्ध भ्रष्टाचाराचे पुरावे निर्माण करण्यास त्यांनी सी. बी. आय. ला सांगितले. असे पुरावे निर्माण करणे सी. बी. आय. ला काही अवघड नव्हते. त्या संबंधातले जरूर ते कागदपत्र जमवून सी. बी. आय. ने गृहमंत्री चरणसिंगांना दिले नि त्यांनी ते मोरारजी देसाईंना सादर केले. मोरारजींनीही ते निःसंदिग्धपणे मंजूर केले. इंदिरा गांधींविरुद्ध आपण बळकट केस उभी करत आहोत अशीच सर्वांची कल्पना होती. ३ ऑक्टोबरला सी. बी. आय. ने इंदिरा गांधींना अटक केली; पण दुसऱ्या दिवशी जेव्हा त्यांना न्यायाधिशांपुढे उभे करण्यात आले तेव्हा इंदिराजींविरुद्ध सिद्ध होण्यासारखा कोणताच गुन्हा नसल्याने न्यायाधिशांनी त्यांची विनाअट मुक्तता केली !

## पक्षविभाजन का केले ?

जनता पक्षाच्या दृष्टीने ठरलेला हा पचका इंदिराजींना वरदानच ठरला. जनता पक्ष आपल्याशी व आपल्या सहकाऱ्यांशी सूडबुद्धीने वागतो आहे अशी ओरड त्यांनी सुरू केली. संजय गांधीने आपल्या सहकाऱ्यांसह चौफेर जनता पक्ष विरोधी आंदोलनाचा जोरदार प्रचार करण्यास सुरुवात केली. इंदिरा गांधींच्या संमतीनेच त्यांनी अशीही मागणी केली की सबंध काँग्रेस पक्षाने, चौकशीसाठी नियुक्त केलेल्या सर्व कमिशन्सविरुद्ध जोरदार आंदोलन उभारावे. तसेच या चौकशी कमिशन्सना मुळीच सहकार्य दिले जाऊ नये; पण ब्रह्मानंद रेड्डी यांच्यासह अनेक ज्येष्ठ काँग्रेसनेत्यांनी या प्रस्तावाला विरोध दर्शविला. या आयोगांविरुद्ध निषेध व्यक्त करणे एक वेळ ठीक होते; पण जनता सरकारने चौकशीसाठी अधिकृतपणे नेमलेल्या या आयोगांविरुद्ध आंदोलन करणे कसे शक्य होते ? ब्रह्मानंद रेड्डी, चव्हाण, बरुआ इत्यादींनी या गोष्टीला साफ नकार दिला. तसे केल्याने काँग्रेस पक्षाचेच नुकसान होईल, काँग्रेस पक्षाचे लोक या आयोगांना सहकार्य देत नाहीत व त्या विरुद्ध आंदोलन उभारतात. त्या अर्थी, या पक्षाजवळ छपवण्यासारख्या अनेक गोष्टी आहेत असा देशातील जनतेचा समज होईल, असे मत उपरोक्त तिघा काँग्रेस-नेत्यांनी व्यक्त केले.

त्यामुळे काँग्रेस पक्षातला तणाव वाढला. काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष ब्रह्मानंद रेड्डी इंदिरा गांधींच्या बाजूचे नाहीत हे यावरून स्पष्ट झाले. त्याच सुमारास देशाच्या विभिन्न भागातील आयोगांसमोर उभे राहिलेले खटले इंदिराजी नि संजय गांधी यांच्या दृष्टीने फारच नुकसानकारक ठरले. काँग्रेस पक्षाने या आयोगांविरुद्ध तीव्र आंदोलन उभारावे असा या माता-पुत्रांनी पुन्हा अट्टाहास धरला; परंतु पक्षाध्यक्ष ब्रह्मानंद रेड्डींनी त्याला मान्यता दिली नाही. ऑक्टोबर ७७ च्या अखेरच्या आठवड्यात विविध आयोगांचे अहवाल बाहेर पडू लागले. माजी संरक्षणमंत्री बन्सीलाल यांच्याबद्दल जगमोहन रेड्डी आयोगाने सादर केलेला अहवाल भयंकर असाच होता. बन्सीलाल यांच्यावर कायदेशीर इलाज केला जावा असे या आयोगाचे मत होते.

इंदिराजी नि त्यांच्या समर्थकांच्या दृष्टीने शहा आयोगाचे सत्र फारच त्रासदायक ठरले. शहा आयोगाविरुद्ध आंदोलन उभारण्याची ओरड त्यांनी आता सतत सुरू केली; पण काँग्रेस पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांनी त्याकडे साफ दुर्लक्ष केले. तेव्हा मग इंदिराजींनी काँग्रेस पक्ष फोडण्याचा निर्णय घेतला नि २ जानेवारी १९७८ रोजी काँग्रेस (आय) (इंदिरा काँग्रेस) हा पक्ष जन्माला आला ! या पक्षाचे अध्यक्षपद अर्थातच इंदिरा गांधी यांकडे होते. ब्रह्मानंद रेड्डींनी काँग्रेस पक्षातून इंदिरा गांधी यांच्या पाठोपाठ, कमलापती त्रिपाठी आणि आणखी काही जणांची हकालपट्टी केली. काँग्रेस कार्यकारिणीच्या समितीचे बहुतांश सभासद रेड्डींच्या बाजूला गेले तर लोकसभेतले बहुतांश सदस्य इंदिराजींच्या बाजूला आले. निवडणूक कमिशनने रेड्डी काँग्रेसला 'गाय वासरू' हे चिन्ह दिले; पण त्याचबरोबर इंदिराजींच्या काँग्रेस (आय) पक्षालाही राष्ट्रीय पक्ष म्हणून कमिशनने मान्यता दिली आणि त्याला 'हात' हे चिन्ह दिले, सी. एम. स्टीफन हे लोकसभेत काँग्रेस (आय) पक्षा तर्फे विरोधी नेते बनले.

इंदिरा गांधींनी काँग्रेस पक्षाचे विभाजन केले याला आणखीही एक कारण होते. १९७८ च्या फेब्रुवारी महिन्यात सहा राज्यांमध्ये निवडणुका होणार होत्या. आंध्र आणि कर्नाटक या दोन राज्यांत काँग्रेस पक्षाला बहुमत मिळेल अशी काँग्रेस पक्षाची पूर्ण खात्री होती. इंदिरा गांधींच्या दक्षिणेमधील व्यक्तिगत लोकप्रियतेमुळे काँग्रेस पक्ष त्या निवडणुका जिंकील असा संजय गांधीचा दावा होता; पण रेड्डी-चव्हाण ही युती आपल्या विजयाची ग्वाही देत होती. काँग्रेस पक्षाचे विभाजन झाले तर आंध्र आणि कर्नाटकातले अनेक नेते इंदिरा गांधींना येऊन मिळतील असे संजय गांधीचे म्हणणे होते. तसे झाले तर पुढल्या निवडणुकाच रेड्डी-चव्हाण-बरुआ या गटाचा कमकुवतपणा सिद्ध करणार होत्या.

आणि संजयचा होरा पुन्हा एकदा अचूक ठरला. आंध्र आणि कर्नाटकात इंदिरा गांधींच्या समर्थकांना निर्विवाद बहुमत मिळाले. उलटपक्षी महाराष्ट्रात खुद्द स्वतःच्या राज्यात-चव्हाण इंदिराजींच्या तोडीचा प्रभाव पाडू शकले नाहीत. इतर काही राज्यांत तर रेड्डी काँग्रेसच्या उमेदवारांचा पार धुव्वाच उडाला ! या निवडणुकांनी इंदिराजींची काँग्रेस ही रेड्डी काँग्रेसपेक्षा अधिक बलवान आहे हे सिद्ध केले.

इंदिराजींची ही आगेकूच चालू असली तरी विविध चौकशी आयोगातून बाहेर पडणारे अहवाल त्यांच्या नि त्यांच्या समर्थकांच्या दृष्टीने घातुक वळण घेऊ लागले. शहा आयोगातर्फे प्रसिद्ध झालेल्या दोन अहवालांनी 'केवळ स्वतः सत्तेवर राहण्यासाठी इंदिरा गांधींनी आणीबाणी लागू केली आणि अनेक विरोधी नेत्यांची धरपकड केली' ही गोष्ट जाहीर केली. इंदिरा गांधी नि त्यांच्या सहकाऱ्यांनी आणीबाणीच्या कृष्ण कालखंडात अनेक अधिकाऱ्यांविरुद्ध, नागरिकांविरुद्ध इतकेच नव्हे तर हायकोर्टाच्या न्यायाधिशांविरुद्धही सूडबुद्धीने कारवाई केल्याची अनेक उदाहरणे न्यायमूर्ती शहा यांनी आपल्या अहवालात उद्धृत केली होती.

या आयोगांमुळे इंदिरा गांधी नि त्यांच्या सहकाऱ्यांभोवतीचे

जाळे अधिकाधिक निकट येत चालले होते. देशाच्या विविध भागांतील न्यायालयांमध्ये संजयविरुद्ध अनेक खटले होते, काही इंदिरा गांधींविरुद्धही होते. नंतर त्यांच्या दृष्टीने भीतिदायक अशी आणखी एक नवीन बातमी आली. इंदिरा गांधींच्या विरुद्ध चालू असलेल्या खटल्यांचे कामकाज अधिक गतीने व्हावे म्हणून एक खास न्यायालय स्थापण्याचा जनता पक्षामध्ये प्रस्ताव मांडला गेला आहे ही ती बातमी होती.

याच सुमारास जनता पक्षातील अंतर्गत भांडणांनी फार वाईट वळण घेतले नि दुफळीचे हे हत्यार-जे इंदिराजींना हवेच होते-त्यांच्या हाती पडले. **कायद्याने आपल्याला कचाटयात पकडण्यापूर्वी शक्य तितक्या लवकर जनता पक्ष मोडून काढणे नि जनता सरकार कोसळवणे हाच एकमेव मार्ग आता आपल्यासमोर उपलब्ध आहे याची इंदिरा गांधी, संजय गांधी नि कॉंग्रेस (आय) पक्षाच्या इतर नेत्यांना स्पष्ट जाणीव झाली. जनता पक्ष आणि जनता सरकार यातले महत्त्वाचे अधुबिंदू (weakpoints) त्यांनी अचूकपणे टिपले. जनसंघ, चरणसिंग आणि कांती देसाई हेच ते तीन अधुबिंदू होते ! जनता पक्षाच्या या तीन कमकुवत बाबींवरच घाव घालून आपला डाव साधून घेण्याचा धूर्त निर्णय इंदिराजींनी घेतला !**

जातीयतावाद आणि प्रचंड संघटनसामर्थ्य या दोन गोष्टींमुळे जनता पक्षातील इतर घटकपक्ष जनसंघाचा द्वेष करतात ही गोष्ट त्यांना ठाऊक होती. तेव्हा जनता पक्षाचा घटकपक्ष जनसंघ याचाच जनता पक्षाच्या विरुद्ध हत्यारासारखा वापर करण्याचे त्यांनी ठरवले अन् 'जनसंघ जनता पक्षाला आपल्या ताब्यात घेत आहे,' अशी ओरड करण्यात कॉंग्रेस आयने मुळीच वेळ दवडला नाही. या ओरडीत सी, पी, आय, नेत्यांनीही इंदिरा गांधींना सामील होऊन जनसंघाविरुद्ध रान उठवले,

कॅबिनेटमध्ये नंबर दोनच्या स्थानावर चरणसिंग कधीही संतुष्ट राहणार नाहीत ही गोष्ट इंदिरा गांधी आणि कमलापती त्रिपाठी सारख्या त्यांच्या अनुयायांना ठाऊक होती. **म्हणून जनता पक्ष फोडण्याचे दुसरे हत्यार म्हणून त्यांनी चरणसिंगांना हाताशी धरण्याचे ठरवले.** इंदिरा गांधींच्या वतीने देवराज अर्स आणि चेना रेड्डी ही जोडगोळी चरणसिंगांना वरचेवर भेटी देऊ लागली. ही जोडगोळी चरणसिंगांचे कान फुंकू लागली. भविष्यात जेव्हा पंतप्रधानपदाचा प्रश्न उभा राहील त्या वेळी त्या पदासाठी आपला पक्ष चरणसिंगांनाच पाठिंबा देईल असे या जोडगोळीने त्यांना सांगितले. पंतप्रधानपदाचा विषय निघाला की, चरणसिंगांची कळी खुलते नि यावर मोठ्या आत्मीयतेने तो बोलतो हे या जोडीने अचूक हेरले; परंतु आपले ईप्सित साध्य करण्याची जोवर पूर्णपणे खात्री होत नाही तोवर चरणसिंग काही हालचाल करणार नाही हे पण त्यांना उमजून चुकले.

**जनता पक्षातला तिसरा कच्चा दुवा होता तो म्हणजे कांती देसाई !** मोरारजींच्या सबंध कारकीर्दीत-ते मुंबईचे मुख्यमंत्री होते तेव्हा, अर्थमंत्री होते तेव्हा नि उपपंतप्रधान होते तेव्हाही-अनेक लोकांकडून कांती देसाई विरुद्ध अनेक आरोप लावण्यात आले होते. लोकसभेतही 'कांती देसाई प्रकरण' अनेक वेळा चर्चिले गेले होते. मोरारजी देसाई सत्तेवर नसताना कांती-प्रकरणांना फारसे महत्त्व दिले गेले नाही; पण जेव्हा मोरारजी देसाई पंतप्रधान बनले तेव्हा मात्र कांती प्रकरण ही अतिशय संवेदनशील बाब ठरणार हे प्रत्येकाला कळून चुकले. पंतप्रधान बनल्यानंतर पहिल्या प्रेस कॉन्फरन्सच्या वेळीं मोरारजींबरोबर कांती हजर असल्याचे कॉंग्रेस (आय)च्या काही ज्येष्ठांनी पाहिले होते. कांतीने प्रेस कॉन्फरन्समध्ये हजर राहावे या गोष्टीला जनता पक्षातील काही नेत्यांनी किरकोळ हरकत घेतली होती; परंतु ती डावलून कांतीला आपल्याबरोबरच दिल्लीत ठेवून घेण्याचे आपण ठरवले आहे असे मोरारजींनी त्यांना सांगितले. ही गोष्ट जेव्हा कॉंग्रेस (आय) नेत्यांना कळली तेव्हा त्यांचा आनंद द्विगुणित झाला. कांतीच्या मागावर लागण्याची कामगिरी संजयने स्वतःकडे घेतली. त्यासाठी त्याने बालसुब्रह्मण्यम् नावाच्या एका माणसाला हाताशी धरले. संजयच्या सासुरवाडीशी बालसुब्रह्मण्यम्चा घनिष्ट संबंध होताच; पण दुसरी महत्त्वाची गोष्ट ही होती की, हा 'बाल' कांती देसाईंचाही घनिष्ट मित्र होता बालसुब्रह्मण्यम् संजयच्या सासऱ्याच्या फ्लॅटवर नियमितपणे येत असे. तेव्हा संजयने सासुरवाडीस वारंवार भेटी देण्याचा सपाटा लावला. बालसुब्रह्मण्यम्च्या माध्यमाद्वारे त्याला पंतप्रधान मोरारजी देसाईंच्या घरातील हालचाली नि कांती प्रकरणासंबंधीच्या हकीकतींची बित्तंबातमी कळू लागली.

याच सुमाराला संजयचा आणखी एक मित्र त्याच्या उपयोगाला आला. त्याचे नाव कपिल मोहन-मोहन मेकिन्स ब्रेवरीजचा हा मालक. मोरारजींच्या पाडावात या कपिल मोहनला भारी स्वारस्य होते. कारण मोरारजींचे दारुबंदीविषयक धोरण त्याच्या धंद्याच्या मुळावर येणारे होते. या कपिल मोहनची राजनारायणशी पण चांगली मैत्री होती. जेव्हा चरणसिंग आणि राजनारायण यांची कॅबिनेटमधून हकालपट्टी होणार आहे असे कपिल मोहनला कळले तेव्हा तो संजयला भेटला आणि म्हणाला, 'तू राजनारायणची गाठ का घेत नाहीस ? तू आणि राजनारायण दोघे एकत्र झालात तर खिळखिळे झालेले हे जनता सरकार केव्हाच कोसळेल !' संजयने ही गोष्ट आपल्या आईच्या कानावर घातली नि तिच्या संमतीनेच राजनारायणशी संजयची एक भेट आयोजित केली गेली. धूर्त कपिल मोहनने ही भेट अर्थातच स्वतःच्या घरी होऊ दिली नाही. एका विवक्षित स्थळी संजयने राजनारायणला आपल्या मोटारीत उचलले नि मग त्यांच्यात बोलणी झाली. ही बोलणी संजयच्या दृष्टीने फार महत्त्वाची ठरली. जनता सरकार खाली खेचण्यात राजनारायण विशेष उत्सुक होते. मोरारजी, चंद्रशेखर आणि जनसंघावर राजनारायण अतिशय चिडून होते. दोघांत बराच वेळ

## जनता पक्षाच्या तीन कमकुवत जागांवर अचूक मारा

बोलणी झाली. भालोद ग्रुप जनता पक्षातून बाहेर पडला तर चरणसिंगांना किती सदस्यांचा पाठिंबा मिळू शकेल ? असे संजयने राजनारायणना विचारले. त्यावर चरणसिंग जनता पक्षातून बाहेर पडले तर कमीत कमी शंभर लोकसभा सदस्य त्यांच्यापाठी बाहेर पडतील असे राजनारायण यांनी संजयला सांगितले. तसे झाले तर काँग्रेस (आय) च्या सहकार्याने चरणसिंग पर्यायी सरकार स्थापू शकतील नि पंतप्रधान बनू शकतील असे संजयने राजनारायण यांना सांगितले.

ही गोष्ट संजयने राजनारायणपाशी कबूल केलेली असली तरी इंदिराजींची या गोष्टीला अजून संमती नव्हती. या विषयावर चर्चा करण्याकरता त्यांनी कमलपती त्रिपाठी आणि स्टीफन यांना विश्वासात घ्यायचे ठरवले. त्याप्रमाणे एक गुप्त बैठक झाली. या बैठकीत इंदिराजी, कमलापती त्रिपाठी, स्टीफन आणि संजय हे चौघजणच उपस्थित होते. राजानारायण यांच्याशी झालेल्या आपल्या बोलण्यासंबंधी संजयने या बैठकीत सांगितले. त्यावर स्टीफन आणि त्रिपाठी या दोघांनी आपला विरोध दर्शविला. जर चरणसिंग पंतप्रधान झाले तर ते मोरारजीपेक्षाही घातक ठरतील नि इंदिराजी नि त्यांच्या समर्थकांबरोबर सूडबुद्धीने वागतील असे त्यांचे मत पडले. चरणसिंग एकदा सत्तेवर आले तर त्यांना तिथून खाली खेचणे शक्य होणार नाही असा इशारा त्यांनी संजयला दिला. चरणसिंग विश्वासार्ह माणूस नसल्याचे स्टीफन–त्रिपाठी जोडीने संजयला सांगितले. दोघांचे म्हणणे संजयने मान्य केले; पण जनता पक्ष निकालात काढायचा असेल तर हाच एकमेव उपाय आहे, अर्थात त्यात धोका आलाच; पण त्याविना इलाज नाही, असे संजयने त्यांना सांगितले. जर मोराजींचे सरकार खाली खेचण्यात आपण यशस्वी ठरलो तर चरणसिंगांचे सरकारही आपल्याला सहजी खाली खेचता येईल असा दावा संजयने मांडला. संजयच्या प्रस्तावाशी सहमत होण्यास हे दोघेही नेते धजावत नव्हते; पण इंदिराजींनी संजयच्या म्हणण्यास रुकार दिला नि त्याला 'आगे बढो' असे सांगितले.

राजनारायणने संजयशी झालेल्या आपल्या बोलण्याबद्दल चरणसिंगांना सांगितले; पण त्यांच्या बेतास मान्यता न देता चरणसिंग आपल्याच हट्टावर अडून राहिले. देवराज अरस आणि चेन्ना रेडी या दोघांना या नव्या हालचालींची काही कल्पना नव्हती. फक्त देवराज अरस काँग्रेस (आय) च्या वतीने आपल्याला भेटायला आले होते असे चरणसिंगांनी मधु लिमयेंना सांगितले होते. त्यावर इंदिराजींशी हातमिळवणी करण्यात धोका आहे, त्या विश्वासपात्र नाहीत असा स्पष्ट इशारा मधु लिमयेंनी चरणसिंगांना दिला !

¤

अशा घडामोडी चालू असल्या तरी संजयने राजनारायणशी आपला संपर्क चालूच ठेवला होता. कधी राजनारायण इंदिराजींच्या निवासस्थानी येत असे तर कधी संजय राजनारायण यांच्या घरी जात असे. **जोपर्यंत राजनारायण आणि त्यांचे समर्थक जनसंघावर हल्ला करत नाहीत तोपर्यंत जनता पक्षात फूट पडू शकणार नाही असे संजयने राजनारायणला सांगितले.** जनसंघ आणि आर. एस. एस. चे आपण भांडवल केले तर चरणसिंगांच्या पाठोपाठ मोठ्या प्रमाणावर लोकसभासदस्य बाहेर पडतील असे संजयने मत प्रदर्शित केले. बालसुब्रह्मण्यम्‌कडून मिळणारी 'कांती–प्रकरणाची' माहिती गुप्त ठेवायचे संजयने ठरवले होते. कारण बाळचे संजयाच्या सासुरवाडीशी चांगले संबंध होते नि त्यामुळेच संजय बाळला उघडा पाडू शकत नव्हता. फक्त बालसुब्रह्मण्यम्‌कडून मिळणाऱ्या मोरारजींच्या अंतर्गत गोटातल्या बातम्यांचा उपयोग आपल्याला हवा तसा सोयिस्कर करून घेण्याचे संजयने ठरवले होते.

भालोद आणि काँग्रेस (आय) यांची युती करण्याबद्दल संजय आणि राजनारायण यांच्यात जरी नित्यनियमाने वाटाघाटी चालल्या होत्या तरी चरणसिंग त्याबाबत ठाम निर्णय घेण्यास कचरत होते. जनता पक्ष सोडून आपण बाहेर पडलो तर जास्तीत जास्त ३०–३५ सदस्य आपल्यामागे येतील नि त्यांच्या बळावर आपण पंतप्रधान होऊ शकणार नाही, ही वस्तुस्थिती न कळण्याइतके काही ते मूर्ख नव्हते; पण चरणसिंग जनता पक्षातून बाहेर पडले तर कमीत कमी शंभर सदस्य त्यांच्यामागे येतील असा राजनारायणना ठाम विश्वास होता. या बाबतीत एक गंमतीदार गोष्ट राजनारायणना कळली. ती अशी की जनता पक्षातून बाहेर पडू नये, असा सल्ला चरणसिंगांच्या एका खास ज्योतिषाने त्यांना दिला होता. राजनारायणने ज्योतिषाची भानगड संजयच्या कानावर घातली नि संजयने आपला मित्र कमलनाथ याला त्या ज्योतिषाकडे पाठवले.

'चरणसिंगांना उलट सल्ला देण्यासाठी काय घेशील ?' असा सरळ सरळ सवाल कमलनाथने त्या ज्योतिषाला केला. त्यावर–

'आकाशस्थ ग्रहांची स्थिती तुम्हाला पैशाने बदलता येईल काय ?' असे त्या ज्योतिषाने कमालनाथला उलट ठणकावले.

आपले भाकित बदलण्यासाठी कमलनाथने या ज्योतिषाला लक्षावधी रुपयांचे आमिष दाखवले होते; पण ज्योतिषी आपल्या निश्चयापासून ढळला नाही !

काहीही असले तरी राजानारायण आणि चरणसिंग या जोडगोळीच्या मदतीने आपण जनता सरकार नि पक्षात फूट पाडू शकू असे चतुर संजयला पूरेपूर माहीत होते.

¤

त्याच सुमारास विविध आयोगांसमोर चाललेल्या इंदिरा–संजय यांच्या खटल्यांनी उग्र स्वरूप धारण केले होते. त्यांच्या चौकशीसाठी खास न्यायालय स्थापण्याच्या अंतिम निर्णयाप्रत येण्याबद्दलही जनता सरकारमध्ये विचारविनिमय चालू झाला होता; पण तेव्हाच चिकमंगळूरमधल्या निवडणुका इंदिराजींच्या मदतीला आल्या. चिकमंगळूरच्या फेरनिवडणुकीत इंदिराजींना घवघवीत यश मिळाले नि राजकीय क्षेत्रात त्यांचे स्थान अधिकच मजबूत बनले. याव्यतिरिक्त जनता पक्षातील अंतर्गत लाथाळी ही त्यांच्या दृष्टीने कायदेशीर ठरली. काही दिवसांच्या शांततेनंतर चरणसिंग आणि मोरारजी यांच्यात पुन्हा चिखलफेकीस सुरुवात झाली होती. आपण जनता पक्ष सोडून जाऊ अशी धमकीही चरणसिंगांनी मोरारजींना दिली होती. मात्र ही धमकी त्यांनी अंमलात आणली नाही. उलटपक्षी लोकसभेत इंदिराजींविरुद्ध अविश्वासाचा ठराव मांडण्याचा प्रस्ताव जेव्हा पुढे आला तेव्हा चरणसिंग आणि त्यांच्या अनुयायांनी त्याला

जोरदार पाठिंबा दिला !

या प्रकाराने इंदिरा गांधींना मोठाच धक्का बसला; पण तरीही संजयने आपले प्रयत्न सोडले नाहीत. त्याने राजनारायणबरोबर आपला संपर्क चालूच ठेवला होता. संजयच्या सांगण्यावरूनच इंदिराजींनी तुरुंगातून चरणसिंगांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त फुलांचा गुच्छ पाठवला होता ! त्यानंतर लौकरच पंतप्रधानांच्या निवासस्थानाशी संपर्क ठेवून असलेल्या खबऱ्यांकडून चरणसिंगाच्या जनता पक्ष पुन:प्रवेशाबद्दलची बातमी संजयला कळली. चरणसिंगांनी कॅबिनेटमधे पुन्हा प्रवेश केला तेव्हा राजनारायण संजयला भेटून म्हणाले, 'पहा ! त्याला खुर्चीची किती हाव आहे ती !' त्यावर 'असू दे. आपण आपला लढा पुढे चालूच ठेवू !' असे संजयने त्यांना सांगितले.

चरणसिंग, जनसंघ आणि कांती प्रकरणे या हत्यारांच्या जोरावर जनता सरकार कोसळवण्यासाठी इंदिराजी आणि संजयने कशी आघाडी उघडली होती हे आपण पाहिले. आता पंतप्रधानपदाचे स्थान मिळवण्याकरता चरणसिंगांनी काय कारस्थाने केली याचा आपण थोडक्यात आढावा घेऊ. जनता सरकार कुणी कोसळवले ? हा लेखाचा विषय असल्याने इतर राजकीय घडामोडींच्या तपशिलात न जाता कारस्थाने नि कटबाजी कसकशी झाली एवढ्याचाच विचार इथे प्रामुख्याने करावयाचा आहे.

राजनारायण यांचे संजयशी चाललेले गुफ्तगू 'टॉप सीक्रेट' होते. या दोघांमध्ये चाललेल्या खलबतांबद्दलची माहिती जनता पक्षातल्या कित्येक ज्येष्ठ नेत्यांनाही नव्हती. राजनारायण यांची उघड वक्तव्ये मात्र जनता पक्षास अतिशय घातक ठरत होती. चरणसिंगांनी जनता कॅबिनेटमधे पुन:प्रवेश केला याचा अर्थ आमचा लढा संपला असा नव्हे; तो पुढेही चालूच राहील ! फरक फक्त इतकाच असेल की चरणसिंग आता आतून लढतील तर मी उघड उघड बाहेरून लढेन !' हे राजनारायण यांचे एक घातक विधान होते. ज्या दिवशी चरणसिंगांनी जनता कॅबिनेटमधे पुन्हा प्रवेश केला त्याच दिवशी त्यांच्या एका समर्थकाने—उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री रामनरेश यादव यांनी—आपल्या सरकारातून चार मंत्र्यांची हकालपट्टी केली !

यातले दोघे जनसंघातले होते. त्यामुळे देशभरातल्या जनसंघनेत्यांमध्ये प्रचंड खळबळ माजली. चौधरी चरणसिंगांना कॅबिनेटमध्ये परत घेण्याकरता आपण शर्थीने प्रयत्न केले आणि त्यांच्याच एका अनुयायाने आपले लोक शासनातून काढून टाकले असा तीव्र निषेध जनसंघनेत्यांनी चरणसिंगांपाशी व्यक्त केला; पण चरणसिंगांनी त्यांना काही दाद दिली नाही. तेव्हा हा प्रश्न घेऊन ते पक्षाध्यक्ष चंद्रशेखर यांच्याकडे गेले. काढलेले मंत्री परत घ्यावेत असा आग्रह चंद्रशेखर यांनी रामनरेश यादव यांनी केला; परंतु राजकीय हिताच्या दृष्टीने आपण हा निर्णय घेतला असून त्यात यत्किंचितही बदल होणार नाही असा हट्टाग्रह रामनरेश यादव यांनी धरला व ते त्यावर अडून बसले. यामुळे जनता पक्षाचा घटक पक्ष जनसंघ यात प्रचंड असंतोष निर्माण झाला नि जनसंघाच्या उठावास नि पर्यायानेच जनता पक्षाच्या फळीस मोठी भेग पडली. यानंतर काही दिवसांनीच रामनरेश यादव यांनी आणखी तेरा पुरस्कृत मंत्र्यांना कमी करण्याचा आदेश गव्हर्नरला दिला. या घटनेने तर आणखीनच खळबळ माजली नि जनता पक्षातल्या अंतर्गत कलहाने उग्र स्वरूप धारण केले. सर्वांमध्ये फ्री—स्टाइल लढतच लागली जणू !

जनता पक्षातल्या या लाथाळीने राजनारायणांना अधिकच चेव चढला आणि जनसंघ, मोरारजी आणि चंद्रशेखर यांच्या विरुद्ध जाहीर सभांमधून आणि प्रेस कॉन्फरन्सेसमधून त्यांनी जाहीर तोंडसुख घ्यायला सुरुवात केली.

भारताचे पंतप्रधानपद मिळवायचे हीच एकमेव महत्त्वाकांक्षा चौधरी चरणसिंगांनी उराशी बाळगलेली होती. ७७ सालच्या लोकसभा निवडणुकीनंतर जेव्हा जनता पक्ष सत्तेवर आला तेव्हा चरणसिंगांनी आपली ही सुप्त महत्त्वाकांक्षा मनातल्या मनातच दाबून टाकली होती. पंतप्रधानपदासाठी आपला हक्क सांगण्याकरता त्यांच्या दृष्टीने ती वेळ योग्य नव्हती. पंतप्रधानपद मिळण्याच्या दृष्टीने चरणसिंगांना दोन प्रमुख प्रतिस्पर्ध्यांशी सामना करावा लागणार होता. यापैकी पहिला होता मोरारजी देसाई नि दुसरा जगजीवनराम ! त्यापैकी मोरारजींना, योग्य वेळ येताच आपण खुर्चीतून सहजी ढकलू शकू अशी त्यांची खात्री होती; पण जगजीवनरामबद्दल मात्र त्यांना तशी शाश्वती नव्हती. राजकारणात मुरलेला हा महाबिलंदर माणूस एकदा का पंतप्रधानपदाच्या खुर्चीला चिकटला की त्याला तिथून खाली खेचता येणार नाही हे अनेक वर्षांच्या अनुभवाने धूर्त चरणसिंगांना पक्के ठाऊक होते. म्हणूनच ज्या वेळी जनता पक्षाच्या ज्येष्ठ नेतेपदाच्या निवडीची वेळ आली तेव्हा चरणसिंगांनी मोरारजी देसाईंना पाठिंबा दिला; पण त्यानंतर लौकरच चरणसिंगांची सुप्त महत्त्वाकांक्षा पुन्हा उफाळून वर आली ! राजकीय शक्तीचे ध्रुवीकरण करणे या मधु लिमयेंच्या उपपत्तीवर चरणसिंगांचा विश्वास नव्हता नि तितके थांबण्याची त्यांची तयारीही नव्हती. पंतप्रधानपदाच्या खुर्चीतून आपण एकदा मोरारजींना खाली खेचले की ती खुर्ची आपल्याला सहज पटकवता येईल, अशी चरणसिंगांची खात्री होती अन् मोरारजींना खाली खेचण्याचा एकच मार्ग त्यांच्या दृष्टीने उपलब्ध होता, तो म्हणजे मोरारजींच्या मर्मस्थळावर—'कांती-प्रकरणांवर' आघात करणं ! त्यासाठी कांतीविरुद्ध असलेल्या एखाद्या गंभीर आरोपाची त्यांना जरूर होती. या बाबतीत नशिबाने त्यांना साथ दिली नि कल्याणम् नावाच्या एका इसमाशी त्यांची गाठ पडली. बाल सुब्रह्मण्यम आणि कांती देसाई यांच्या अनेक गुप्त भानगडींची माहिती कल्याणम्ने चरणसिंगांना दिली. ही माहिती मिळाल्यामुळे चरणसिंग बेहद्द खूष झाले. जरूर ते हत्यार हाती आल्यानंतर आता त्यांना मोरारजींचा पाडाव सहजपणे करता येणार होता.

कल्याणम् हा बालसुब्रह्मण्यमचा खास सहाय्यक होता. बालसुब्रह्मण्यम् एके काळी एक छोटा उद्योगपती होता. दिल्लीमध्ये काही महत्त्वाच्या राजकीय व्यक्तींशी बालचे संबंध होते. बालसुब्रह्मण्यम

## चरणसिंगांच्या हाती आलेली सनसनाटी माहिती

हा काही परकीय देशांच्या मोठाल्या फर्मस्‌चा एजंट होता. दिल्लीतल्या आपल्या राजकीय संबंधितांमार्फत बाल या फर्मसचे लहानमोठे व्यवहार शासकीय अडचणी न येऊ देता बिनबोभाट पार पाडत असे नि त्यातून लक्षावधी रुपये मिळवत असे. कांती देसाई बालसुब्रह्मण्यम्‌चा जुना मित्र होता. जेव्हा मोरारजी उपपंतप्रधान होते तेव्हा आपल्या देशी व परदेशी अशा अनेक भानगडींच्या आणि गुप्त व्यवहारांच्या बाबतीत त्याने कांती देसाईची मदत घेतली होती. मोरारजी पंतप्रधान झाल्यानंतर बालचे कांतीशी असलेले संबंध अधिक घनिष्ट झाले. कांती बालला त्याच्या व्यवहारात नंतर जास्त मदत करू लागला. कांतीचे बालसुब्रह्मण्यमशी असलेले संबंध जनता-पक्षाच्या काही नेत्यांना ठाऊक होते; पण ते कुठल्या थराला गेले आहेत नि कांती त्यात किती गुंतला आहे याची मात्र त्यांना काही कल्पना नव्हती. कांतीने इलेक्शनफंडाचे ७५ लाख रुपये जमवले. या 'इलेक्शन फंड' प्रकरणाला मधु लिमयेंनी वाचा फोडली तेव्हाही त्या प्रकरणात बालसुब्रह्मण्यमचा किती हात आहे हे त्यांना ठाऊक नव्हते.

फक्त एका व्यक्तीला या प्रकरणाबाबत माहिती होती नि ती म्हणजे संजय गांधी. कल्याणम बालसुब्रह्मण्यमचा खास सहाय्यक असल्याने त्याला बालची सारी कृष्णकृत्ये ठाऊक होती. बाल आणि कल्याणम यांच्यात काय बेबनाव घडला आणि कल्याणमने चरणसिंगांची का भेट घेतली याची काही कल्पना नाही; परंतु त्याने चरणसिंगांना सांगितले की, 'तुम्ही बालसुब्रह्मण्यमला पकडा की कांती तुमच्या हातात आलाच म्हणून समजा! तुम्ही तसे केलेत की तुम्हाला मोरारजींना कोंडीत पकडता येईल. बालसुब्रह्मण्यमच्या नि कांतीच्या गुप्त आर्थिक व्यवहारांव्यतिरिक्त बालची एक अत्यंत गुप्त पण महत्त्वाची भानगड कल्याणमने चरणसिंगांना सांगितली. मोरारजी आणि कांती देसाईबरोबर बाल एकदा अमेरिकेला गेला होता. तिथे त्याने अवघ्या काही लाख रुपयांच्या मोबदल्यात मायक्रोफोनसारखी काही तरी सूक्ष्म श्रवणसामग्री मिळवली. ही सामग्री जगभर साधारणतः हेरगिरीसाठी वापरली जाते. ही सामग्री विकत घेण्याकरता अमेरिकेतल्या एफ. बी. आय. या गुप्तचर खात्याची खास परवानगी लागतेच; पण त्यासाठी आपल्या शासनाचीही परवानगी लागते; पण काळ्या बाजारात अशा प्रकारची विद्युतयंत्रसामग्री दामदुपटीने विकत मिळू शकते. अमेरिकेत विकत घेतलेली ही सामग्री बालसुब्रह्मण्यम्‌ने देसाईंच्या सामानाबरोबर दडवून भारतात आणली. देसाईंच्या सामानावर 'प्राइममिनिस्टर टॅग्ज' असल्याने कस्टम अधिकाऱ्यांनी या सामानाची अर्थातच तपासणी केली नाही आणि अशा तऱ्हेने गुपचुपपणे बालने ही सामग्री भारतात आणली. बालने ही सामग्री कशासाठी आणली हे आपल्यास ठाऊक नसल्याचे; पण त्या सामग्रीतले थोडेफार भाग तो कांतीला देण्याबाबत बोलल्याचे कल्याणमने चरणसिंगांना सांगितले. एवढी सनसनाटी माहिती मिळाल्यानंतर चरणसिंगांना आणखी काय हवे होते? त्यांनी बालसुब्रह्मण्यमच्या फ्लॅटवर धाड घालण्याची व्यवस्था केली. बालच्या फ्लॅटवर ती सामग्री मिळाली तर कांतीचाही त्या प्रकरणात हात होता असे बालकडून वदवता येईल आणि तशा तऱ्हेने मोरारजींना कचाट्यात पकडता येईल असा चरणसिंगांचा डाव होता. त्याप्रमाणे रेव्हेन्यू गुप्तचर खात्याच्या लोकांनी बालच्या दिल्लीमधल्या वेगवेगळ्या फ्लॅटस्‌वर धडाधाड धाडी घातल्या! जोरबाग विभागात एक फ्लॅट होता. याच इमारतीत संजयच्या सासूचा-अमतेश्वर आनंदचाही फ्लॅट होता. बालच्या फ्लॅटमध्ये काही न मिळाल्यामुळे गुप्तचर-खात्याच्या लोकांनी संजयच्या सासूच्या घराचीही झडती घेतली; परंतु तिच्या घरात वा बालच्या इतर फ्लॅटस्‌मध्ये कुठेच त्यांना हवे असलेली सामग्री सापडली नाही! या प्रकाराने संतापून संजयच्या सासूने ही बातमी लगेच संजयला कळवली. त्याबरोबर संजय आपल्या अनुयायांसह तिथे पोचला नि गुप्तचरखात्याच्या अधिकाऱ्यांना त्याने खडसावले. त्या इमारतीमध्ये असलेल्या बालसुब्रह्मण्यमच्या फ्लॅटमध्ये आपल्याला हवी ती सामग्री न सापडल्यामुळे त्याने ती अमतेश्वर आनंद यांच्या फ्लॅटमध्ये दडवून ठेवली असावी अशा तर्काने आपण त्यांच्या फ्लॅटची झडती घेतल्याचे गुप्तचर अधिकाऱ्यांनी संजयला सांगितले.

## हताश बालसुब्रह्मण्यम

प्रकार असा घडला होता की, गुप्तचरखात्याच्या धाडीचा आणि कल्याणमच्या करवायांचा बालला पूर्वीच संशय आला होता नि त्यामुळे त्याने ती सामग्री इतरत्र सुरक्षित ठिकाणी हलवली होती. या धाडी जेव्हा पडल्या तेव्हा बालने कांतीची भेट घेतली नि त्याच्याकडे मदतीची याचना केली; पण ते प्रकरण अर्थखात्याच्या अखत्या; रीतले असल्याने आणि ते चरणसिंगांनी राबवल्याचा आपला अंदाज असल्याने आपण या बाबतीत काही मदत करू शकण्यास असमर्थ आहोत, असे कांतीने बालला सांगितले. बालसुब्रह्मण्यम कांतीचा खास दोस्त आहे हे मोरारजींना ठाऊक होते; पण त्याच्याबरोबरच्या गैर व्यवहारामध्ये आपला मुलगा किती गुंतला आहे याची त्यांना काहीच कल्पना नव्हती; प्रकरण अंगाशी शेकतेय असा बालला अंदाज आला नि त्याने भारताबाहेर सटकण्याचे ठरवले. एका ऑपरेशनसाठी आपल्याला जर्मनीला जायचे आहे तेव्हा त्याकरता भारत सोडण्याची परवानगी अर्थखात्याकडून मिळवून द्यावी असा लकडा त्याने मोरारजींच्या मागे लावला, परंतु मोरारजींनी त्याला "तू आम्हाला भरपूर त्रास दिलेला आहे; तेव्हा आम्ही तुला कोणत्याही प्रकारची मदत करू शकत नाही!" असे स्पष्ट सुनावले. हताश झालेल्या बालसुब्रह्मण्यमला चरणसिंगांना शरण जाण्यावाचून दुसरा मार्गच उरला नाही अन् त्याने तसे करण्याचा निर्णय घेतला.

रेव्हिन्यूखात्याच्या या धाडीनंतर दोन दिवसांनी पंतप्रधान मोरारजींना अमतेश्वर आनंद यांचे एक पत्र मिळाले. रेव्हिन्यू गुप्तचरखात्याच्या लोकांनी आपल्या घरावर धाड घालून आपल्याला विनाकारण त्रास दिल्याची तक्रार त्यांनी त्या पत्रात केली होती व 'हे कृत्य तुमच्या मुलानेच–कांतीनेच–घडवून आणले असल्यामुळे या प्रकाराची चौकशी करण्याकरता एक चौकशी समिती नेमावी' अशी मागणी त्यांनी केली होती. अर्थखात्याकडून या प्रकरणाची चौकशी करण्यास मोरारजींनी आपल्या चिटणिसाला सांगितले.

बालसुब्रह्मण्यम जेव्हा चरणसिंगांना शरण गेला तेव्हा चरणसिंगांनी त्याला अचूक पेचात पकडला. 'जर कांती देसाईला गुंतवणारा लेखी व तोंडी कबुलीजबाब तू मला दिलास तर मी तुला

भारताबाहेर पळून जाण्यात मदत करीन!' असे चरणसिंगांनी बालला आश्वासन दिले. स्वतःच्या सुरक्षिततेकरता बालने कांतीला खड्डयात घालण्याचे ठरवले. कारण त्याला आता देसाई कुटुंबियांबद्दल अजिबात सहानुभुती वाटत नव्हती. त्याने एक प्रदीर्घ लेखी निवेदन चरणसिंगांना दिले. बालचे हे निवेदन अथवा कबुलीजबाब टेपही करण्यात आला. एवढा पुरावा हाती आल्यानंतर आता आपण मोरारजींचा सहजी पाडाव करू शकू असा ठाम आत्मविश्वास चरणसिंगांना वाटू लागला.

अन् मग एक क्षणही वाया न दवडता बालसुब्रह्मण्यमच्या कबुलीजबाबाच्या नकलेसह चरणसिंगांनी मोरारजींना एक पत्र पाठवले. मोरारजी आणि कांती देसाई यांच्या विरुद्ध बालसुब्रह्मण्यम्ने दिलेल्या कबुलीजबाबाची माहिती चरणसिंगांनी पक्षाध्यक्ष चंद्रशेखर यांनाही कळवली आणि आपला 'हनुमान' राजनारायण याला 'लंकादहनास' सिद्ध राहण्यास त्यांनी सांगितले! 'अर्थमंत्र्यांनी या प्रकरणाची चौकशी करावी. त्यासाठी आपल्या परवानगीची आवश्यकता नाही' अशा आशयाचे पत्र मोरारजींनी चरणसिंगांना पाठवले. हा सर्व प्रकार कळल्यानंतर जनता पक्षाध्यक्ष चंद्रशेखर हतबुद्धच झाले! या सर्व भानगडींची त्यांना काहीच कल्पना नव्हती. चरणसिंगांनी मोरारजींना घातक ठरणारी इतकी सर्व सामग्री मिळवल्यानंतर राजनारायण यांना तर भलतेच स्फुरण चढले. थोड्याच दिवसांत सर्व जरूर ती कागदपत्रे उदा. अर्थखात्याच्या गुप्त फायलींच्या फोटोप्रती, कांतीविरुद्ध असलेल्या बालसुब्रह्मण्यमच्या कबुलीजबाबाच्या नकला इत्यादी सर्व सामग्री चरणसिंगांनी राजनारायण यांच्या ताब्यात दिली. या कागदपत्रांच्या काही प्रती मोरारजींच्या काही विरोधकांना, तसेच जनता पक्षाच्या विरुद्ध असलेल्या इतर पक्षाच्या नेत्यांना आणि काही पत्रकारांनाही पुरवण्याचा धूर्तपणा चरणसिंगांनी केला. साहजिकच या प्रकरणातील काही गोष्टींना वृत्तपत्रांमधून प्रसिद्धी मिळाली. एवढी सर्व स्फोटक माहिती आल्यानंतर विरुद्ध पक्षाचे नेते लोकसभेच्या जुलैमधल्या सत्राची उत्कंठेने वाट पाहू लागले. मोरारजींची भारताचे पंतप्रधानपदाची कारकीर्द या सत्रापर्यंत संपुष्टात येईल अशी त्यांची पक्की खातरजमा झाली होती ¤

१० जूनला मॉस्को आणि पूर्व युरोपमधल्या राजधान्यांना भेटी देण्यासाठी मोरारजी जेव्हा प्रदीर्घ दौऱ्यावर गेले तेव्हा बालसुब्रह्मण्यमला नेपाळमार्गे जर्मनीला निसटून जाण्यात मदत केली गेली.

मोरारजींच्या अनुपस्थितीत चरणसिंग आणि त्यांच्या समर्थकांनी काही जनता–विरोधी नेत्यांच्या संगनमताने मोरारजींवर तुटून पडण्याचा एक कट आखला. बालसुब्रह्मण्यमने पुरविलेल्या माहिती-आधारे जुलै–सत्राच्या सुरुवातीसच मोरारजींवर हल्ला चढवायचा नि त्यांना नामशेष करायचे असे या कटात ठरवण्यात आले. या हल्ल्यापुढे मोरारजींचा टिकाव लागणार नाही आणि त्यांना पंतप्रधानपदाचा राजीनामा द्यावा लागेल अशी या कटवाल्यांची खात्री होती. जुलै–सत्राच्या अखेरीस मोरारजींविरुद्ध अविश्वासाचा ठराव आणण्याचेही या कटात ठरले होते.

यानंतरचा इतिहास वाचकांना ठाऊक आहेच. जनता पक्षातली अंतर्गत लाथाळी, आर. एस. एस–जनसंघाचे उठलेले मोहोळ, कांती देसाईविरुद्ध असलेली प्रकरणे आणि संजय–राजनारायण आणि चरणसिंग यांनी केलेली कटबाजी या सर्व कारस्थानांना बळी पडल्यामुळे मोरारजींना पंतप्रधानपदाचा राजीनामा द्यावा लागला! ¤

मोरारजींच्या पाडावानंतर बरीच सुंदोपसुंदी झाल्यावर चरणसिंगांनी आपले काळजीवाहू सरकार–राष्ट्रपतींच्या संमतीने स्थापन केले. चरणसिंगांचे सरकार स्थापन झाल्याबरोबर लगेचच ते खाली कसे आणता येईल याचा विचार इंदिरा–संजय हे माता-पुत्र आता करू लागले. कट–कारस्थाने करून मोरारजींचे सरकार कोसळवण्यात यश आल्यापासून संजयचा आत्मविश्वास द्विगुणित झाला होता. या आत्मविश्वासावरच चरणसिंगांचेही सरकार आपल्याला खाली खेचता येईल अशी संजयला खात्री वाटू लागली. त्यासाठी मध्यावधी निवडणुका हे प्रमुख लक्ष्य आता इंदिरा व संजय यांच्यासमोर होते. इंदिरा गांधींच्या काँग्रेस (आय) या पक्षापासून अजून निदान सहा महिने तरी आपल्याला धास्ती नाही. त्या दरम्यान आपल्याला आपली ताकद वाढवता येईल नि मग इंदिराजींच्या पाठिंब्याची आपल्याला गरज राहणार नाही, असे चरणसिंग-गोटाला वाटत होते. उलटपक्षी चरणसिंगांचे सरकार उलथण्यासाठी त्यांच्यातील त्रुटी काढण्याच्या दृष्टीने या मधल्या सहा महिन्यांच्या कालावधीचा आपल्याला उपयोग करता येईल, असे इंदिरा–संजय–गोटाने ठरवले होते.

चरणसिंगांचे काळजीवाहू सरकार सत्तेवर आल्याबरोबर लगेच इंदिराजी आणि संजय यांनी एक धूर्त असा डाव टाकला. हा दुहेरी डाव होता. काँग्रेस (आय) पक्षाची परिस्थिती काही अगदीच इतकी बिकट नाही की चरणसिंगांच्या समर्थकांनी त्या पक्षाचा केव्हाही अपमान करावा याची चरणसिंग गोटाला जाणीव करून देणे हा या दुहेरी डावातला एक हेतू होता, तर जगजीवनराम यांना काँग्रेस (आय) ने आपली सर्वच दारे बंद केलेली नाहीत हे लोकांना कळावे हा दुसरा हेतू होता.

**थोडक्यात सांगायचे झाले तर चरणसिंग आणि जगजीवनराम या दोघांनाही झुलवत ठेवून आपला स्वार्थ साधण्याचे काँग्रेस–आयने ठरवले होते.**

चरणसिंगांना काँग्रेस (आय) च्या पाठिंब्याचे महत्त्व कळावे नि आपले सरकार स्थिर ठेवण्यासाठी त्यांना काँग्रेस (आय) पक्षावर अवलंबून रहावे लागेल याची त्यांना जाणीव व्हावी, यात या डावाची खरी मेख होती. आपल्या दुहेरी डावात इंदिरा आणि संजय पुन्हा एकदा यशस्वी ठरले. जगजीवनराम आणि चरणसिंग या दोघांनाही आपले अस्तित्व टिकविण्यासाठी इंदिराजींच्या काँग्रेस (आय) पक्षाच्या पाठिंब्याची किती गरज भासत होती याचे चित्रण आपल्याला कमलनाथ यांच्या रोजनिशीत पहावयास सापडते. जगजीवनराम आणि

## जगजीवनराम, चरणसिंग....दोघेही जाळ्यात

चरणसिंग या दोघांनाही इंदिराजी–संजय जोडीने किती तणावाखाली ठेवले होते, हे कमलनाथ यांच्या रोजनिशीतल्या काही निवडक नोंदींवरून आपण आता पाहू :

## १६-८-१९७९ । गुरुवार

आज सकाळी ओ. पी. अरोरा-जगजीवनराम यांच्या सेक्रेटरीचा मला फोन आला. जगजीवनराम आणि त्यांचा मुलगा सुरेश राम या दोघांनाही मला भेटण्याची इच्छा आहे असे त्याने सांगितले. संजय गांधींच्या परवानगीने मी त्या दोघांना जगजीवनराम यांच्या निवासस्थानी भेटण्याचे त्याला कबूल केले. दुपारी सव्वा वाजता ही भेट झाली. या भेटीच्या दरम्यान फक्त सुरेश राम यांच्याशी माझी बोलणी झाली. त्याचा तपशील असा :

**सुरेश राम :** तुमच्याबद्दल मी बरेच ऐकलंय. तुम्हाला भेटायची मला फार उत्सुकता होती.

**कमलनाथ :** अस्सं ! बरं, सध्याची परिस्थिती काय आहे ? लोकसभेचे किती सदस्य तुम्ही तुमच्यापाठी जमवलेत ?

**सु. रा. :** पुष्कळ सदस्य आमच्या बाजूने येतील अशी आशा आहे. त्या दृष्टीने आमचे प्रयत्नही चालू आहेत. बाबूजींना इंदिरा गांधींबद्दल आदर आहे. चिकमंगळूरव्यतिरिक्त त्यांनी कधीच इंदिराजींच्या विरुद्ध काही हालचाल केली नाही. मनेका गांधींनी प्रसिद्ध केलेल्या काही छायाचित्रांमुळे बाबूजी नाराज झाले होते म्हणून त्यांनी ही हालचाल केली. इंदिराजी आणि बाबूजी एकत्र आले तर एक प्रबळ राजकीय शक्ती निर्माण होईल. हरिजनांचा इंदिराजींना मोठा पाठिंबा आहे. इंदिराजी आणि बाबूजी वेगळे झाले तर हरिजनांची मते विभागली जातील. त्यात बाबूजी नि इंदिराजी दोघांचेही नुकसान होईल. इंदिराजी चरणसिंगांचे समर्थन का करताहेत याची मला काही कल्पना नाही. इंदिराजींचे सर्व शत्रू चरणसिंगांच्या बाजूला आहेत–कारण सिंग, पै, जॉर्ज फर्नांडिस, मधु लिमये, राजनारायण, सुब्रह्मण्यम् इ. इ. राजनारायण यांनी केवळ इंदिराजींनाच विरोध केला नाही तर पूर्वी पंडितजींनाही विरोध केलेला आहे. ते इंदिराजींचे समर्थन मग कसे करतील ? उलटपक्षी इंदिराजींनी जर बाबूजींशी हातमिळवणी केली तर त्यांना आपल्या सर्व शत्रूंना नामोहरम करता येईल.

**क. ना. :** ते ठीक; पण जनसंघाचे काय ? आम्ही त्याच्या विरुद्ध आहोत अन् बाबूजींना तर जनसंघ सदस्यांचा मोठ्या प्रमाणावर पाठिंबा आहे. मग इथे कशी तडजोड करता येईल ? जोवर जनसंघ बाबूजींच्या मागे आहे तोवर इंदिराजी बाबूजींच्या बाजूला येऊ शकणार नाहीत.

**सु. रा. :** जनसंघाच्या प्रश्नाबाबत काही तरी तोडगा काढता येईल ही बाब गृहीत धरूनच मी हा प्रस्ताव मांडतो आहे. इंदिराजींचे सर्व शत्रू चरणसिंगांच्या बाजूला आहेत ही गोष्ट तुम्ही लक्षात ठेवली पाहिजे. चरणसिंग कशा प्रकारचा माणूस आहे याचे मी तुम्हाला एक उदाहरण देतो. १९७७ सालच्या निवडणुकांत कोणत्याही प्रकारची पूर्वकल्पना न देता चरणसिंग बाबूजींच्या मतदारसंघात येऊन थडकले. आपल्याला निवडणूक जिंकण्याची शाश्वती नसल्याने, बाबूजींनी त्यांच्या मतदारसंघाला भेट द्यावी नि त्या बाबतीत त्यांना मदत करावी अशी याचना त्याने बाबूजींपाशी केली. त्या वेळी ते जिंकावेत असे बाबूजींचे मत होते म्हणून ते चरणसिंगांच्या मतदारसंघात गेले. मुस्लिम मतदार चरणसिंगांना अनुकूल नव्हते. म्हणून मी स्वत: शाही इमामनाही चरणसिंगांच्या मतदारसंघात जाण्याची विनंती केली. बाबूजी, बहुगुणा आणि इमाम हे तिघेही चरणसिंगांच्या मतदार संघात गेले तो तिथे सगळा अनागोंदीचाच कारभार होता. कसलीच व्यवस्था नव्हती ! व्यासपीठही अत्यंत गैरसोयीचे होते अन् मुख्य म्हणजे स्वत: चरणसिंगांचाच पत्ता नव्हता ! सभेच्या अगदी अखेरच्या क्षणी ते उगवले. दुसऱ्याला फशी पाडणारा चरणसिंग हा असा माणूस आहे. तुम्हाला मी हे सांगू इच्छितो की, चरणसिंग इतके स्वार्थी आहेत की, स्वत:च्या मतलबाकरिता इंदिराजींच्या पाठिंब्याचा उपयोग करतील अन् नंतर त्यांचाच सफाया करतील ! इंदिराजींनी त्यांना का पाठिंबा द्यावा ? मला काही समजत नाही.

**क. ना. :** मग दुसरा पर्यायच काय होता ? बाबूजी जनसंघाबरोबर आहेत नि मोरारजींना हटवणे जरूर होते. तेव्हा चरणसिंगांना पाठिंबा द्यायचा एवढाच मार्ग त्यांच्यासमोर उरला होता.

**सु. रा. :** चरणसिंगांबद्दल तुम्हाला कितीशी माहिती आहे ? त्यांनी तुम्हाला काय काय कबूल केलंय ?

**क. ना. :** तसा आमच्यात काहीच करार झालेला नाही. खास न्यायालये काढून घेण्याबद्दलही काही ठरलेले नाही. फक्त परस्परांना सहकार्य द्यायचे एवढीच दोन्ही बाजूंची भूमिका आहे.

**सु. रा. :** पण चरणसिंग अत्यंत घातकी इसम आहे, असे असतानाही तुम्ही त्याला पाठिंबा कसा काय देता ?

**क. ना. :** तुम्ही ही जी काही माहिती मला दिली आहेत ती मी इंदिराजी आणि संजय यांच्या कानांवर घालीन; पण जर तुम्ही स्वत: नि बाबूजी याबाबतीत व्यक्तिश: इंदिराजी नि संजय यांना भेटलात तर फार बरे होईल.

**सु. रा. :** ठीक आहे; पण तुम्हाला याबाबतीत जे जे काही करता येणे शक्य असेल ते ते तुम्ही करावे अशी आमची आग्रहाची विनंती आहे. लोकसभेचे पुष्कळ सदस्य आम्ही आमच्या मागे गोळा करत आहोत. कॉंग्रेस (आय)ने जरी आम्हाला पाठिंबा दिला नाही तरीही चरणसिंगांवर मात करण्याची आमची क्षमता आहे; पण जर कॉंग्रेस (आय)चा आम्हाला पाठिंबा मिळाला तर येत्या निवडणुकीत आम्हाला चरणसिंगांचा दणदणीत पराभव करता येईल.

**क. ना. :** ठीक आहे. याबद्दल मी तुम्हाला नंतर सांगेन.

**सु. रा. :** तुम्ही पुन्हा केव्हा परत याल ? त्यांनी काय निर्णय घेतलाय हे मला लवकर समजले पाहिजे. हा प्रश्न अतिशय महत्त्वाचा आहे. कारण जर कॉंग्रेस (आय)ची भूमिका स्पष्ट झाली तर कॉंग्रेस (एस)चेही बरेच सदस्य या पक्षाला येऊन मिळतील.

**क. ना. :** मी संध्याकाळी तुम्हाला फोन करून सर्व काही सांगेन.

**सु. रा. :** संजयशी माझी शक्य तितक्या लवकर भेट घडवून आणण्याची व्यवस्था करा अशी माझी तुम्हाला खास विनंती आहे.

संध्याकाळी ५–३० ला मी संजयची भेट घेतली आणि सुरेश रामशी झालेल्या माझ्या बोलण्याबद्दल मी त्याला सांगितले. सुरेश रामची भेट घेण्यास संजय तयार झाला. संजयच्याच खोलीतून मी

सुरेश रामला फोन केला व दहा मिनिटांत त्याच्याकडे येत असल्याचं त्याला सांगितले. संजयची प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी सुरेश राम अत्यंत उत्सुक होता. त्याच्या घरी मी जेव्हा पोचलो तेव्हा मला हे जाणवले.

क. ना. : तुम्ही संजयची व्यक्तिगत भेट घेतलीत तर बरे पडेल. संजय आज रात्री माझ्याकडे डिनरला येणार आहे. वाटल्यास तुम्हीही तिथे येऊ शकता.

सु. रा. : पण तुमच्या घरी येण्यात काही धोका तर नाही ना ? तिथे आम्हा दोघांना कुणी पाहणार तर नाही ना ? शिवाय संजयच्या स्वभावाशी मी परिचितही नाही.

क. ना. : उगाच असे नर्व्हस होऊ नका ! तुमचे दोघांचे आपसात चांगलं जुळेल अशी माझी खात्री आहे.

सु. रा. : मी काय पवित्रा घ्यावा ? माझी सर्व बाजू तुम्ही त्यांना नीट समजावून सांगितली आहे ? त्यांचा रोख कोणीकडे आहे ?

क. ना. : तुम्ही फार प्रश्न विचारता. मला वाटते तुमची संजयशी भेट झाली की तुमच्या सर्व प्रश्नांची उत्तरे तुम्हाला मिळतील.

ठरल्याप्रमाणे संजय आणि मनेका रात्री ८–३० ला माझ्या घरी डिनरला आले. सुरेश राम त्यांच्यामागून पाच मिनिटांनी आला. एका स्वतंत्र खोलीत दोघांची बोलणी झाली. त्यात जनसंघाच्या प्रश्नाची चर्चा झाली. बाबूजी आणि इंदिराजी जर एकत्र आल्या नाहीत तर हरिजनांची मते विभागली जातील असे सुरेशने संजयला सांगितले; परंतु या गोष्टीशी संजय सहमत झाला नाही. हरिजनांवरील बाबूजींची पकड सुटल्याला बरीच वर्षं उलटली असल्याचे त्याने सुरेशला बेधडकपणे सांगितले. त्या दोघांत सुमारे तासभर चर्चा झाली.

## १७–८–१९७९ । शुक्रवार

आज सकाळी ८ वाजता मला अरोरांचा फोन आला. सुरेश राम आणि संजय गांधी यांच्यात आदल्या रात्री झालेल्या बोलण्याबद्दल संजयने काय प्रतिक्रिया व्यक्त केली असे त्याने विचारले. मी सुरेश रामची आणखी एकदा भेट घ्यावी असे त्याने सुचवले. सुरेश रामला मी ११–३० ला भेटेन असे मी त्याला सांगितले; पण दरम्यान मला बिजू पटनाईकच्या ऑफिसकडून फोन आला. नि बिजू पटनाईकना माझी तातडीची भेट हवी आहे असे मला समजले. त्यांचे–माझे संभाषण याप्रमाणे झाले;

कमलनाथ (क. ना.) : कसं काय ? गेल्या बऱ्याच महिन्यांत आपली गाठभेट झाली नाही !

बिजू पटनाईक (बि. प.) : हो. मी बराच कामात होतो; पण एकंदर घडामोडी तरी काय चालल्यायत त्या मला सांग. इंदिराजी आम्हाला पाठिंबा देणार आहेत की नाहीत ?

क. ना. : चरणसिंग पंतप्रधान झाल्यापासून एकंदरीत त्यांची वागणूक पाहता कांग्रेस (आय)चा तुम्हाला पाठिंबा मिळेल अशी अपेक्षाच तुम्ही कशी करता ? मला समजत नाही. सत्ता हाती आल्यापासून इंदिराजींना भेटण्याचे साधे सौजन्यही त्यांनी दाखवलेले नाही. वास्तविक तशी भेट त्यांनीच अगोदर ठरवली होती. ते देवराज अर्सना भेटले. चव्हाणांनाही भेटले आणि इंदिराजींच्या घरावरून जात असूनही त्यांची भेट घेतली नाही. त्याबाबतीत ते मला भेटले होते तेव्हा एकदा मी त्यांना विचारले होते. तेव्हा राजनारायण यांनी ठरवलेली प्रत्येक गोष्ट करण्यास आपण बांधील नाही असे ते मला म्हणाले. माझ्याशी ते फार ताठरपणाने वागले.

बि. प. : नाही. नाही. मी सर्व काही जमवून आणेन. बाबूजींच्य मागे त्यांचे फक्त १५ लोकसभा–सदस्य आहेत. जनसंघाचे समर्थन तुम्ही कसे कराल ? तुम्हा लोकांना झालेय तरी काय ? तुम्ही निष्कारणच सर्व गैरसमज करून घेता आहात. जॉर्ज फर्नांडिस इंदिरा गांधींच्या विरुद्ध आहेत म्हणून त्यांनाही आम्ही कॅबिनेटमध्ये घेतले नाही !

क. ना. : मी तुमची भेट घेणार असल्याचे चरणसिंगांना ठाऊक आहे ?

बि. प. : त्यांत कळले तरी त्याने काय बिघडणार आहे ?

क. ना. : त्यांना तुमचा संशय येईल. ते विश्वासपात्र नाहीत. आपल्या जयाबद्दल त्यांची एकदा खात्री पटली की ते इंदिराजींना अडचणीत टाकतील. त्यांना ते तुरुंगात पाठवतील नि मग मतदानावर निवडणुकींवर आपली पकड जमवतील, असाच त्यांचा कट आहे.

बि. प. : आम्ही त्यांना तसे करून देऊ असे तुम्हांला वाटते ? इंदिराजींशी व्यक्तिशः माझे काही मतभेद नाहीत. गेली वीस वर्षं मी त्यांना ओळखतोय. पंडितजींबरोबर मी काम केलेय. पण पुढे परिस्थिती अशी बदलली की मी इंदिराजींबरोबर राहू शकलो नाही. राजनारायणने संजयच्या भेटीगाठी घेतल्या हीच प्रमुख अडचण आहे. शेवटी राजनारायण तो राजनारायणच आहे !

क. ना. : पण राजनारायण जनता (एस)चे चेअरमन आहेत. त्यांना तुम्ही कसे डावलता ? आणि चरणसिंग पंतप्रधान बनले ते पुष्कळ अंशी राजनारायण यांच्यामुळेच.

बि प. : हो. ते पक्षाचे चेअरमन आहेत. त्यांनी पक्षासाठी बरेच कार्य केले म्हणून आम्ही त्यांना चेअरमन बनवले. चरणसिंग अखेरपर्यंत सरकारचा राजीनामा द्यायच्या विरुद्ध होते. सामूहिक राजीनाम्यांच्याही ते विरुद्ध होते; पण आम्ही राजीनामा देऊन तशी परिस्थिती निर्माण केली. हे सर्व संजयाला सांगा. कुठाय तो ? आत्ताच्या आत्ता इथून फोन करून संजयाला हे सांगा !

क. ना. : तुम्ही हे स्वतःच त्यांना का सांगत नाही ?

बि. प. : होय, माझीही तशीच इच्छा आहे. मी त्याला भेटावे म्हणतो; पण त्याला मी भेटायचे कुठे नि केव्हा ? संजयला आत्ता फोन करून हे ठरवा !

क. ना. : पण तुम्ही त्याची कुठे भेट घ्याल ?

बि. प. : पृथ्वीराजरोडवरील माझ्या मुलाच्या–नवीनच्या–घरी तिथे आमची भेट झाली तर कुणाला काही कळणार नाही. चला. ही भेट ठरवून टाकाच ! पुढचे सारे काही मी जमवून आणतो.

**फर्नांडिस यांना चरणसिंगांनी मंत्रिमंडळात का घेतले नाही ?**

# आयुर्विमा हा आता अधिक आकर्षक आणि सहज परवडण्याजोगा झाला आहे.




**अंतिम (जादा) बोनस— भारतात प्रथमच.**
ज्याला तांत्रिक परिभाषेत टार्मिनल बोनस म्हटले जाते असा... अंतिम (जादा) बोनस सुरू केल्यामुळे आपल्या गुंतवणुकीवर एल आय सी कडून अधिकच उत्पन्न आपल्याला ह्यापुढे मिळणार आहे. नेहमी मिळणाऱ्या प्रत्यावर्ति (Reversionary) बोनसमधील २४ टक्के वाढ आणि अंतरिम (Interim) बोनस—ह्यांखेरीज हा अंतिम जादा बोनस सर्व नफ्यासहित—पॉलिसींवर मिळणार आहे. १-१-१९८० ते ३१-१२-१९८१ ह्या कालावधीत मृत्यूमुळे किंवा मुदत पूर्ण झाल्यामुळे क्लेम होणाऱ्या पॉलिसींवर हा अंतिम बोनस मिळेल. मात्र पॉलिसीची मुदत व कोष्टक ह्यासंबधांतील कांही शर्तीनुसार हा बोनस मिळेल.

**आयुर्विम्याच्या बहुतेक हप्त्यांत कपात !**
आतां आयुर्विमा हा आपल्या आर्थिक क्षमतेशी अधिकच अनुरूप झाला आहे. एन्डौमेंट, होल लाईफ आदि बहुसंख्य लोकप्रिय विमा-कोष्टकांखाली १ एप्रिल १९८० पासून हप्ते कमी करण्यांत आले आहेत. मात्र पैसा-परतीच्या योजनेखालील (Money Back plans) हप्त्यांत नाममात्र वाढ करण्यांत आली आहे. विमाहप्त्यांतील कपात नफ्यासहित आणि नफाविरहित दोन्ही तऱ्हेच्या पॉलीसीना लागू करण्यांत आली आहे.

अधिक माहितीसाठी आपल्या नजिकच्या आयुर्विमा शाखा/विभाग कार्यालयाशीं संपर्क साधा। ह्या आकर्षक आणि प्रगतीशील अशा घटनांचा लाभ उठवा. आजच विमा उतरवा.

**भारतीय आयुर्विमा महामंडळ**

daCunha-LIC-86 Mar

(मी फोन करून संजयला त्याबद्दल विचारले. तेव्हा रात्री ८ वा. त्यांनी विजू पटनाईक यांची भेट घेण्याचे मान्य केले.)

**बि. प. :** काय म्हणतोय संजय ?

**क. ना. :** त्यांनी रात्री ८ वा. भेट द्यायचे कबूल केलेय. आता मला चरणसिंगांची भेट घ्यायचीय. आपल्या बोलण्यांबद्दल त्यांना मी काय सांगावे असे तुम्हाला वाटते ? तुम्ही संजयची भेट घेणार असल्याचे त्यांना मी सांगू ?

**बि. प. :** तुम्ही चरणसिंगांची एवढी फिकीर का करता ? माझ्या म्हणण्याप्रमाणे ते करतील. त्याची जबाबदारी माझ्यावर सोपवा. हवे तर मी तुमच्या समोरच त्यांना फोन करून याबद्दल सांगतो. (त्यांनी माझ्यासमोर चरणसिंगांना फोन केला. परिस्थिती गंभीर असल्याचे नि इंदिरा गांधींच्या पाठिंब्याबद्दल आपण साशंक असल्याचे त्यांनी फोनवर सांगितले. आपण आज संध्याकाळी संजयची गाठ घेत असून सर्व काही जमवून आणू असेही त्यांनी फोनवर सांगितले) पहा. मी चरणसिंगाना सर्व काही स्वच्छ सांगून टाकले. काळजी करू नका. मी सर्व जमवेन.

**अरोरांचा फोन :** मी सुरेश राम यांची लगेच भेट घ्यावी म्हणून सुरेश राम उत्कंठेने माझी वाट पाहतायत. मी सायंकाळी ६.३० वा. भेट घ्यायचे कबूल केले. त्या भेटीतले आमचे संभाषण असे.

**सुरेश राम :** सकाळपासून मी सारखा तुमची वाट पाहतोय; पण तुम्ही आला नाहीत. संजयशी माझी भेट घडल्यानंतर काय झाले हे जाणून घ्यायला मी उत्सुक आहे.

**कमलनाथ :** मी आज सकाळपासून अतिशय कामात होतो नि ते सुद्धा केवळ तुमच्याकरताच. तुमच्या भेटीने संजयला आनंद झाला. त्याबद्दल त्याने इंदिराजींना सांगितले आणि मला वाटते परिस्थिती तुम्हाला अनुकूल आहे. तुम्ही बाबूजींशी त्यासंबंधी बातचीत केलीत?

**सुरेश राम :** होय, बाबूजीही फार उत्सुक आहेत. गेली किती तरी वर्षे बाबूजी आणि इंदिराजींचा घनिष्ट संबंध आहे हे तुम्ही लक्षात घेतले पाहिजे. त्यांनी विभक्त होण्यात त्यांचे अहित आहे.

**कमलनाथ :** ठीक, उद्यापर्यंत याबद्दल मी तुम्हला अधिक काही सांगू शकेन !

**सुरेश राम :** तुमच्याकडून मला सर्व काही ठीक होईल असे आश्वासन हवंय नि ही गोष्ट केवळ तुम्हीच करू शकाल हे मला ठाऊक आहे. इंदिराजी आणि संजय यांच्या मनोदयाची केवळ तुम्हालाच कल्पना आहे आणि मनात आणले तर तुम्ही त्यांची जरूर ती खात्री पटवू शकाल, असा माझा विश्वास आहे.

**कमलनाथ :** इंदिराजी चरणसिंगांचा पक्ष घेणार नाहीत अशी माझी खात्री आहे. म्हणूनच तर मी तुमची भेट घेतली. तूर्तास तरी सर्व वातावरण अनुकूल आहे; पण त्याबद्दल मी तुम्हाला काही आश्वासन देऊ शकत नाही. (आमची बोलणी चालली होती त्याचवेळी हरियाणाचे मुख्यमंत्री भजनलाल यांनी खोलीत प्रवेश केला.)

**भजनलाल :** तुम्हाला भेटून आनंद झाला !

**कमलनाथ :** तुमचे काय हालहवाल आहेत ?

**भजनलाल :** ठीक आहेत आणि ते ठीक राखणे तुमचे काम आहे.

**कमलनाथ :** पाहू या.

**भजनलाल :** अहं, अहं. तुम्ही या खोलीत हजर आहात याचाच अर्थ सर्व गोष्टी ठीकठाक होणार आहेत. एक गोष्ट मला विचारायची आहे बन्सीलाल यांच्या विरुद्ध असलेल्या केसेस मी काढून घ्याव्यात का ?

**कमलनाथ :** संजय अथवा इंदिराजींशी बोलल्याखेरीज मी या प्रश्नाचे उत्तर देऊ शकणार नाही; पण तुम्ही त्या मागे घ्यायचे ठरवले असे मी वृत्तपत्रातून वाचलेय.

**भजनलाल :** वृत्तपत्रवाल्यांनी खोटी बातमी छापलीय. मी त्या काढून घेणार नाहीये. मी इतर केसेसबद्दल सामान्यतः बोललो; पण त्यांनी बन्सीलालच्याविरुद्ध असलेल्या केसेस असा त्याचा अर्थ घेतला. बरे ! संजय कुठे आहे ? मला त्याला भेटायचंय. तुम्ही त्याच्या भेटीचे जमवून आणाल ?

**कमलनाथ :** त्यात काही अवघड नाही.

**भजनलाल :** माझ्याकडे उद्या लंचला येणार ? आपल्याशी बऱ्याच गोष्टींबद्दल चर्चा करता येईल.

**कमलनाथ :** सध्या मी बराच कामात आहे; पण पुढे केव्हा तरी आपण नक्की लंच घेऊ !

**सुरेश राम :** तुम्ही मला पुन्हा कधी भेटणार ?

**कमलनाथ :** उद्या.

**सुरेश राम :** अहं, अहं. आपली आजच भेट झाली पाहिजे. अगदी रात्री उशिरा झाली तरी काही हरकत नाही इंदिराजींची प्रतिक्रिया काय आहे जाणून घेण्यास मी फार उत्सुक आहे.

तिथून निघाल्यानंतर मी संजयला बरोबर घेतले आणि नवीन पटनाईकच्या घरी गेलो. बिजू पटनाईक तिथे वाट पहात होतेच. त्यांनी संजयचे स्वागत केले. नंतर रात्री ९.३० पर्यंत त्यांच्यातळी बोलणी चालू राहिली. इंदिराजी आणि पंडितजींशी आपले जुने संबंध असल्याचे बिजू पटनाईकनी संजयला सांगितले. चरणसिंग पंतप्रधान झाल्यापासून विविध बाबतीत त्यांचे सरकार ज्या काही कडक करवाया करत आहे त्याबाबत कॉंग्रेस (आय)ला चिंता वाटत असल्याचे संजयने त्यांना सांगितले. **राजनारायणांनी पूर्वी जी काय आश्वासने दिली होती ती पण त्यांनी पाळली नसल्याचा उल्लेख संजयने केला.** स्वतःची आणि इंदिराजींची जो काय छळणूक चालली आहे त्याचे मुद्दे संजयने असे मांडले :

१) शहा कमिशनसमोर शपथ घ्यायला इंदिराजींनी नकार दिला म्हणून शासनाने त्यांच्याविरुद्ध कडक पावले उचलणे.

२) किस्सा कुर्सी का या प्रकरणाचे सुप्रीम कोर्टात स्थानांतर

३) आर. के. धवन आणि त्यांच्या कुटुंबियांविरुद्ध इन्कमटॅक्स केसेस प्रकरण पुन्हा उकरून काढणे.

४) पॉलिमेकस केसमध्ये संजयचा जामीन रद्द करण्याबाबत अर्ज देणे.

५) इंदिरा गांधींना अटक झाली त्या वेळी इंडियन एयरलाइन्सचे एक विमान पळवणाऱ्या हवाई चाच्यांना जामीन नाकारणे.

६) संजय आणि मनेका गांधी यांना पासपोर्ट न देणे.

हे सर्व ऐकल्यानंतर बिजू पटनाइकांना आश्चर्याचा धक्का बसला! जर या सर्व गोष्टी खऱ्या असतील तर कॉंग्रेस (आय) ने चरणसिंगांना पाठिंबा देऊ नये असे मत त्यांनी व्यक्त केले. **त्यातुनही आपण उपरोक्त सर्व दोषारोपांचा उपद्रव दूर करू असे आश्वासन**

त्यांनी संजयला दिले. संजयने हे सर्व मुद्दे एका कागदावर लिहून दुसऱ्या दिवशी सकाळी दहा वाजता आपल्याकडे पाठवावेत असेही बिजू पटनाइकांनी त्याला सांगितले.

त्यानंतर मी संजयला घरी सोडले आणि मग सुरेश राम यांच्या घरी गेलो.

**सु. रा. :** मी तुमची वाट पाहतच होतो. मला वाटलं तुम्ही येता का नाही.

**क. ना. :** तुम्ही इतके नर्व्हस का होता ? सर्व गोष्टी तुम्हाला अनुकूल घडतायत. जनसंघाच्या महत्त्वाच्या प्रश्नावर तुम्ही आपले लक्ष केंद्रित करावे हे उत्तम.

**सु. रा. :** तुम्ही चरणसिंगांच्याविरुद्ध कौल देणार असे मी मग शंभर टक्के समजू ?

**क. ना. :** मी तुम्हाला अशा तऱ्हेचे काही एक आश्वासन देत नाहीये. फक्त सर्व गोष्टी तुमच्या दृष्टीने अनुकूल घडत असल्याचे मी तुम्हाला सांगितले.

## १८–८–१९७९ । शनिवार

सकाळी साडेनऊ वाजता संजयच्या घरी जाऊन मी त्याच्याकडून त्याने मांडलेल्या मुद्द्यांचा कागद घेतला नि साडेदहा वाजता बिजू पटनाइकांच्या ऑफिसवर पोचलो.

**क. ना. :** संजयने हा नोटपेपर वर पाठवलाय. चरणसिंगांचे डोके फिरतेय असे मला वाटते. एकीकडे त्यांना इंदिराजींचा पाठिंबा हवा नि दुसरीकडे त्यांच्याविरुद्ध त्यांनी असले प्रकार चालवलेत.

**बि. प. :** उगाच चिडू नका. सर्व काही ठीक होईल. कायदामंत्री कक्कर यांच्याशी मी बातचीत केलीय. किस्सा कुर्सी का प्रकरणाचे हाय कोर्टातून सुप्रीम कोर्टात स्थलांतरण ही स्पेशल कोर्ट अॅक्टप्रमाणे झालेली मामुली कारवाई आहे असे त्यांनी मला सांगितले.

**क. ना. :** हे खोटे आहे. तो अॅक्ट मी स्वत: वाचलाय. 'शासनाला त्यासाठी अगोदर एक डिक्लरेशन करावे लागते आणि नंतर ते सुप्रीम कोर्टाला सादर करावे लागते. या दोन पायऱ्या अशा तऱ्हेच्या केसेसमध्ये असतात.

बिजू पटनाइकांनी माझ्यासमोर कायदामंत्री कक्कर यांना फोन केला नि त्यांनी जे काय चालवलेय ते चुकीचे आहे, असे त्यांना खडसावले. तेव्हा आपल्याला ती सर्व कारवाई करण्यास राम जेठमलानींनी सांगितल्याचे कक्करनी सांगितले. त्यावर राम जेठमलानी जनता (एस) बरोबर नसल्याचे पटनाइकांनी ओरडून सांगितले आणि याबाबतीत एक तातडीची बैठक घेण्यासाठी आपण चरणसिंगांना फोन करत असल्याची तंबी त्यांनी दिली. त्यानंतर लगेच त्यांनी चरणसिंगांना फोन केला आणि कक्करनी चालवलेला घोळ त्यांच्या कानावर घातला. संजय गांधींनी नोटपेपरवर दिलेले मुद्दे क्षुल्लक असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकाराने चरणसिंग चिडले असावेत. कारण त्यांनी अर्ध्या तासात बिजू पटनाइकांना आपली भेट घेण्यास सांगितले.

**क. ना. :** तुम्ही आपला वेळ विनाकारण का वाया घालवत आहात मला समजत नाही. चरणसिंगांचे हेतू वाईट आहेत हे मला ठाऊक आहे. जे काही घडतेय त्याबद्दल आपल्याला काही माहिती नाही असे सांगून ते सर्वांची दिशाभूल करताहेत.

**बि. प.** 'प्रत्येक गोष्ट घडायला वेळ लागतो. याबाबतीत मी इंदिराजींशी बातचीत करेन; परंतु सध्याच्या परिस्थितीत तुम्ही आम्हाला पाठिंबा द्यावा ही गोष्ट महत्त्वाची आहे. नाही तर जनसंघ देशाचा कारभार आपल्या ताब्यात घेईल. ही गोष्ट तुम्ही इंदिराजी आणि संजयच्या डोक्यात घुसवली पाहिजे. संजयने पाठवलेले नोटपेपरवरले मुद्दे निकालात काढण्याचे तुम्हाला अभिवचन देतो. तुमच्यासमोरच मी त्यासंबंधी कारवाई सुरू केली आहे.

**क. ना. :** निवडणुकीपूर्वी या सर्व गोष्टी निकालात निघाल्या पाहिजेत. जर तसे झाले नाही तर कॉंग्रेस आयने जनता (एस)ला पाठिंबा देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. संजयने नोटपेपरवर पाठवलेल्या गोष्टीही चरणसिंग पंतप्रधान झाल्यानंतरच्याच आहेत. तेव्हा त्यांना त्यासंबंधी काही सबबी सांगता येणार नाहीत. नोटपेपरवरले सर्व मुद्दे या आमच्या अटी आहेत. जनता (एस)ला पाठिंबा द्यायला आमचे लोकसभा-सदस्य तयार नाहीत. तेव्हा तुम्ही अशी काही तरी परिस्थिती निर्माण करायला हवी की त्यामुळे इंदिरा गांधी आपल्या सदस्यांना चरणसिंगांना पाठिंबा देण्यास सांगू शकतील. चरणसिंगांना पाठिंबा द्यायची इंदिराजींचीही मनापासून इच्छा आहे; पण तत्पूर्वी नोटपेपरवरले आमचे मुद्दे निकालात निघायला हवेत. न पेक्षा चरणसिंगांना कॉंग्रेस (आय)चा पाठिंबा मिळण्याची आशा तुम्ही सोडून द्यावी हे उत्तम !

**बि. प. :** असे तिरीमिरीवर येऊ नका. तुम्हाला राजकीय परिस्थितीतून विचार करायला पाहिजे.

**क. ना. :** हा नियम दोन्ही बाजूंना लागू होतो. आताच राजनारायण कपिलमोहनच्या घरी संजयची भेट घेणार आहेत आणि त्यांची ही भेट भलतीच गरमागरमीची होणार असा माझा अंदाज आहे.

**बि. प. :** चरणसिंगांशी बातचीत झाल्यानंतर मी तुमची भेट घेईन. धवन आणि त्यांच्या कुटुंबियांचा जिथे संबंध येतो त्या इन्कमटॅक्स केसेस उकरून काढल्या जाणार नाहीत, असे आश्वासन बहुगुणांनीही मला दिलंय. त्या नोटिशींची एखादी फोटो-कॉपी मला द्या.

**क. ना. :** ती मी तुम्हाला संध्याकाळी देईन.

चरणसिंगांच्या घरून बिजू पटनाईक यांनी संजयला फोन केला आणि चरणसिंग सत्तेवर येण्यापूर्वी 'किस्सा खुर्चीका' प्रकरण सुप्रीम कोर्टात स्थानांतरित झाल्याचे त्यांनी सांगितले. तसे असले तरी त्याचे डिक्लरेशन चरणसिंग पंतप्रधान झाल्यानंतरच केले गेले असे संजयने त्यांना उलट सुनावले. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री बनारसीदास यांनीही संजयशी टेलिफोनवरून बोलणे केले आणि विमान पळवणाऱ्या हवाई चाच्यांना जामीन मिळेल असे सांगितले. ¤

दुपारी दीड वाजता मी संजयला भेटलो. तेव्हा त्याने राजनारायण यांच्याबरोबर झालेल्या आपल्या भेटीची हकीकत मला सांगितली. त्या भेटीचा तपशील याप्रमाणे :

**संजय गांधी :** एकंदरीत तुमचा मला पुन्हा बुद्दू बनवण्याचा विचार दिसतो.

**राजनारायण :** नाही. नाही. उगाच चिंता करू नका. सर्व काही ठीक होईल.

सं. गा. : तुम्ही केवळ खोटारडेच नाहीत तर फसवणूक करणारे आहात !

रा. ना. : माझ्या बाबतीत असले अपशब्द कुणी उच्चारलेले नाहीत ! ज्याने कुणी असे केले त्याने एक तर माझ्या हातचा मार तरी खाल्ला आहे किंवा त्याच्याशी न बोलता मी तिथून बाहेर तरी पडलेलो आहे.

सं. गा. : मग तुम्ही मला मारत का नाही ? किंवा या खोलीतून निघून का जात नाही ? तुम्ही खोटारडे आहात. फसवाफसवी करणारे आहात !

रा. ना. : तुमच्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न करेन असे मी तुम्हाला पूर्वीच सांगितलेय.

सं. गा. : तुम्ही खोटारडे आहात. तुम्ही प्रयत्न करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. तुम्ही पूर्वीच मला तसे वचन दिले होते. आता आपले शब्द फिरवू नका !

रा. ना. : चरणसिंगांना याबद्दल मी अगोदरच सांगितलेय आणि त्याबरहुकुम करण्याचे त्यांनी मान्य केलेय.

सं. गा. : ठीक आहे. मग तसे झाले की, आमचा पाठिंबा मागायला परत या, त्यापूर्वी आमच्या पाठिंब्याचे नावच काढू नका !

रा. ना. : काळजी करू नका. सर्व काही ठीक होईल.

सं. गा. : काळजी मी नव्हे तुम्ही केली पाहिजे. तुम्हालाच आमच्या पाठिंब्याची गरज आहे. 'किस्सा कुर्सी का' प्रकरण स्थलांतरित होणार नाही असे तुम्हीच सांगितले होतेत. तुम्ही खोटे बोललात. विमान पळवणारांना जामीन मिळेल असे तुम्ही म्हणाला होतात. पुन्हा तुम्ही खोटे बोललात. तुम्ही खोटारडे आहात. आमच्या विरुद्ध आणखी प्रकरणे उभी केली जाणार नाहीत असे तुमचे आश्वासन होते. तुम्ही तिसऱ्यांदा खोटे बोललात !

रा. ना. : मी खोटारडा आहे हे पुन्हा पुन्हा कशाला उगाळायला हवे ?

सं. गा. : तुम्ही काय आहात ते तुम्हाला कळावे म्हणून मी मुद्दाम असे म्हणतोय.

या वादावादीनंतर त्यांच्यात बऱ्याच विषयांबद्दल–बिजू पटनाइकांना दिलेल्या नोटपेपरबद्दल बोलणे झाले. नंतर अचानक त्या ठिकाणी प्रेस फोटोग्राफर्स उपटल्याची बातमी येते. ती भेट अत्यंत गुप्त स्वरूपाची असूनही फोटोग्राफर्सना त्याचा कसा काय सुगावा लागला याबद्दल राजनारायणना आश्चर्य वाटते. त्या घराला एखादे पाठचे दार आहे का असे राजनारायण कपिलमोहनला विचारतात व तसे दार आहे हे त्याच्याकडून कळल्यावर त्या दाराने सटकण्याबद्दल संजयला आग्रह करतात. राजनारायणनी पाठच्या दाराने सटकावे, आपल्याला तसली सवय नसल्याचे संजय त्यांना सांगतो...

त्यानंतर दुपारी ३ वाजता मी सुरेश रामची गाठ घेतली. सुरेश रामने मला दिवसभर अनेक फोन केले होते नि अनेक निरोपही पाठवले होते.

क. ना. : तुमच्यासाठी एक आनंदाची बातमी आणलीय. सर्व घडामोडी योग्य त्या दिशेनेच चालल्या आहेत.

सु. रा. : ही गोष्ट केवळ तुम्हीच करू शकता असे मी तुम्हाला पूर्वीच म्हटले होते. मग आता तरी काँग्रेस (आय) चरणसिंगांना पाठिंबा देणार नाही असे मी गृहीत धरू ?

क. ना. : सर्व घडामोडी तुम्हाला अनुकूल अशा चालल्यायत एवढेच फक्त मी तुम्हाला म्हणालो.

¤

साडेसहाला मी हरियाणाभवनवर लक्ष्मण सिंग यांची भेट घेण्यासाठी गेलो. तिथे हरियाणाचे माजी मुख्यमंत्री देवीलालही माझी वाट पहात होते. आमच्या अटी जर चरणसिंगांनी मान्य केल्या नाहीत तर आपण पक्ष सोडू असेही त्यांनी मला सांगितले.

संध्याकाळी सात वाजता मी संजयच्या घरी भेट दिली आणि एकंदर घडामोडींचा तपशील इंदिरा गांधींना सांगितला. त्यावर त्या हसून म्हणाल्या, 'बरे झाले. काँग्रेस (आय) चा पाठिंबा इतक्या सहजासहजी मिळू शकत नाही हे त्यांनाही कळले पाहिजे !'

रात्री ८ वा. : बिजू पटनाइकांनी दोन-तीन वेळा मला फोन केले नि निरोप पाठवले. म्हणून मी त्यांच्या घरी ८ वा. गेलो.

क. ना. : हं. मग ताजी बातमी काय ?

बि. प. : कक्कर यांनी तयार केलेला एक विस्तृत अहवाल माझ्यापाशी आहे. हा बघा. (तो अहवाल ते मला दाखवतात.) किस्सा कुर्सी का या प्रकरणाचे डिक्लरेशन सुप्रीम कोर्टातून मागे घेणे म्हणजे आमच्या दृष्टीने राजकीय आत्मघातच ठरेल !

क. ना. : मग आमच्या पाठिंब्याची आशा धरू नका !

कमलनाथ यांच्या रोजनिशीतल्या या नोंदीवरून इंदिराजींनी दोन्ही बाजूंना कोंबडझुंजीत कसे झुंजत ठेवले होते हे स्पष्ट होते. त्यानंतर लौकरच चरणसिंगांचे सरकारही गडगडले. इंदिरा गांधी आणि संजय गांधी दोघे आपल्या कारस्थानात पुन्हा यशस्वी झाली. कोणताच नेता स्थिर सरकार देऊ शकत नाही हे पाहिल्यावर राष्ट्रपतींनी लोकसभा बरखास्त केली आणि मध्यावधी निवडणुका घेतल्या. त्यानंतरचा इतिहास सर्वांना ठाऊक आहेच.

शिंके तुटले नि बोक्याचे फावले या न्यायाने इंदिरा–संजय या माता पुत्रांनी सत्तेचे लोणी मटकावले.

# पूर्वांचलाचे आव्हान : पृष्ठ ७ वरून

वस्ती होती व अन्य प्रांतांतून या प्रदेशात आलेल्यांपैकीदेखील अनेक जण आज विष्णूचे उपासक बनले आहेत मायांग या नावाने ओळखले जाणारे शेकडो मणिपुरी आजही वैष्णवपंथीय आहेत. मैतेयी या नावाने ओळखली जाणारी अन्य जमात मात्र वैष्णवविरोधी असून 'मैतेयी' हा स्वतंत्र पंथ आहे. त्याचा हिंदुधर्माशी काहीही संबंध नाही,' असा पद्धतशीर प्रचार ख्रिश्चनांकडून सुरू आहे. १९४९ पर्यन्त एका राजघराण्याच्या राजवटीखाली मणिपूर हे एक स्वतंत्र राष्ट्र होते. या वस्तुस्थितीचा फायदा घेऊन मणिपूरने भारताबाहेर पडावे यासाठीही ख्रिश्चन मिशनरी कार्यरत असल्याचेही समजले. आज हिंदूंची संख्या केवळ ५५ टक्के असून उर्वरितांपैकी बहुसंख्यांनी ख्रिस्तीधर्म स्वीकारला आहे. इंफाळला प्रत्यक्ष भेट दिलेली नसल्यामुळे आज मणिपुरात बिगर-मणिपुरी नागरिकांच्या स्थलांतरामागे असलेली नेमकी पार्श्वभूमी सांगता येणार नाही; परंतु मेघालयात विदेशी नागरिकांविरुद्धचे आंदोलन जसे परप्रांतीय हिंदूविरुद्धचे आंदोलन बनले आहे तसाच काहीसा प्रकार मणिपुरात होण्याची चिन्हे आहेत.

मिझोराम या केंद्रशासित प्रदेशातही ख्रिश्चनांची संख्या उत्तरोत्तर वाढत आहे. या भागातले आदिवासी या प्रदेशात सापडणाऱ्या 'मिथुन' नावाच्या एका प्राण्याचे मांस खातात. हा प्राणी गाईबैलांच्या वर्गात मोडणारा आहे व त्यांचा फायदा घेऊन हे आदिवासी गोमांस भक्षण करतात असा प्रचार ख्रिश्चनांनी सुरू केला व त्या आधारावर हे आदिवासी हिंदू नाहीत असा निष्कर्ष काढून ते मोकळे झाले ! पुढे सुरुवातीस, आपण धर्मप्रचार करणार नाही असे आश्वासन देऊन मिशनऱ्यांनी या भागात शाळा सुरू केल्या; पण शाळेत विद्यार्थ्यांची नावे नोंदविताना मात्र धर्म आणि पंथाच्या रकान्यात 'ख्रिश्चन' अशी नोंद करून आपोआपच सर्व विद्यार्थ्यांना चतुराईने त्यांनी ख्रिस्ती करून टाकले. मुळातच विघटनवादी शक्तींचा जोर असलेल्या या प्रदेशात ख्रिस्तीकरणाच्या वाढत्या प्रमाणामुळे नवनव्या समस्या निर्माण होत आहेत.

बांगलादेशाच्या सीमेस लागून असलेले त्रिपुरा हे राज्य देखील ख्रिस्तीकरणाच्या या धोक्यापासून मुक्त नाही. राज्यातील सुमारे चार लक्ष आदिवासींपैकी बहुसंख्य ख्रिस्ती होण्याच्या मार्गावर आहेत. बाकी सर्व वातावरण मात्र थेट बंगालशी नाते जोडणारे आहे आणि बंगाली म्हटल्यावर मार्क्सवादी आलेच ! मुख्यमंत्री नपेंद्र चक्रवर्ती यांचे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सरकार राज्यात गेली तीन वर्षे अधिकारावर आहे.

## धर्मस्वातंत्र्य-विधेयक

ख्रिस्तीकरणाच्या संदर्भात पूर्वांचलातील 'अरुणाचल प्रदेश' या केंद्रशासित प्रदेशातील स्थिती मात्र खूपच वेगळी आहे. या केंद्रशासित प्रदेशातही तुरळक प्रमाणात काही भागात मिशनऱ्यांची कामे सुरू असली तरी ख्रिस्तीकरणाचे प्रमाण भयावह नक्कीच नाही. अर्थात त्याचे श्रेय येथील शासनकर्त्यांच्या दूरदर्शीपणाला आहे. त्यांनी प्रथमपासूनच कोणत्याही परक्या धर्माच्या प्रसाराला व त्यापायी होणाऱ्या अनिष्ट स्पर्धेला थारा दिला नाही. वादग्रस्त ठरलेले 'धर्मस्वातंत्र्य विधेयक' विधिमंडळात संमत करवून घेऊन त्याची खंबीरपणे अंमलबजावणी करण्याचे धैर्यही इथल्या राज्यकर्त्यांनी दाखविले. या विधेयकाविरुद्ध सबंध देशभर ख्रिश्चनांनी आवाज उठविला. नागभूमी व मेघालय विधानसभांनी त्याचा निषेध करणारे ठराव संमत केले. खासदारांनी शेकडो सह्यांची निवेदने राष्ट्रपतींकडे पाठविली; पण अखेर इथले राज्यपाल श्री. के. ए. ए. राजा यांनी राष्ट्रपतींकडे आपली बाजू व्यवस्थितपणे मांडून विधेयकाला संमती मिळविली व धर्मस्वातंत्र्य-विधेयक कायदा म्हणून लागू झाले.

अर्थात प्रांतागणिक समस्यांचे गांभीर्य वा व्याप्ती वेगवेगळी असली तरी कोणताही मूलभूत फरक आढळत नाही. दुर्गम प्रदेश, दळणवळणाच्या साधनांची कमतरता, उर्वरित भारताशी तकलादू संबंध, साधनसंपत्ती व माणूसबळाच्या जोरावर ख्रिस्ती धर्मप्रचाराचा सुरू असलेला धडाका, आर्थिक मागासलेपण व त्यामुळे आलेले परावलंबित्व, सीमावर्ती भाग असल्याने विदेशी शक्तींनी केलेला चंचुप्रवेश इत्यादी बाबी व या सगळ्यातून निर्माण झालेला विघटनवादाचा गंभीर धोका ही परिस्थिती सर्व प्रांतांत सारखीच आहे. त्यामुळे या प्रदेशाच्या समस्यांचा व सर्वसाधारण परिस्थितीचा विचार सर्वांगीण दृष्टिकोनातून व एकात्म पद्धतीने केला पाहिजे. या सबंध पूर्वांचलात एका प्रांतात सुरू झालेल्या चळवळीचे लोण लगेच दुसऱ्या प्रांतात पसरायला वेळ लागत नाही हे परकीय नागरिकांविरुद्धच्या आंदोलनाची वाढती लागण पाहता लक्षात येते. सबंध पूर्वांचलातील विविध प्रांतांच्या नागरिकांमध्ये एक प्रकारची भावनिक जवळीक असणे स्वाभाविक आहे. अशा स्थितीत आपल्यावर झालेल्या अन्यायाचे व उपेक्षेचे भांडवल करून या सर्व प्रांतांमधील विघटनवादी लोक हातमिळवणी करणे सहज शक्य आहे. हे टाळायचे असेल तर पाश्चत्यीकरण रोकले पाहिजे, धार्मिक कामांच्या नावाखाली चाललेल्या विघटनवाद्यांच्या हालचाली थांबविल्या पाहिजेत व या प्रदेशाला सर्वार्थाने भारताच्या मूळ राष्ट्रीय प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

या भागातील ख्रिस्तीकरणातून उद्भवलेले पाश्चात्यीकरण थक्क करून सोडणारे आहे. धर्मांतरित ख्रिश्चन आपण महाराष्ट्रातही पाहतोच ! पण ख्रिस्ती झाले तरी भारतीयपण लपत नाही. तसे ते लपविण्यासाठी वाट्टेल ते करण्याच्या प्रयत्नातही फारसे कोणी दिसत नाही; पण इकडे मेघालयात काय किंवा नागभूमीत काय, ख्रिस्तीकरणाबरोबरच सर्वत्र तद्दन पाश्चात्य रीतिरिवाज आणि राहणी दिसून येते. मुंबईतसुद्धा कदाचित आढळणार नाहीत अशा अत्याधुनिक फॅशन्स दऱ्याखोऱ्यात वसलेल्या कोहिमात मला दिसून आल्या. शिलाँग व कोहिमातही ओठ न रंगविलेली एकही आदिवासी युवती मला आढळली नाही ! मुंबईतही एलफिन्स्टन किंवा सिडनहॅम कॉलेजातच फक्त आढळतील अशा अत्याधुनिक पेहरावातील खासी तरुणतरुणी शिलाँगच्या भर बाजारातून पॉप संगीताच्या तालावर धुंद

होताना मला दिसले तेव्हा क्षणभर आपण परदेशात तर नाही ना असाच प्रश्न मला पडला ! व्यसनांचे प्रमाणही असेच वाढते आहे ! नागभूमीत अनेक शाळकरी विद्यार्थी दप्तरातून कंपासपेटी काढावी इतक्या सहजपणे सिगारेटच्या पेटचा काढून सराईतपणे धूम्रपान करताना आढळतात. दारू पिण्याचे प्रमाण तर अचाट आहे ! सूर्यास्त झाला की कोहिमातली दुकाने बंद होतात, **सर्व व्यवहार थंडावतात आणि अख्खे शहर दारूच्या पेल्यात बुडून जाते !** एका वृत्तसंस्थेच्या कोहिमातील प्रतिनिधीने मला सांगितले की सायंकाळी सहानंतर इथल्या पोस्टामधून एकही तार धडपणे पाठविली जात नाही. पोस्टातले सगळे कर्मचारी दारू ढोसून ड्युटीवर हजर होतात व त्या नशेतच मजकुराची विचित्र उलटापालट करून तार पाठविली जाते. ख्रिस्तीकरणापाठोपाठ येणाऱ्या या पाश्चात्यीकरणामुळे, मिळणाऱ्या प्रचंड पैशामुळे, धर्मांतरित नागांना चैनी आणि विलासी जीवनाची जणू चटकच लागली आहे. त्यामुळेच खादी ग्रामोद्योग आयोगासारख्या संघटनांनी अनेक व्यवसाय प्रशिक्षणकेंद्रे सुरू केली; पण सुखासीन नागांनी त्याला अजिबात प्रतिसाद दिला नाही !

या सर्व पाश्चात्यीकरणाचे मूळ ख्रिस्तीकरणात आहे यात शंका नाही; पण या पार्श्वभूमीवर, या ईशान्य भारताच्या अति-दुर्गम प्रदेशात ख्रिश्चन मिशनऱ्यांनी पाऊल टाकण्यापूर्वी हिंदुत्ववादी काय करीत होते हा प्रश्न मनात आल्याशिवाय रहात नाही. हजारो वर्षांपासून हा सारा प्रदेश भरतवर्षाचा भाग आहे. त्यामुळे इथले लोक भारतीय संस्कृतीचे व मुळात वैदिक धर्माचे आहेत हे नाकारता येणार नाही. आसाम, मणिपूर या भागांचा तर महाभारतातही चांगला उल्लेख आहे; पण भारतीयत्वाचे हे बंध मधल्या शेकडो वर्षांत पूर्णपणे तुटले, मुळात तसे ते तुटू नयेत व तुटल्याचे लक्षात आल्यावर सांधण्यासाठी प्रयत्न व्हावेत यासाठी हिंदूंनी काहीच केले नाही. परिणामतः अक्राळविक्राळ रूपात आज जुनीच समस्या 'आव्हान' म्हणून उभी ठाकली आहे. या सर्व बाबींबद्दलचा ख्रिश्चनांचा युक्तिवाद ऐकण्यासारखा आहे. 'या भागातील वनवासी जनता आपला जुना धर्म विसरली होती व नवा धर्म त्यांनी स्वीकारला नव्हता. अशा स्थितीत हिंदुत्ववादी त्यांना पुन्हा हिंदू करण्याचा प्रयत्न करतात; मग आम्ही ख्रिश्चन करण्यासाठी प्रयत्न केले तर त्यांत काय बिघडले ? असा ख्रिश्चनांचा युक्तिवाद आहे. तो फारसा अपूरही बाह्यतः पटण्यासारखा आहे. ख्रिश्चनांनी धर्मांतरावर खर्च केलेला प्रचंड पैसा, जमा केलेली अफाट सामुग्री इत्यादी पाहता धर्मांतर एवढेच केवळ त्यांचे उद्दिष्ट नाही. 'धर्मांतर हेच राष्ट्रांतर' या सावरकरांच्या इशाऱ्याची आठवण करून देणारे हे व्यवहार आहेत व दुर्दैवाने अद्यापही पुरेशा गांभीर्याने आपण त्यांची दखल घेतलेली नाही. मधूनच एखाद्याचा खून होतो ! कुठे आश्रमावर हल्ला होतो. तेवढ्या पुरती चौकशी होते, चार-दोन व्यक्तींना काही काळ अटकेतही ठेवले जाते आणि प्रकरण इथेच संपते ! या छोट्या मोठ्या घटनांच्या मुळाशी जाऊन या सर्व हालचालींचे सूत्रधार हुडकण्याचा प्रयत्न नेटाने होत नाही, ही गंभीर बाब आहे!

अखेर ख्रिश्चनांच्या या प्रदेशातील सर्व हालचाली पूर्वनियोजित आहेत व आपले उद्दिष्ट गाठण्याच्या दिशेने हे हळूहळू पण निश्चितपणे प्रवास करीत आहेत हे विसरता कामा नये. १९६१ मध्ये दिल्लीला झालेल्या वर्ल्ड कौन्सिल ऑफ चर्चेस च्या बैठकीत खोट्या निधर्मिकतेला बळी पडलेल्या राजकीय नेत्यांकडून त्यांनी धर्मप्रसारासाठी विविध सवलती मिळविल्या. त्यामुळेच डॉ. वेरियर एल्विन या प्रसिद्ध संशोधकाने मिझोराममधील आदिवासींचे मानववंशशास्त्राचे नमुने म्हणून जपणूक करावी असा सल्ला दिला असतानाही पं. नेहरूंनी मिशनऱ्यांना या भागात शाळा चालविण्यास अनुमती दिली! 'आम्ही धर्मप्रसार करणार नाही' असं मिशनऱ्यांनी आश्वासन दिले होते; पण मोठ्या धूर्तपणे त्यांनी या आश्वासनाला हरताळ फासला. तात्पर्य, कोणत्याही तऱ्हेचा बेसावधपणा या संदर्भात हानिकारक ठरणारा आहे.

या भागातील ख्रिस्तीकरणास थोपविण्याइतकी शक्ती हिंदुत्ववाद्यांनी अद्याप कमावलेली नाही. मुळात हिंदुत्ववादी संघटनांचेही या भागाकडे बराच काळ दुर्लक्ष झाले होते व आज तुरळक प्रमाणावर काही काम सुरू असले तरी स्वयंप्रेरित व समर्पित कार्यकर्ते आणि मुख्य म्हणजे साधनसंपत्तीची त्यांना बरीच उणीव भासते ही वस्तुस्थिती आहे. जगातील कित्येक देशांमधून ख्रिश्चनांच्या कार्याला अक्षरशः पाण्यासारखा पैसा उपलब्ध होतो, धर्मप्रचारक म्हणून माणसेही मिळू शकतात. तेव्हा धर्मप्रसाराच्या बाबतीत ख्रिश्चनांशी स्पर्धा करणे खूपच कठीण आहे, यात शंका नाही.

## संघपरिवाराचे कार्य

अन्य सर्व प्रांतांच्या तुलनेत आसाम व ईशान्य भारतात रा. स्व. संघाचे काम सर्वाधिक उशीरा, म्हणजे १९४७ मध्ये सुरू झाले. सर्वश्री दादा परमार्थ, दत्तोपंत ठेंगडी व ठाकूर रामसिंग प्रभृतींनी या भागात संघाच्या कामाची घडी बसविली. १९४८ मध्ये संघावर बंदी आली तेव्हा ४२ स्वयंसेवकांनी या भागात सत्याग्रहही केला होता. आज तेहतीस वर्षांनंतर संघ-परिवारातील अन्य संघटनांची कामेही या भागात नीटपणे सुरू झाली आहेत. आसामातील सुमारे ११० चहा-मळ्यांमधून भारतीय मजदूर संघाच्या संघटना आहेत व त्यांचा प्रभाव उत्तरोत्तर वाढत आहे. या भागात काम करणाऱ्या रा. स्व. संघाच्या सुमारे १२ प्रचारकांव्यतिरिक्त संघ-परिवारातील संघटनांचे ५ प्रचारक या भागात आहेत. ही संख्या वाढविणे आवश्यक असले तरी सोपे नाही! या दुर्गम पहाडी प्रदेशात अन्य प्रांतातून स्वबुद्धीने प्रचारक म्हणून येणाऱ्यांची संख्या पुरेशी नाही व याच भागातील तरुणांना प्रचारकाचे काम द्यायचे तर असे तरुणही दुर्मिळच आहेत. अर्थात या दुहेरी अडचणीवरही मात करून संघाचे काम नेटाने सुरू आहेच.

श्री. एकनाथजी रानडे यांनी संघकार्यातून प्रेरणा घेऊन सुरू केलेल्या विवेकानंद केंद्राने मात्र सुरुवातीपासूनच या भागाकडे विशेष लक्ष दिले आहे. कन्याकुमारीत प्रशिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या व आज देशभर जीवनव्रती म्हणून काम करीत असलेल्या सुमारे १३० तरुण-तरुणींपैकी चाळीसहून अधिक जीवनव्रती एकट्या पूर्वांचलात सुमारे २५ ठिकाणी काम करीत आहेत. वाचनालये, अभ्यासमंडळे, योगशिक्षणकेंद्रे, शाळा इ. विविध उपक्रमांतून विवेकानंदांचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोचविण्याचे काम ही मंडळी विलक्षण चिकाटीने व निष्ठेने करीत आहेत.

**शिलाँगमध्ये पुण्याचा ज्ञानेश्वर सातव हा उमदा तरुण मोठ्या धडाडीने विवेकानंद केंद्राचे काम करीत आहे.**

त्याचे योगासनांचे वर्ग या शहरात तुफान लोकप्रिय आहेत व अनेक सरकारी अधिकारी, आमदार, मंत्री इत्यादी बड्यांकडे शिकवणीच्या निमित्ताने त्याचा राबता आहे. 'राजकारणात जरी नाही तरी आसनवर्गात मी या सर्व मंत्र्यांना पार उलटे-पालटे केले आहे' असे ज्ञानेश्वर सातव मोठ्या मिस्किलपणे सांगतो ! कोहिमातही अंबाशंकरन आणि भास्कर शेट्टी हे दोन दाक्षिणात्य तरुण जीवनव्रती म्हणून काम करीत आहेत. ब्रह्मदेशाच्या सीमेजवळील मोन या नागभूमीतील आदिवासी गावात केंद्राचे काम करण्यासाठी भास्कर शेट्टी अलीकडेच रवाना झाला आहे. तिनसुकीया हे आसामातील

शहर पूर्वांचलातील विवेकानंद केंद्राच्या मुख्य कचेरीचे ठिकाण आहे.

याशिवाय अरुणाचल, मेघालय व आसामात रामकृष्ण मिशनचं कामही मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. वनवासी कल्याण आश्रम, विश्व हिंदू परिषद, विद्या भारती इत्यादी अन्य संघटनांची कामेही या भागात आहेत. अर्थात या सर्व संघटनांची एकत्रित ताकद सुद्धा ख्रिश्चनांशी मुकाबला करण्यास तुटपुंजी आहे. पूर्वांचलात जाण्यापूर्वी या भागात हिंदूविरुद्ध ख्रिश्चन असा संघर्ष असेल अशी माझी कल्पना होती. प्रत्यक्षात हिंदू संघटनांची आज, ख्रिस्तीकरणाचा लोंढा थोपविण्यासाठी, एक प्रकारे आपले अस्तित्व टिकविण्यासाठी, केवळ धडपड सुरू आहे; उलट ख्रिश्चन मात्र आपले वर्चस्व शाबूत राखून वेळ पडल्यास संघर्षासाठी पूर्णपणे सिद्ध आहेत, अशी स्थिती आहे.

अर्थात ही परिस्थिती बदलता येणारच नाही असे मात्र नाही. पूर्वांचल व उर्वरित भारतामध्ये 'सांस्कृतिक सुसंवादित्व' निर्माण करता आले तर पूर्वांचलाचे हे आव्हान समर्थपणे पेलता येईल. विकासाची समान संधी देऊन व सांस्कृतिक देवाणघेवाण वाढवून या प्रदेशाची उपेक्षा संपविण्याची खरी गरज आहे. तसे झाले तरच हा प्रदेश मूळ भारतीय राष्ट्रीय प्रवाहात खऱ्या अर्थाने सामील होऊ शकेल. विद्यार्थी परिषदेच्या आंतरराज्य छात्र जीवन-दर्शन व तत्सम उपक्रमांचे महत्त्व या भागात आल्याशिवाय पटणार नाही. अखेर इथे येणे, इथली परिस्थिती पाहणे हेच तुमचे-आमचे डोळे उघडण्यासाठी एक प्रभावी अंजन आहे.

'जय जगत' आणि विश्वबंधुत्वाच्या घोषणा देत मुंबई आणि लेनिनग्राड किंवा पुणे आणि म्युनिक अशा शहरांना आपण 'भगिनी-शहरे' म्हणून जाहीर करीत आहोत. ही एवढी लांब उडी मारण्यापूर्वी कोहिमा, शिलांग, इटानगर, इंफाळसारख्या शहरांशीच संबंध वाढवायला काय हरकत आहे? या सर्व प्रदेशात विपुल निसर्ग-सौंदर्याच्या खाणी आहेत; पण असे असूनही पर्यटनाच्या दृष्टीने हा भाग अविकसितच राहिला आहे. पूर्वांचलाच्या समस्यांचा एकात्म विचार करताना हे मागासलेपणही लक्षात घेतले तर आर्थिक विकासाबरोबरच राष्ट्रीय एकात्मताही साधता येणे कठीण नाही.

शेवटी पूर्वांचलातच माझ्या कानावर आलेली एक गोष्ट सांगून ही लेखमाला संपवितो. दुसऱ्या महायुद्धाच्या सुमारास नेताजी सुभाषचंद्रांच्या वडीलबंधूंना माओ-त्से-तुंगने म्हणे एक पत्र लिहिले होते. 'तुमचं कलकत्ता शहर नवी दिल्लीपेक्षा पेकिंगला जवळ आहे तेव्हा दिल्लीचं मांडलिकत्व स्वीकारण्यापेक्षा तुम्ही जेव्हा स्वतंत्र व्हाल तेव्हा चीनमध्येच सामील होण्याचा विचार करावा!' असे माओने लिहिले होते. माओला लिहिलेल्या पत्रोत्तरात सुभाषबाबूंच्या बंधूंनी मोठे बाणेदार उत्तर दिले होते. माओची कल्पना फेटाळून लावताना त्यांनी लिहिले—'पेकिंग कलकत्त्याला जवळ आहे ही गोष्ट खरीच आहे; पण दिल्ली आणि कलकत्त्याच्या दरम्यान गंगा-यमुना वाहतात, पेकिंगशी आमचे तसे कुठलेच नाते नाही!'

चीनच्या कुणा हुआ-कुओ-फेंगने उद्या मेघालय व नागभूमीच्या मुख्य मंत्र्याला असेच पत्र लिहिले तर ती मंडळी काय उत्तर देतील?

परतीच्या प्रवासात कलकत्त्याला येण्यासाठी मी दीमापूरला विमानात बसलो तेव्हा हाच प्रश्न माझ्या मनात घोळत होता!

**समाप्त**

---

## पुणे निवडणूक वार्ता : पृष्ठ ४ वरून

संघाचे यापलीकडे फारसे विवेचन करण्यात अर्थ नाही.

सहाही मतदारसंघांमध्ये सर्वात कमी मतदार असलेला मतदारसंघ म्हणून बोपोडीचा उल्लेख करावा लागेल. एकूण ९८ हजार ४६८ मतदार असलेल्या या मतदारसंघात नऊ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. त्यापैकी रिपब्लिकन पक्षाच्या तीन गटांचे (कांबळे – गवई – खोब्रागडे) तीन, जनता पक्षाच्या तीन गटांचे (भारतीय जनता जनता एस (चरणसिंग) – जनता एस (राजनारायण) तीन, इंदिरा कॉंग्रेस व कॉंग्रेस (अरस)चे प्रत्येकी एक व एक अपक्ष अशी ही विभागणी आहे.

अर्थात पटावर नावे नऊ दिसत असली तरी यापैकी सात जण खेकड्यांप्रमाणे एकमेकांचे पाय ओढन एकमेकाला खाली बसवण्यातच समाधान मानतील. खरी लढत आहे ती इंदिरा कॉंग्रेसचे श्री. शशिकांत कदम व कॉंग्रेस (अरस)चे शिवाजीराव भोसले यांच्यामध्ये. हेही या मतदारसंघाचं वैशिष्ट्य मानावं लागेल की, पुण्यातील सहा मतदारसंघांमध्ये बोपोडी हा असा एकमेव मतदारसंघ आहे की जिथे इंदिरा कॉंग्रेस आणि कॉंग्रेस (अरस)मध्ये सरळसरळ समोरासमोर लढत आहे. महानगरपालिकेचे या मतदारसंघातील आठ नगरसेवकही याच दोन पक्षांनी प्रत्येकी चार–चार असे वाटून घेतले आहेत.

अशा परिस्थितीत विजयश्री निश्चित कुणाच्या गळ्यात माळ घालेल याचे भाकीत वर्तवणं अतिशय कठीण आहे. आता एकच सांगता येईल-दोन अतिशय मातब्बर तुल्यबळ वाघांची लढत अत्यंत प्रेक्षणीय होणार आहे आणि खरी कॉंग्रेस कोणती हा अखिल भारतीय पातळीवरील वादही या निवडणुकीत या मतदारसंघापुरता तरी निकालात निघेल.

पुण्यातल्या सहा विधानसभा मतदारसंघांचं युद्धाला तोंड लागण्यापूर्वीचं चित्र हे असं आहे. यातून एक गोष्ट निश्चितपणे स्पष्ट होते ती म्हणजे इंदिराजींची वावटळ १९८० च्या लोकसभा निवडणुकीइतकी ही निवडणूक ग्रासून टाकणार नाही. तसंच बहुतेक ठिकाणी बहुरंगी लढती असल्यामुळे बऱ्याच गोष्टींचा निकाल कोणता उमेदवार प्रतिस्पर्ध्यांपैकी कोणाची किती मतं खातो यावरच अवलंबून आहे. पुण्यापुरतं बोलायचं झालं तर इंदिरा कॉंग्रेस विरुद्ध सर्व विरोधी पक्ष असा हा सामना तीन-तीन असा बरोबरीत सुटायला आज तरी हरकत दिसत नाही.

—प्रतिनिधी

## चित्रपट

सदानंद बोरसे

# दोन जंगलपट ऊर्फ प्राणीपट

### हतारी–पेशवेपार्कमध्ये काही नवे प्राणी

कधी कधी कंटाळा येतो माणसांचा, माणसांच्या कथांचा, माणसांच्या विचारांचा, भावनांचा; शेकडो, हजारो वर्षांच्या संस्कृतींची वल्कले गुंडाळून अगदी आपल्या आजूबाजूला वावरणाऱ्या माणसांच्या कळपांचे दृश्यही नकोसे होते, आपणही त्यांच्यामधीलच ही सुद्धा जाणीव पुरून टाकावीशी वाटते आणि अशा वेळी जर ‘ Hatari ’ किंवा ‘African Safari’ सारखा एखादा चित्रपट थोडासा कृत्रिम वाटणारा पण माणसांपासून बराच दूर असणारा आणि बुद्धी–मनापासून असंस्कारित जिवंत निसर्गाला खूप जवळ असणारा एखादा चित्रपट पाहिला की तो झटकन आवडून जातो. एखाद्या लंब्टांग अमिताभची खर्जातील डायलॉगबाजी, दाणदाण चालणे जेवढे अपील होते तेवढाच एखादा लांबटांग्या, लांबमान्या जिराफ मोहवितो. एखाद्या शम्मी वा जितेंद्रच्या वाकड्यातिकड्या उड्यांना जशी पिटातून एक जोरकस शिट्टी माराावीशी वाटते, तसेच एखादे माकडही आपल्याकडून शिट्टी वसूल करते. एखादी लोभस हरिणी कोणत्याही हेमामालिनीपेक्षा वा रेखापेक्षा अधिक लोभस, अधिक सुंदर वाटते. सोनेरी आयाळीची झुलपे विस्कटत डौलात जाणारा वनराज, ओलसर थुलथुलीत अंग फदफदवीत चालणारा विनोदवीर पाणघोडा, चट्ट्यापट्ट्यांचा चड्डी–शर्ट अंगावर चढवून वागडणारा झेब्रा आणि असे किती तरी लोक आपल्यापुढे एक वेगळाच चित्रपट सादर करतात. शिवाय अन्य अनेक चित्रपटांमध्ये शिकवून तयार केलेल्या प्राण्यांचे कारनामे असतात. उलट या जंगलपटामध्ये या प्राण्यांचे खरेखुरे विशुद्ध जीवन–त्यांच्या स्वच्छंदी क्रीडा, जीवघेण्या झुंजा, मुक्त प्रणय–घेतलेले असते. ( जर तेही शिकविलेले कारनामे असतील; तर निदान ते तसे वाटणार नाहीत, अशा काळजीने घेतलेले असतात ) ; त्यामुळे कॅमेऱ्याच्या चौकटीत बंदिस्त कसरती करण्याची वेळ त्यांच्यावर न येता त्यांच्या वागडण्याप्रमाणे कॅमेरा आपली चौकट बदलतो किंवा कधीकधी कायम सुद्धा ठेवतो. दोन–चार माणसांची पोकळ अन् निर्बुद्ध बडबड ऐकण्यापेक्षा किंवा कृत्रिम संरचना पाहण्यापेक्षा सबंध निळे आकाश भरून टाकणारा लाखो चित्रविचित्र पक्ष्यांचा थवा आणि सबंध वातावरण भारून टाकणारा त्यांचा कलकलाट अधिक बरा वाटतो. एखाद्या कुरणाचे हिरवे कवडसे मधून मधून आपल्या डोळ्यांवर पाडत चौखूर उधळणाऱ्या काळसर किरमिजी रंगाच्या गव्यांच्या रूपाने जणू ते सगळे मैदान सुसाट धावत असते, धडधडत असते, उलथेपालथे होत असते. एक अनिर्बंध, उन्मुक्त हालचाल आपल्यापुढे साकार करीत असते.

आधी उल्लेखलेल्या चित्रपटांनी विशेषत: ‘African Safari’ ने असा अनुभव बऱ्याच प्रमाणात दिला होता. ‘ Lost in the Desert ’ सारख्या एखाद्या चित्रपटातून किंवा वन्य प्राण्यांच्या जीवनावरील एखाद्या सुंदर लघुपटातून किंवा ‘ National Geography ’ मध्ये येणाऱ्या छायाचित्रांमधूनही असा अनुभव तुकड्या–तुकड्यातून मिळतो. साहजिकच (माझ्या माहितीप्रमाणे) भारतातर्फे कनियात चित्रित केलेला पहिला पूर्ण लांबीचा ‘ हातारी ’ हा जंगलपट अशाच अनुभवाच्या अपेक्षेने पाहायला गेलो; पण चित्रपटातील अधूनमधून आढळणारे तुकडे वगळल्यास चित्रपटातील कथानामक प्रकारासाठी खर्ची टाकलेल्या नटनट्यांच्या खुर्दाने आणि अन्य भलत्याच डोकेबाज प्राण्यांनी त्या अपेक्षेचा पार चुथडा करून टाकला ! चित्रपटाचे दिग्दर्शक आहेत शेर जंगसिंग ऊर्फ पंछी साब. ( त्यांच्याच शब्दात–शेर कहिये या पंछी, दोनों कुदरत की निहायतही खूबसूरत चीजें हैं । ) तर त्यांना चित्रपटातून सगळ्यांना संदेश द्यायचाय तो असा– परमेश्वराने निर्माण केलेल्या जगात त्याने निर्माण केलेल्या माणसाला जगायचा जितका अधिकार आहे, तितकाच त्यानेच निर्माण केलेल्या या वन्य प्राण्यांनाही हक्क आहे. माणसाला जसे सुख, दुःख, प्रेम, वात्सल्य असते; तसे या प्राण्यांनाही असते. एखाद्या माणसाच्या मादीला मारून तिच्या पिल्लाला अनाथ करणे जितके क्रूरपणाचे आहे तितकेच किंबहुना त्याहीपेक्षा अधिक क्रूरपणाचे एखाद्या हरिणीला मारून तिच्या पाडसाला पोरके करणे आहे. म्हणून ‘ जगा आणि जगू द्या ! या अनमोल निसर्गसौंदर्याची हाती असलेली ठेव पुढील पिढ्यांकडे सुरक्षित सोपविण्यासाठी आपण या वन्य प्राणिजीवनाचे संरक्षण करू या !

तर असा संदेश देण्यासाठी एक अत्यंत

ढोबळ कथेचा साचा मांडून त्या निमित्ताने या वन्य जीवनाचे विविध पैलू आणि सौंदर्य दाखविणे अपेक्षित होते. चित्रपटात मात्र नेमके उलटे झाले आहे. कॅमेऱ्याच्या विशाल-कोनी चौकटीत ( Wide angle frame ) वेगवेगळे प्राणी इकडून तिकडे नुसते पळत आहेत एवढ्याच ढोबळ वन्य जीवनाचा साचा घेऊन त्या निमित्ताने एक धंदेवाईक फॉर्म्युला चित्रपट पंछीसाहेबांनी कथालेखक अजित देवल यांच्या मदतीने बनवून टाकला आहे. मग या चित्रपटात सोन्याच्या स्मगलिंग-ऐवजी प्राण्यांचे स्मगलिंग आहे, ते बंद करू पाहणाऱ्या एका कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याचा व त्याच्या बायकोचा खून आहे, त्या खुनाचा हिसाब चुकविण्याची सूडकथा आहे, बागां-मध्ये बागडण्याऐवजी अभयारण्यात हिंडत गाणी म्हणणारे चॉकोलेटी हिरो-हिरॉइन आहेत, एक अचपळ डोक्याचे आगाऊ बालक आणि अन्य प्राण्यांच्या मदतीने त्याने केलेल्या बाललीलाही आहेत. या सगळ्या लफड्यात सिंह, चित्ता, गेंडा असे दणदणीत गृहस्थसुद्धा बिचारे निमूटपणे कुठल्या तरी कोपऱ्यात बसून राहिले आहेत. कथाविषयाची एकदा अशी वाट लावल्यानंतर प्राण्यांची जी दृश्ये घेतली आहेत, त्यात तरी काही वैशिष्टय असावे; पण छे, नाव नको ! एक म्हणजे छायाचित्रण या प्रकारात सौंदर्य नामक काही चीज असते याची जाणीव दिग्दर्शक पंछीसाब वा छायाचित्रकार कमलाकर राव यांनाही नसावी. संपूर्ण चित्रपटात प्राण्यांचे वैशिष्टय-पूर्ण close–ups जवळजवळ नाहीतच ! close–ups आहेत ते निर्बुद्ध प्रीती सप्रू, ठोकळा महेंद्र संधू नाही तर अजागळ नरेंद्र-नाथ यांचे. शिवाय सगळे छायाचित्रण म्हणजे घाणेरड्या मळकट हिरव्या-पिवळ्या रंगांची उधळण, पखरण फार बरी अशी सांडणावळ आहे. आणखी एक म्हणजे दिवसाप्रमाणे रात्रीही बराच काळ, बराच वेळ जंगल जागेच असते याचीही पंछीसाहेबांना कल्पना नसावी. संपूर्ण चित्रपट तळपत्या सूर्याच्या साक्षीनेच चाललेला असतो. जंगलामध्येच या प्राण्यांसारखेच जीवन जगणारा एक आदिवासीही सापडतो. याचीही माहिती पंछीसाहेबांना असल्याची पुसटशी खूणही चित्रपटात दिसली नाही. त्या शेकडो मैल पसरलेल्या जंगलात तीच तीच सात–आठ माणसे अन् त्याच त्या काऊबॉयच्या पोषाखात.

त्यामुळे पेशवे पार्कमध्ये आज असलेल्या ( किंवा नसलेल्या ) प्राण्यांमध्ये दहा–बारा नवीन प्राणी आणून ठेवले की हबारी तयार होतो.

जाता जाता—

' हबारी ' या नावाचा अर्थ काही सुध-रला नाही. म्हणजे तो कळलाच पाहिजे असेही नाही.

हबारीत ' जगा, जगू द्या ' वगैरे संदेश दिला आहे, हे ठीक आहे; पण तो ठसविण्याच्या ओघात काही दिलफोडक, हृदय-तोडक दृश्ये दाखविण्याच्या नादात काही प्राण्यांच्या अंगात गोळ्या रिचवल्या आहेत, काहींची चीरफाड केली आहे, तर या प्राण्यांना खरेखुरे मारले, कापले की माण-साचा खून, मृत्यू दाखविण्यासाठी जशा विविध क्लृप्त्या वापरल्या ? ( हे आपलं सहज म्हणून. )

अनेक वेळा फिल्टर अचानक बदलून निळे झेब्रे पिवळे करणे असे चित्तचक्षु चमत्कार दाखविले आहेत. *

# टक्कर

एक श्रीमंत जहागिरीचे जंगल होते. त्या जंगलात अशोककुमार नावाचा एक सिंह राज्य करीत होता. त्याचे मोठे पिल्लू लहान-पणीच हरवले होते. ते पिल्लू संजीवकुमार मोठे बनून दुसरीकडे बदका-पिल्लांच्यामध्ये अडकले होते. एक दिवस त्याने एका खुनाच्या प्रसंगी स्वतात आपले प्रतिबिंब पाहिल्यावर त्याच्या अचानक लक्षात आले की, ' तो राजसिंह एक. ' म्हणून मग तो आपल्या राज्यात परतला. तेव्हा त्याच्या लक्षात आले की, आपला बाप सिंहमहाराज आता म्हातारा झालाय, धाकटा तरुण सिंह जितेंद्र काही गिधाडांच्या नादी लागून वाया चालला होता. धाकटी बहीण बिंदिया गोस्वामी कुठल्या तरी लफड्यात अडकली होती. मग अनेक झुंजा खेळून दोघा तरुण सिंहानी रणजीत नावाच्या लांडग्याला ठोकून काढले, विनोद मेहरा नावाच्या कोल्ह्याचे तोंड अस-लेल्या काळसर्पाला ठेचून काढले, ढाण्या वाघ जमातीतील विनोद मेहरा नावाच्याच तरुण वाघाला या कोल्ह्याने डांबून ठेवले होते. त्याला सोडवून बिंदिया सिंहिणीचे लग्न त्याच्याशी लावून दिले. पुढे त्यांची मुले सिंघ आणि मुले वाहिणी म्हणून ओळखल्या जायच्या, म्हणे. दरम्यानच्या काळात दोघा सिंहांनी पाणवठ्यावर झीनत अमान आणि जयप्रदा नावाच्या हरिणींची शिकार करून टाकली होती. एवढे होत असताना गणपती नावाच्या जंगलातल्या हत्तीमुख देवानेही मधूनमधून आपले कारनामे दाखवून टाकले.

तर अशी कथा असलेल्या ' टक्कर ' नावाच्या चित्रपटाचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे आधी उल्लेखिलेल्या प्राण्यांनी लाव-लेले माणसांचे मुखवटे. अर्थात बाकी शरीरा-वरून (विशेषत: हरिणींच्या शरीरांवरून—कारण ते त्यांनी बाकीच्यांपेक्षा जास्त दाख-वले आहे) मूळ प्राण्यांची ओळख पटते.

तर ' हबारी 'च्याच आगेमागे प्रदर्शित झालेला ' टक्कर ' हा दुसरा प्राणीपट.

